# प्रभुतरुण दिवाळी अंक २०२३
## अंतरंग


सुहासिनी कीर्तिकर : (संपादकीय) ........ ०४
मिनाक्षी जयकरे : (विस्तारीत संपादकीय) ........ ०५
सुहासिनी कीर्तिकर : कलम (कथा) ........ ०६
सुजन राणे: प्रभुतरुणाची सेंच्यूरी (लेख) ........ ११
डॉ. सुमन नवलकर : श्रमदान (कथा) ........ १३
सॉ. राजन जयकर : Shammi Kapoor-Unknown (लेख) ........ १७
नंदकुमार विजयकर : ओनली साऊथ इंडियन (कथा) ........ २७
हेमंत विनायकराव तळपदे : मोतीराम (कथा) ........ ३१
मुकुला राणे नवलकर : पर्जन्यसूक्त (लेख) ........ ३७
अचला देसाई : The Golden Journey (लेख) ........ ३९
विश्वास अजिंक्य : पक्षीविज्ञान (लेख) ........ ४१
श्रेया तळपदे : मनातल्या मनात (लेख) ........ ४७
जयमती तळपदे : आमचे घरांतर (लेख) ........ ४८
मृदुला प्रभुराम जोशी : पाठारे प्रभु ज्ञातीच्या इतिहासाविषयीचे कुतूहल (लेख) ........ ५०
निकेता प्रशांत राणे : निर्णय (कथा) ........ ५३
संजय शरद दळवी : कुठे कुणाच्या घडल्या भेटी (लेख) ........ ५६
अनन्या सक्सेना : Mermaid Adventure (कथा) ........ ५९
अपर्णा समीर विजयकर : Senior-ita (लेख) ........ ६१
प्रविण मानकर : Sanatana Dharma (लेख) ........ ६३
अयाना आलाप जयकर : Autobiography of Diwali Lights (लेख) ........ ६६
इशानी श्रेयस सेंजित : Touch Me Not (लेख) ........ ६७
प्रकाश तळपदे : सगुणनिर्गुण - रूप मनोहर (लेख) ........ ६८
सविता सुमीत नवलकर : What is Pranic Healing (लेख) ........ ७२
प्रणिता प्रभाकर : लंडनवारीची ऐशी की तैशी! (प्रवासलेख) ........ ७४
सुहासिनी कीर्तिकर : कॉलरट्यून (कथा) ........ ८१
विश्वास अजिंक्य : नाणीसंग्रहाची सुरुवात (लेख) ........ ८४
मिलिंद कोठारे : धंदा आणि नफा- योग्य मेळ साधायचा... (लेख) ........ ८७
नम्रता विजयकर : A successful business requires one simple thing- Passion (लेख) ........ ९९
मनिला राव : एक हसरा चेहरा गमावला (लेख) ........ १०१


**कविता**

नलिनी तळपदे, श्रेया तळपदे, सुहासिनी कीर्तिकर, सौ. निकेता प्रशांत राणे, अयाना आलाप जयकर, मिलिंद कोठारे, स्वागता प्रियेश विजयकर, कै. विद्या बाळकृष्ण विजयकर, जयमती तळपदे

कणिका : सुहासिनी कीर्तिकर
रेखाचित्रे : सुधीर कृष्णनाथ आगासकर
वात्रटिका : डॉ. सुमन नवलकर
हास्यचित्रे : सुहासिनी कीर्तिकर
**मुखपृष्ठ : श्रीनल शरद कोठारे**
**मुद्रितशोधन : सुहासिनी कीर्तिकर**

प्रतिक्रिया, अभिनंदन, प्रभुतरुणास देणगी, प्रभुतरुणाची डायरी इत्यादी

तत्त्वाचा बंदा जीव । मूर्तीला कोण विचारी?

# प्रभुतरुण

दिवाळी अंक

मूल्य रुपये दहा

( स्थापना : तारीख २५ ऑगस्ट १९२३ )

संपादिका : **सुहासिनी कीर्तिकर**

कार्यकारी संपादकमंडळ:
**मिनाक्षी जयकर, मयुरा नायक, संजना कोठारे, वैजयंती कीर्तिकर**

**www.prabhutarun.com**

**वर्ष ५७ वे) १६ नोव्हेंबर, १६ डिसेंबर २०२३ (अंक ३**


**संपादकीय**

# कृतज्ञ मी, कृतार्थ मी

**-सुहासिनी कीर्तिकर**

एक पर्शियन कथा आहे मित्रांनो. त्यात एका सरदाराला स्वप्न पडते. स्वप्नात तो मोठ्या राजवाड्यात राजा असतो. पंचवीस वर्षे राज्य भोगतो. सुंदर राण्या, मंत्री, सेवक, रयत, पर्यटन, राजवाडा, खाणेपिणे... लयलूट सगळी. एका क्षणाला ते स्वप्न विरते अन् त्याच्या लक्षात येते की कसली पंचवीस वर्षे? फक्त पाच मिनिटांचे ते स्वप्न होते! लक्षात येतेय् का तुमच्या? माझी संपादकीय पंचविशी अशीच आत्ता याक्षणी इवलुशी वाटत्येय् प्रत्यक्षात. पण हां! त्यातली समृद्धी, लयलूट मात्र स्वप्नवत्; तरीही खरीखुरीच. लेखक, कवी, चित्रकार, वाचक, हितचिंतक, जाहिरातदार, विश्वस्त आणि कार्यकारी संपादक यांनी 'प्रभुतरुण' हा राजवाडा समृद्ध, गजबजता, सेवाभावाला मुजरा करणारा, दाद देणारा ठेवला. प्रभुतरुणाची शंभरी 'याचि डोळा' पहाणारे तुम्ही सर्व हे प्रत्यक्षात उतरलेले स्वप्न आहात.

या स्वप्नाला साक्ष राहून मी तुम्हाला नववर्षाच्या आणि दीपावलीच्या शुभेच्छा देते. अगदी मनापासून. इथून पुढेही लिखीत अंक नसला तरी; तुमची आणि प्रभुतरुणाची दोस्ती अभंग राहील. खात्री आहेच मला. नेहमीप्रमाणे या दिवाळी अंकात भरपूर साहित्यफराळ आहेच. यथेच्छ ताव मारा. काय? मारालच म्हणा. खात्री आहे माझी आजवरच्या अनुभवातून. कृतज्ञ आहे मी याबद्दल. तर चला मंडळी, उलटा पान. लुटा आनंद.

*विस्तारीत संपादकीय*

# चरैवेति। चरैवेति।।

**✶ मिनाक्षी जयकर ✶**

‘एकाच या जन्मी जणू, फिरुनी नवी जन्मेन मी’

प्रभुतरुणाचं विस्तारीत संपादकीय लिहायला बसले असतानाच कुठूनशा या गाण्याच्या ओळी कानावर पडल्या. प्रभुतरुणाच्या बाबतीतही या ओळी किती चपखल बसत आहेत, नाही? प्रभुतरुणही आता कात टाकतोय. एका माध्यमातून दुसऱ्या माध्यमात परिवर्तित होतोय. प्रभुतरुणाचा छापील स्वरूपातील हा शेवटचा दिवाळी अंक! हा नोव्हेंबर-डिसेंबरचा जोडअंक असल्याने एकंदरीतच शेवटचा छापील अंक! पर्यायाने माझंही हे शेवटचं विस्तारीत संपादकीय. नवीन वर्षात नवी विटी-नवा दांडू... नव्या वर्षापासून आपला नेहमीचा प्रभुतरूण नवीन स्वरूपात, नवीन नेतृत्वासह वेगळ्या माध्यमातून आपल्या भेटीला येणार आहे.

हे विस्तारित संपादकीय लिहिताना मनात बऱ्याच विचारांची भाऊगर्दी होते आहे. लहानपणी एक ज्ञातीय मासिक केवळ घरातले सर्वजण वाचतात म्हणून मीपण कधीमधी वाचत असे. एक वाचक म्हणून सुरू झालेली ही वाटचाल लेखक, अतिथी संपादक आणि कार्यकारी संपादकपदापर्यंत कशी आणि कधी झाली कळलंही नाही. ‘तरुणा’ने मला लिहिण्याचा आत्मविश्वास दिला. ‘अतिथी संपादक’सारख्या उपक्रमांनी माझ्यासारख्या अनेक नवख्या लोकांना लिहितं केलं. त्यातूनही प्रभुतरुणाला अनेक नवनवीन सदरलेखक मिळाले. प्रभुतरुणाच्या या शंभर वर्षांच्या वाटचालीत पाव शतकाहूनही अधिक काळ ज्यांचा सहभाग राहिला अशा मावळत्या संपादिका प्राध्यापिका सुहासिनी कीर्तिकर यांच्या मार्गदर्शनाखाली काम करण्याची संधी मला मिळाली. प्रभुतरुणाच्या निरनिराळ्या कार्यक्रमांनी ज्ञातीतील कलाकारांना व्यासपीठ उपलब्ध करून दिलेलं आहे. या कार्यक्रमातला सहभाग अनेकांच्या कारकिर्दीची पहिली पायरी ठरला आहे. प्रभुतरुणाच्या या परंपरा, तरुणाने गाठलेली साहित्यिक उंची, वैविध्य या नवीन डिजिटल अवतारातही जपले जाईल याची खात्री आहे.

याच परंपरेला अनुसरून हाही अंक विविध प्रकारच्या साहित्याची सुकडी तुमच्यासाठी घेऊन आलेला आहे. कथा, कविता, प्रवासवर्णन, रेखाचित्र, व्यंगचित्र, वात्रटिका, माहितीपूर्ण लेख यांच्यासह बालसाहित्यिकांचाही सहभाग यात आहे. वयाची  नव्वदी पार केलेल्यांपासून वय वर्षे आठपर्यंतच्या लेखक/कवींचं यात योगदान आहे.

‘थांबला तो संपला’ या उक्तीला अनुसरून प्रभुतरुणाने नेहमीच स्वत:ला ‘तरुण’ ठेवलं आहे. असं म्हणतात, ‘धावत्याला शक्ती येई, आणि रस्ता सापडे’... काळाची पावलं ओळखून स्वत:मध्ये आवश्यक ते बदल प्रभुतरुणाने नेहमी केलेले आहेत. म्हणूनच प्रभुतरुणाच्या डायरीत आंतरज्ञातीय विवाहाचीदेखील नोंद ‘नांदा सौख्यभरे’ या सदरातच घेतली जाते. नव्या पिढीचा इंग्रजी भाषेकडील कल बघून इंग्रजीतूनही लेख प्रभुतरुणात प्रसिद्ध होत आहेत. यासारख्या गोष्टींमुळे तो सर्वसमावेशक झालेला आहे. सर्व वयाच्या वाचकांना तो वाचावासा वाटतो आणि त्यामुळेच घरोघरी नव्या जुन्या पिढीला तो तितकाच आपलासा वाटतो.

अशा या आपल्या प्रभुतरुणाला शतकोत्तर वाटचालीसाठी शुभेच्छा! तुम्हा सर्वांनाही दीपावली आणि नववर्षाच्या शुभेच्छा!

‘चरति चरतो भग:।’... म्हणजे जो चालतो त्याच्याबरोबर त्याचं भाग्यही चालतं. प्रभुतरुणाने स्वत:ला ‘तरुण’ ठेवलंय म्हणूनच यंदा शंभर वर्ष पूर्ण करू शकला आहे. त्याच्या शतकोत्तर वाटचालीसाठी म्हणावसं वाटतं...चरैवेति। चरैवेति।।

## कथा

❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀

# कलम

**✶ सुहासिनी कीर्तिकर ✶**

❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀

जनूकाका रात्रभर तळमळत होते. पण आता मात्र शांत झोप लागली त्यांना. हं. तशी त्यांची तब्येत धडधाकट. एरवी झोपेची अजिबात तक्रार नाही. मित्र परिवारातले सगळेच म्हणायचे, 'जनोपंत, काय सेंच्युरी मारणार का? या वयातही तू किती तगडा रे!'' जनार्दन हसण्यावरी न्यायचा. पण गोष्ट खरीच होती. गेल्या महिन्यातच पंच्याऐंशी पूर्ण केली त्याने. चांगले पेंशन. चांगली गुंतवणूक. मुख्य म्हणजे अगदी अलीकडेपर्यंत त्याच्या बायकोची-जन्मदेची मिळालेली साथ. हां. आता पाच वर्षापूर्वी ती गेली म्हणा. पण तिची पन्नास वर्षे मिळालेली साथ अगदी हेवा करण्याजोगी. जनूकाकांना दोन मुलगे. स्वानंद मोठा. सौरभ त्याच्याहून चार वर्षांनी लहान. सुखी चौकोनी कुटुंब - जनुभाऊ आणि जन्मदा यांना मुलांचा अभिमान. थोडा गर्वही. स्वानंद आता कॅनडाला असतो. पायलट होता. इथून तिथे येरझारा करता करता अंती तेथेच स्थिरावला. त्याची बायको फोनवर छाऽऽन बोलते. पण जन्मदा असतानाही इथे यायला फारशी खूष नसायची ती. त्याची मुलगी तर काय; तिथेच वाढली. शिकली. आवडीचा माणूस सापडला; तसा तिने सॅन होजेला स्व-तंत्र संसार थाटला. जन्मदा गेली होती नातीचे बाळंतपण करायला. दोन्ही वेळा. कारण सूनबाईला एकटीला जमेना. तिची मुले म्हणजे दुधाच्या दुधावरची साय! जनुकाकांची अगदी आवडती. पण त्यांना मराठीच येत नाही. हां! थोडेफार समजते मात्र. 'आऽऽबाऽऽ' असा काहीतरी हेल काढून बोलतात. इथे आलीच नाहीत ना अजून! संवाद सगळा विडियोकॉलवर. स्वानंदचा जावई जेम. की जिम्? मात्र आहे खरंच जेम! नात नाही करत कधी संवाद. आता जन्मदा गेल्यावर तर नाहीच. मात्र हा जिम् कीं जेम मात्र मुलांसह करतो कधीमधी. कारण त्याला आजोबा या नात्याचे अप्रूप आहे. त्याला मॉम् आहे. ती कुटुंबात एकटीच. पण बाबा कधीच मिळाले नाहीत. जनार्दनला हे कळले तेव्हा जेमसाठी आतून अगदी भरून आले. त्यानं मग ठरवूनच टाकलं की हा नातजावई आपला तिसरा मुलगा. पण काय? सगळी दृष्टीआड सृष्टी. तरीही जन्मदा गेल्यावर मनाला आलेले रिकामपण या जेमने भरून काढले. जनार्दन कधी तिकडे गेला नाही. स्वानंदने बोलावूनही कॅनडा त्याला नाही पहाता आला. पण त्याची खंत नव्हती त्याला. कारण स्वानंद कुठलीही जबाबदारी न घेता त्रयस्थ होता. त्यामुळे त्याने बोलावूनही आसासून जावंसं कधी वाटलंच नाही. अन् आता... जन्मदा गेल्यावर तर नकोच वाटलं जाणं.

यामागे खरं कारण सौरभ. त्यांचा दुसरा लेक. पहिल्यापासून बराच लाडावलेला. हुशार होताच तो आईसारखा. पण अगदी लहानपणापासून धाकटा मुलगा म्हणून दोघांनीही त्याचे जरा जास्तच लाड केले. हट्ट पुरवले. हा लहान असताना जनुकाकांना बढती मिळाली; तर तो याचाच पायगुण! स्वानंदच्या मनात अढी बसली. दोघे पाठोपाठचे सख्खे भाऊ. पण त्यांचे कधी पटलंच नाही. स्वानंदने शाळा, कॉलेज गुणांनी गाजवले. पुढे सुरळीत झाले त्याचे. आता तर जावई, नातवंडं यात रमून कॅनडातच त्याचं बस्तान. पण

सौरभ! अडतपडत शिकला. अनेकदा जनुकाकांना पालकसभेला जाणं नकोसं वाटे. सदैव सौरभविषयी तक्रारी. संगतच चुकीची. नंतर नंतर वाढाळू वयात हा लाडावलेला मुलगा दूरदूरच जात राहिला. अभ्यासाच्या नावावर सतत घराबाहेर. जन्मदा याला पाठीशी घालणार. सिनेमा, हॉटेल, पार्ट्या.... करता करता वहावत गेला सौरभ. दारू, सिगरेट, संगत, उधळपट्टी, छानछोकी... कुठेच जर्नादन काही थोपवू शकला नाही. जन्मदेला याने काही म्हणावं; ती म्हणायची, ''कुठल्या जमान्यात आहोत आपण? हल्ली सगळेच पार्ट्या करतात. स्वानंद तिथे गेल्यापासून एकटा पडलाय बिच्चारा. अन् मुलगा आहे तो. धमक आहे त्याच्यात. काऽऽहीही अडणार नाही पुढे. आपण आहोतच ना?'' आईनेच पाठीशी घातलं. मग जनार्दनने बोलणंच संपवलं. पण पुढे पुढे सौरभ श्रीमंताच्या वाया गेलेल्या एकुलत्या एक पोरासारखा अगदीच हाताबाहेर गेला. सराहाशी त्याची लगट अंगाशी आली. इथपर्यंत मजल? जनार्दनला वाटलं की त्याला आता घराबाहेर काढावे. संबंध कायद्यानेच तोडावेत. त्या प्रसिद्ध भावगीतगायकाने नाही का तोडले? ('अरुण दाते'च नं त्यांचं नाव?) पण जन्मदा कळवळली. 'हे हृदय कसे आईचे'! दादापुता करून ती सौरभला आधी राजेन्द्र बर्वेकडे घेऊन गेली. थोडे दिवस उपचारांचा परिणाम झाला. सौरभ जरा घरबश्या झाला. पण बाहेर सराहाशी त्याचे प्रकरण चालूच राहिले. जुन्या सवयी उफाळून आल्या. जन्मदा त्याला मग 'मुक्तांगण' मध्ये घेऊन गेली. तिला प्रामाणिकपणे वाटत होते की, ''आपले संस्कार नाही विसरणार हा पोट्टा.'' स्वानंद तिकडून काही करू शकत नव्हता. करायचेही नव्हते त्याला काही. तो म्हणाला, ''मी हवे तर पैसे पाठवतो. पण इथे माझ्या घरी येऊन तो काय करणार? इथल्या शिस्तीत तो बसणारच नाही. हो; अन् माझ्या बायकोला ते 'बर्डन' वाटतेय.'' म्हणजे आशाच खुंटली. दोन ध्रुवावर दोन मुले. सौरभचे हे वागणे जनू-जन्मदासाठी अवघड जागी दुखणे ठरले. सौरभ कुठेच टिकला नाही. ना मुक्तांगणात, ना मानसोपचार तज्ञाकडे. उलट त्याची व्यसनं आणि मुजोरी वाढतच चालली.

हाय खाऊन जन्मदा गेली. मग जनार्दन अन् सौरभ. दोन ध्रुव... एका घरात. संवाद नाहीच. फक्त वाद नकोत अन् करूनही काही फायदा नाही; म्हटल्यावर तो गप्पच राहू लागला. व्यायाम, चालणे, मिताहार त्याने अधिकच काटेकोर केले. म्हणूनच तर तब्येत छाऽऽन राहिली त्याची. जणू सौरभ नावाचे गळू त्यानं मनातून कापून काढले. स्वत:च बर्वेकडे स्वत:साठी जाऊ लागला. मित्रांना हे माहीत असल्याने म्हणूनच त्याच्या तंदुरुस्तीकडे ते काहीसे हेव्याने, काहीसे नवलाने पहात. सावरला होता तो जन्मदा गेल्यावर.

आयुष्य वाढते तसे प्रश्नांचे स्वरूपही बदलत जाते. आजोबा, पणजोबा या भूमिका त्याच्या अगदी छान, आनंददायी होत्या. पण प्राक्तन दबा धरून बसल्यामुळे वाटमारी करायला ते जणू सज्जच असते. जेम एका अपघातात अचानक गेला... मग स्वानंदही खचला. जनार्दनपेक्षा त्याच्या स्वत:च्या कुटुंबाचे दु:ख आणि संकटाचे सावट त्याला अधिक महत्त्वाचे. बरोबरच होतं ते. कारण त्याच्या बाबांना पैशांची, सोयींची कमी नव्हती. तब्येतीने ते तंदुरुस्तच होते. जनार्दन मग अधिक कणखर झाला. स्वानंदला म्हणाला, ''माझी काळजी नको करूस. तुझ्या मुलीची अन् नातवंडांची काळजी घे. तिला धीराची गरज आहे. जेम फार लवकर गेला.''

जनार्दन एकटेपणी सौरभचे गळू दुर्लक्षित करून छान आयुष्य जगत राहिला. ''जन्मदा गेली, जेम गेला... जायचेच होते ते.'' म्हणत पंच्याऐंशीचा हा उमदा जीव जगण्याचा आनंद घेऊ लागला. बर्वे त्याला धीर देतच होते. पण... पण दबा धरून बसणारे प्राक्तन आणखीच सोकावले.

....आणि एके दिवशी त्याच्या आयुष्यावर दणकन् कुऱ्हाड पडली. सौरभ एक दिवस सराहापासून झालेली त्याची मुलगी घरात घेऊन आला. चांगली सहा-आठ वर्षांची ती सानुली.

## कविता

### समाधान मी यात मानते

**- नलिनी तळपदे**

वार्धक्याने शिणली काया
तरी न भिवविती संध्याछाया
नवी उभारी उमेद इर्षा
देते मजला तुमची माया
समाधान मी यात मानते।।
कलेत नाही कुठल्या मी पारंगत
ना मजपाशी विद्येचे धन
उदंड आयुष्याचे वरदान
अनंत हस्ते देई मजला
तो निराकार निर्गुण
समाधान मी यात मानते।।
अजुनि चिंतामुक्त झोप लागते
रोज उगवतीचा सूर्य पाहते
संसाराचा चढला नाही तवा चुल्ह्यावर
चटक्यावाचून मिळते भाकर
भले कुणाचे चिंतल्यावर
तोंडामध्ये पडते साखर
समाधान मी यात मानते।।
हातामधला पेला
असेनाका अर्धा रिता
अर्धा तर आहे ना भरला
कधीतरी, कधीतरी दोन थेंब यातले
देतील गारवा श्रांत जीवाला
समाधान मी यात मानते।।
आयुष्याच्या उत्तरार्धात
स्नेही सुजनांच्या रूपाने
मला लाभला अनमोल ठेवा
कदाचित देवा,
तुला न कळेल त्याचा गोडवा
सुजनांच्या आपुलकीने
पिकल्या पानांचा देठ
अजुनी आहे हिरवा हिरवा
समाधान मी यात मानते।।

सौरभचा तोंडवळा उचललेली. सराहा म्हणे कुणाबरोबर तरी पळून गेली. तिचे आईबाप म्हणाले, ''हे तुझं नशीब. तू बरोबर घेऊन जा. आम्ही आता थकलो बाबा.'' जनार्दन सुन्नच झाला हे ऐकून-पाहून. या मुलाला नोकरी नाही. दुसरा छंद नाही, संस्कार तर नाहीतच. बापाला मदत नाही. पण हक्कच असल्यासारखा हा जन्मोजन्मीचा दावेदार घरात एक पोर घेऊन आला.

जनार्दन सुन्न झाला क्षणभर. काय करावं या मुलांचं? दोघांनाही घराबाहेर काढावं का? शेजारीपाजारी, मित्रमंडळी, अगदी स्वानंदही; हाच सल्ला देत होती. तो तंदुरुस्त असूनही या दिवसांत आणखी काही वर्षांनी म्हातारा झाला. आधीच उन्हाळा; त्यात हा वळीव!

वळीव अचानक येतो, घरादाराचे - शेताभाताचे नुकसान करून जातो. पण त्यातूनही पुन्हा घर शाकारावे लागते. पडलेली, तुटलेली झाडे तोडून फेकून द्यावी लागतात. गळणारे छप्पर उभारावे लागते. तेव्हाच मग नंतर ऊन निसर्गपर्यटनाला निघते. पण त्याआधीचा पाऊसझडीचा मार...? तो तर सोसावाच लागतो. जनार्दन आणखी म्हातारा होण्याचे कारणच तसे वीज कोसळावे असे होते. सानुली वयानं आठ वर्षांचीच. पण अनुभवानं तिला जग लवकर कळलं होतं. सौरभ जेव्हा नशेत सराहा समजून जवळ आला तिच्या; तेव्हा तिनं आरडाओरड करून आजोबांना उठवलं. लाटणं घेऊन मारमारत त्याला रात्री घराबाहेर या आजोबांनी काढलं. मग सगळी रात्रच जनूसाठी वैरीण झाली. एरवी शांत झोपणारा तो तळमळत होता रात्रभर. पण अखेर रात्रीचा काळोख संपला...

त्यानं तो संपवला. सकाळी उठल्याउठल्या त्याने मनोमन जन्मदाला सांगितलं, ''तुझा धाकटा मुलगा गेला.'' सानुलीला घेऊन तो जवळच्या शाळेत गेला. निवासी शाळा होती ती. तिची वाट तिला शोधून दिली. हेडमिस्ट्रेसना सगळी परिस्थिती सांगितली. सौरभ भेटायला आला तिला तर भेटू द्यायचं नाही; अजिबात असं कागदोपत्री लिहून दिलं. शाळेच्याच वसतिगृहात

तिची सोय लावली. तिला म्हणाला, ''सानुली, घरची सगळी माणसं असून तुला इथं ठेवतोय बाळा. पण घरची माणसं ही माणसं नाहीत बेटा. काहीही लागलं तर मला फोन करायचा.'' सानुली अनुभवानं शहाणीच होती. ती म्हणाली, ''हो आजोबा. आता तुम्ही अन् या बाई हेच माझे सोयरे.''

जनार्दन घरी परतला तर त्याला फारच ताजंतवानं वाटायला लागलं. सगळे प्रश्न संपल्यासारखं. वळीव सरला आता. आता कुण्णाकुण्णात जीव अडकायला नको. नको सौरभमध्ये, नको जेममध्ये.... कारण ही माणसं आता आयुष्यात नाहीतच. सानुली आहे; पण तिचं आयुष्य वेगळं कलम करून दिलंय. ते झाड वाढेल आता. नंतर त्यानं फक्त एकदाच... एकदाच जेमच्या मुलांना फोन केला. त्यांनी 'आऽऽबाऽऽ' म्हटल्यावर जीव शांतावला. त्या शांतावल्या अवस्थेतच मग तो पुन्हा सशक्त, निरामय आयुष्य जगू लागला. एकाकी, पण आनंदी आयुष्य.

हो! आता तो खरंच वयाची जणू शंभरी गाठणार होता. स्वानंद, सौरभ यांची कलमे करून. सानुलीची प्रगती पहात एकटा. पण धडधाकटपणे.

बांडगुळे झाडाचाच रस शोषत असतात. त्यांना छाटले पाहिजे. तरच झाड सळसळत आनंदाने बहरते.

✳



रेखाचित्र: सुधीर कृष्णनाथ आगासकर


With Best Compliments
MICROTROL®
STERILISATION SERVICES PVT. LTD.
The Sterilisation Specialists
MICROTROL

लेख

# प्रभुतरुणाची सेंच्यूरी


**⋆ पं. सुजन राणे ⋆**

न्यू जर्सी, अमेरिका



अभिनंदन. प्रभुतरुणाने शंभरी गाठली. एखाद्या नियतकालिकाच्या इतिहासात ही मोठी गोष्ट आहे. मागे वळून पाहिलं तर याचं महत्त्व पटण्यासारखं आहे. शंभर वर्षांपूर्वी जेव्हा प्रभु तरूण निघाला , तेव्हा कंप्युटर्स, इंटरनेट, व्हॅट्सप ही साधनं नव्हती. अशावेळी वाचकांपर्यंत एखादं नियतकालिक पोहचवायचं हे काम सोपं नव्हतं.

विष्णुपंत कोठारेंनी हे त्यावेळचं अवघड व जिकीरीचं काम मोठ्या हौसेनं पार पाडलं. स्वत:ची वैयक्तिक जबाबदारी बाजूला ठेवून आपलं आयुष्य जणूकाय त्याला वाहिलं होतं. किती मोठा त्याग, किती मोठं कार्य! दर महिन्याला न चुकता नियतकालिक काढायचं, त्याचं संपादकीय लिहायचं, ज्ञातीयांना मिळालं की नाही याची खबरदारी घ्यायची, जातीतल्या घडामोडीबद्दल जिव्हाळा दाखवायचा; ही काही साधीसुधी बाब नव्हती.

त्यात स्वातंत्र्याचा लढा त्यावेळी जोरात चालू असल्यामुळे लोकांचं लक्ष ज्ञातीय विषयाबद्दल मर्यादित होतं. विष्णुपंतानी प्रभुतरुणाचं काम किती मनापासून केलं ही कल्पनाच केलेली बरी. त्यांना शिवशंकर तळपदे, चंद्रमाधव त्रिलोकेकरसारखे सहकारी लाभले होते. हा शंभर वर्षाचा प्रवास कसा झाला याचा विचारच करत बसावंसं वाटते. नंतर तो विष्णुपंतांच्या चिरंजीवांनी बरीच वर्षे चांगला सांभाळला, त्यांच्यानंतर विहंग नायकांनी उत्तमरितीने त्याची काळजी घेतली. सध्या सुहासिनी कीर्तिकर, संजना कोठारे, मयुरा नायक, मिनाक्षी जयकर, वैजयंती कीर्तीकर या सर्वांनी प्रभुतरुणाला भक्कम ठेवलं आहे यात शंका नाही. सुहासिनीबाईंनी अंकाला साहित्यिक श्रीमंती दिली. या शंभर वर्षांला अनुसरून मोनिका राणे अय्यर यांनी कॅलिफोर्नियामधून त्यांच्या मासिक बुलेटिनमुळे प्रभु तरुणाला जागतिक पातळीवर नेऊन ठेवलं. आता प्रभुतरुण मुंबईपर्यंत मर्यादित नसून तो जगाच्या पाठीवर जिथे जिथे पाठारे प्रभु पोहचले आहेत तिथे तिथे तो गेला आहे. पाठारे प्रभुंच्या चालीरिती, जातीतल्या घडामोडी व तरुणांच्या प्रगतीचं प्रभुतरुण उत्तम मुखपत्र झालं आहे. आता हा प्रभुतरुणाचा शंभरीचा प्रवास त्याच्या दुसऱ्या शतकात शिरला आहे. त्याने हा प्रवास अशीच अनेक शतके चालू ठेवावा ही ईश्वरचरणी प्रार्थना करून मी माझा हा छोटासा लेख पूर्ण करत आहे . नमस्कार.


email: panditsujanrane@ gmail.com

**WISH YOU A HAPPY & SAFE DIWALI**
**FROM**



# M/s. Reva Chem - Fab (India)

Plot No. 262, GIDC,
Bhadakmora,
Near Daman Ganga Paper Mill,
Vapi - 396 195

कथा

❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀

# श्रमदान

## ✶ डॉ. सुमन नवलकर ✶

❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀

आई-वडिलांनी 'शिक्षा' नाव ठेवलं, तेव्हा कोणता विचार असेल मनात त्यांच्या? कठोर 'शिक्षा' हा विचार तर नक्कीच नसणार. कारण हिंदी भाषेतच मुळी 'शिक्षा' म्हणजे 'शिक्षण'. उत्तर-प्रदेशातल्या एका छोट्याशा गावात जन्मलेली शिक्षा शिक्षणापासून मात्र वंचितच राहिली. आयुष्य म्हणजे एक कठोर 'शिक्षा'च बनून राहिलं तिच्यासाठी. अगदी बालपणापासूनच. बालपणीच आई गेली. वडिलांनी दुसरं लग्न केलं. मग दुसऱ्या बायकोलाही एक मुलगा झाला. त्याचं नाव ठेवलं 'अजय'-- ज्याला कोणी जिंकू शकणार नाही असा. पण नावाप्रमाणे आयुष्य तर अजयच्या वाट्यालाही आलं नाही. एखादा मोठा राजा-महाराजाच व्हायचा तो. पण वडीलही गेले आणि पाठोपाठ आईही गेली. राहिली ही दोघं एकमेकांची सावत्रभावंडं. एकमेकांचा आधार बनून राहिली, अगदी शिक्षाच्या लग्नानंतरही. हो, जाण्यापूर्वी सावत्रआईने एक पुण्यकर्म केलं. शिक्षाचं लग्न लावून दिलं. थेट मुंबई शहरातल्या गोपीबरोबर. पण काय पाहून? गोपी बालपणापासूनच पोलिओ होऊन अपंग झालेला. त्यालाही वडील नाहीत. आईला वडील गेल्यावर वडिलांच्या जागी नोकरीवर ठेवून घेतलेलं. नोकरीही कसली, तर सफाई-कामगाराची. पण तिने ती निवृत्तीपर्यंत केली आणि आता निवृत्ती-वेतनही मिळतंय तिला. पण शिक्षणाने येणारा डोळस दृष्टीकोन कुठून असणार तिच्याकडे? आपल्या अपंग मुलाला पहिल्या दोन मुली झाल्यावरही, घराण्याला वारस म्हणून, शिक्षाला तिसरं बाळंतपण नको असतानाही लादलं गेलं तिच्यावर. नातू तर झाला म्हातारीला. पण सहजपणे कुठलं सुख मिळेल तर ते शिक्षाचं आयुष्य कसं म्हणता येईल? मुलाला जन्मापासूनच मिरगीचा आजार. त्या तणावात आणि त्या खर्चात शिक्षा सदा बुडलेली.

सासूच्या निवृत्तीवेतनात सात-सात माणसांचा खर्च निघणार कसा? त्यामुळे लग्न लागल्यापासून शिक्षा आमच्या सोसायटीत सफाई-कामगाराचं काम करत होतीच. तीन-तीन मुलं झाल्यावरही किंवा होत असतानाही शिक्षाचं काम कधी सुटलं नाही. उलट खर्च वाढत गेल्यावर शिक्षाने आमच्या बाजूच्या इमारतीत सफाई-कामगार म्हणून काम मिळवलं.

शिक्षाच्या मोठ्या मुलीहून- कविताहून अजय फार-तर तीन- चार वर्षांनी मोठा असेल.

लग्न होऊन शिक्षा मुंबईत आली ती तान्ह्या अजयला बरोबर घेऊनच. शाळेतही घातलं. त्याला बालवाडीत सोडून शिक्षा सोसायटीत कामाला यायची. यथावकाश अजयबरोबर तिची तीन मुलंही शाळेत जाऊ लागली. चार मुलांचं संगोपन, त्यांची शाळा, त्यांच्या ट्यूशन्स. हो, शाळेइतक्याच शिकवण्याही महत्त्वाच्या होल्या. घरचे सगळे निरक्षर. शाळेतल्या शिक्षकांनी 'मुलं शिकवणीला जातातच,' हे गृहितच धरलेलं. त्यामुळे मुलं वरच्या वर्गात जायला हवी असतील, तर शिकवणी अपरिहार्यच. शाळेला सुट्टी असली की मुलं सोसायटीत कामाला यायची. लोकांची बेल वाजवून

कचरा घेऊन मोठ्या कचराकुंडीत टाकायचा, कुठे थोडासा जिना झाडायचा, कुठे सोसायटीचं कंपाऊंड झाडायला शिक्षाला मदत करायची-- अशी कामं करायची. कधी जिने धुतले, तर तळमजल्यावर साचलेलं पाणी उपसायला त्यांचा हातभार असायचा. पण लवकरच बाल-कामगार प्रतिबंधक कायद्याने जोर धरला आणि सोसायटीने शिक्षाला मुलांना बरोबर आणायला बंदी केली. असंही धाकट्या संजयला स्वत: शिक्षानेच कचऱ्याच्या कामाना न्यायची बंदी केली होती. डॉक्टरांनीच सांगितलं होतं, 'त्याला मिरगीचा आजार आहे. कचरा किंवा कचऱ्याशी संबंधित कामं केली तर त्याला पटकन कुठल्याही आजाराचा संसर्ग होऊ शकतो.'

अजय मात्र मधून-मधून यायचाच. पहाटे-पहाटे खूप लवकर यायचा. सोसायटीचं कंपाऊंड, जिने झाडायचं मोठं कष्टाचं काम सोसायटीच्या सदस्यांना जाग यायच्या आधीच करून जायचा. पळवाटा कुठेही शोधता येतातच. शिक्षा- अजयनेही त्या शोधल्या होत्या. दिवस रेटले जात होते.

'आज तर शाळेचा दिवस आहे ना? आज कसा काय आलास तू?' कधी-मधी मधल्या वारीही अजयने कचरा घ्यायसाठी बेल वाजवली, तर मी विचारायचेच. 'आज नाही गेलो शाळेत.'

'का रे?'

'दीदीला एकटीला करावं लागतं ना सगळं?'

अजयलाही अभ्यासाचा कंटाळाच होता. बहुतेक मुलांना असतोच. मी शाळेत असताना मलाही होता. पण शाळेचं-शिक्षणाचं महत्त्व वेळोवेळी पटवून देणारे आई-वडील होते. अजयला फक्त एक दीदी होती. ताकदीपलीकडे काम करणारी दीदी. तिला कोणाचीही मदत मिळाली, तर हवीच होती.

असाही अजय तब्येतीने नाजूकच. पण उंचीने ताड-माड वाढला होता. मधेच कधीतरी दीदीचं दुर्लक्ष होण्याचा फायदा घेत अजयने शाळा सोडली आणि दोन्ही सोसायट्यांचं कंपाऊंड झाडायचं काम अजयने पूर्णपणे अंगावर घेतलं. अजयच्या वाढत्या उंचीचा गैरफायदा घेत सोसायटीवाल्यांनीही त्याला आणण्यास मनाई करणं सोडून दिलं आणि सोसायट्यांच्या कामाचा ताण अजयमुळे कमी झाल्यावर शिक्षानेही एक घरकाम पकडलं.

...मग अचानकच शिक्षा कामाला येईनाशीच झाली. अशीही ती सुट्ट्या घेण्यात वाकबगार होतीच. पाऊस खूप पडला की सुट्टी. सर्दी झाली की सुट्टी. डोकं दुखलं की सुट्टी. ताप आला की नक्कीच सुट्टी. नणंदेकडे गेली आणि तिथेच राहिली की सुट्टी. एकदा तर म्हणाली 'तोंड आलंय' म्हणून आले नाही. तोंड कसं आलं, तर म्हणे गरम चहा प्यायले त्याने भाजलं. तोंड येण्याचा आणि तिच्या या कामाचा तसा संबंधच काय? हॉटेलमधल्या चव बघणाऱ्या टीम्स असतात, तिथे काम करत असती तर गोष्ट वेगळी. सफाई कामगाराचा तोंड आल्याने कामाला न येण्याशी काय संबंध? माझं आश्चर्य चेहऱ्यावर दिसलं असणार. म्हणाली, 'तोंड आल्यामुळे काही खाऊ शकत नव्हते, त्याने अशक्तपणा आला.' या वेळी तर ती अचानक कामाला येईनाशीच झाली होती.

आठवड्याभराने अजय यायला लागला. 'काय झालं रे?'

'जीजा गया.'

'काय? कशाने?' मी चकित होऊन ओरडलेच.

'कुछ नहीं हुवा था. डाक्तर बोला हाड अटॅक.'

...मुलं मोठी होत चाललीत. पण शिक्षा वयाने लहानच आहे. असेल चाळीशीची. म्हणजे नवरा असेल पंचेचाळीस... मी मनातल्या मनात नोंद घेतली. एव्हाना अजयने कामाचा पूर्ण ताबा घेतला होता. सोसायटीवाल्यांनीही अजयला गृहीत धरायला सुरुवात केली होती आणि अजयने कामात चालढकल करायला.

रोज जिने झाडणं केव्हाच इतिहासजमा झालं होतं. आमच्या 'ए विंग'ला तरी लिफ्ट आहे. जिन्याशी आमचा संबंध दाराच्या पुढ्यातल्या

भागापुरताच येतो. पायऱ्यांशी संबंध तसा नगण्यच. अजयने एक दिवस आड.. दोन दिवस आड.. करत- करत फक्त रविवारी जिने झाडायचा पायंडाच पाडून टाकला. आठवड्याभराचा कचरा जिन्यात साठून राहायला लागला. इमारत तशी सहा मजलीच. त्यामुळे एखाद्या माळ्यावर लिफ्ट उघडी राहिली आणि जिने चढा-उतरायची वेळ आली, तर जिन्याभरातले कचऱ्याचे पुंजके डोळ्यांना त्रास देऊ लागले. 'मॅनेजिंग कमिटी मेंबर्स'च्या घरांच्या पुढ्यातले चौक झाडायचे आणि बाकी ठिकाणी दुर्लक्ष करायचं, अशा पळवाटाही अजयने एव्हाना शोधून काढल्या होत्या . तरी त्यातल्या त्यात ओला आणि सुका असा वेगवेगळा कचरा तो आवर्जून नेत असे. पण शिक्षाला तर तेवढं करणंही जड जायचं. 'आज पाऊस आहे. कचरा ओला होणारच आहे. मग ओला-सुका वेगवेगळा नेण्यात काय अर्थ आहे?' तिच्याकडे उत्तरं तयार असायची.

मी तिला म्हणालेही, 'तू ना हल्ली आळशी होत चालली आहेस. आम्ही कचरा वेगवेगळा बांधून ठेवतो आणि तू एकत्र घेऊन जातेस?'

दु:खाचं, अपमानाचं एक सावट तिच्या डोळ्यांत गढूळलं आणि लगेच स्वत:ला सावरत ती म्हणाली, 'हो, आता मुलं मोठी झालीत. मीही म्हातारी झालेय ना? म्हणून आळशी झालेय मी.'

पण शिक्षा खरंच आळशी झालेली दिसत होती. दोन्ही मुली अनिता आणि सुजाता बारावी झाल्या होत्या. मिरगीच्या आजारपणातून डोकं वर काढून संजयही दहावी झाला होता. शिक्षा कसा काय संसारगाडा रेटत होती कोणास ठाऊक?

तिचा नवरा गेला तेव्हा माझ्या मनात आलं होतं, 'बरं झालं, खाणारं एक तोंड कमी झालं. असाही अपंगच होता. काम तर काहीच करू शकत नव्हता. आपल्या अशा मुलाचं लग्न करून देऊन, त्याच्या आईने शिक्षावर मोठाच अन्याय केला होता.' पण शिक्षाचं सांत्वन मी केलं होतं, तेव्हा ती म्हणाली होती, 'माझ्या नवऱ्याचा मोठा आधार होता मला. काम करू शकत नव्हता, पण मुलांकडे लक्ष असायचं त्याचं. मुलांनाही धाक होता, की नीट नाही वागलं, अभ्यास नाही केला, तर बाबा ओरडतील. आता मुलांना धाकच राहिलेला नाही.'

'सासू का कधी येत नाही गं तुझ्या मदतीला?' असं मी एकदा विचारलं, तर म्हणाली, 'घरचं बघते. मला घरात खूप मदत आहे तिची. आता थकलीय वयाप्रमाणे. पण बसून राहात नाही. तिचापण तरूण मुलगा गेला ना? पण आपलं दु:ख बाजूला ठेवून उभी राहिली पुन्हा.' शिक्षासारख्या बाईचे कान भरणं, मोठं कठीण काम. आपण काही बोललं, तर री ओढणार नाही ती कधीच. आपली सासू, आपला नवरा सगळ्यांविषयी प्रेम तिच्या मनात. परिस्थितीने इतकी गांजलीय, पण त्याचा दोष घरच्याना द्यायला तयार नाही.

घरचं सासू बघते. दोन सोसायट्यांचं अजय बघतो. ही नुसती आळसावतच चाललीय. एक घरकाम धरलंय, ते तेवढं करते जाऊन. बिचारा अजय मात्र त्या जिमखान्याचं काम धरलंय, तेही जाऊन करतो. सावत्र असला तरी भाऊच आहे ना हिचा? दया कशी येत नाही हिला? अजय तर आपल्या दोन-दोन सोसायट्यांची कामं करून एका मोठ्या जिमखान्याचं कामही करतो. मध्यंतरी अतीश्रमांनी सारखा-सारखा आजारीही पडायचा. पण हिने जे कॉलनीतल्या कामासाठी येणं सोडलंय ते सोडलंय. जिमखान्याला रविवारी रजा असते. तर तेव्हा अजय कॉलनीचं कंपाऊंड, जिने असं सगळं झाडत दुपारी बारापर्यंत एकटाच धडपडत असतो. पण शिक्षा रविवारीही गैरहजरच असते.

मग परवा अचानक लिफ्ट बंद पडली. जिने उतरणं-चढणं नशिबी आलं. मग अडथळ्यांची शर्यत सुरू झाली. कुठे जिना आपल्याच मालकीचा समजून फेकलेला कचरा, बाटल्या, रिकामी शहाळी आणि पहाटे पहाटे अजयने बेल वाजवून झोपेचं खोबरं करू नये, म्हणून जिन्यात रात्रीच काढून ठेवलेले कचऱ्याचे डबे. त्यांच्या बाजूने फटीतून

कविता

## सगळं कसं नॉर्मल - नॉर्मल आहे...

**- श्रेया तळपदे**

सगळं कसं नॉर्मल - नॉर्मल आहे.
ही घरं, शहर, माणसे
काही बोलकी, काही अबोल.
सगळीकडे सगळंच कसं नॉर्मल-नॉर्मल आहे. राजकारण, समाजकारण, ह्याला कारणं, त्याला कारणं, माणसं संपतील पण कारणं नाही.
प्रत्येकाकडे दुखण्याला, खुपण्याला, हसण्याला, रडण्याला, समजण्याला, समजावण्याला कारण आहे.
कारण, सगळं कसं नॉर्मल - नॉर्मल आहे.
मग माझ्याकडे का नाही कारण? नव्हतेच का कधी? की सापडले नाही?
शोधले नाही मी कशाचेच कारण. भावनांना, स्वप्नांना, प्रेमाला मी दिलेच नाही कारण....
बापरे! मग सगळं नॉर्मल कसं असेल माझ्या बाबतीत?
मनाच्या तळाशी थोडासा संशय, भीती, दु:ख, यातना, याचं शेवाळ जमा झालंय.
हे शेवाळ काढलं तर होईल का हो सगळं नॉर्मल - नॉर्मल इतरांसारखं?

---

मार्गक्रमण करत सकाळी दूध आणेपर्यंत चिडून मेंदूचा साफ भुगा. त्या दिवशीही नेहमीसारखा अजयच आला कचरा घ्यायला. सहा मजले चढायचेत हे आदल्या दिवशी त्याने सांगितलंच असणार ना शिक्षाला! मग मी सकाळचा राग काढलाच त्याच्यावर.

'जिना झाडणं बंदच केलंय का रे तुम्ही लोकांनी? तुझी बहीण तर इतकी आळशी झालीय. सगळं काम तुझ्यावर सोपवून मोकळी झालीय. एक कोणाच्या घरचं काम करतेय ते केलं की मोकळं झालं. का नाही येत रे ती?'

'वेळच मिळत नाही ना दीदीला. वरकाम करते ना चार घरचं! हल्ली मम्मी पण खूप थकलीय. घरचं सगळं पण दीदीलाच करावं लागतं. जेवण बनवायचं, भाजीपाला आणायचा, बाकी सामान आणायचं, पाणी भरायचं...' तो बडबडत होता.

माझं डोकं मात्र पहिल्याच वाक्यापाशी थिजलं होतं... 'वरकाम करते ना चार घरचं!' आणि मी समजत होते की ती एकाच घरचं काम करते. स्वत:च्या घरचं धरून पाच घरचं काम? बापरे! श्वास घ्यायला तरी फुरसत मिळत असेल का तिला? आणि आपण जिना झाडायसाठी अडून बसलोय !

दुसऱ्या दिवशी सकाळी दूध आणायला जाण्यापूर्वीच मी आमच्या मजल्यावरच्या तीन घरांच्या पुढ्यातली जागा झाडून स्वच्छ केली. कचरा कागदाच्या पुरचुंडीत बांधून कोपऱ्यात ठेवला. झाडू धुवून झटकून तिच्या नेहमीच्या जागेवर ठेवली. आणि मगच गेले दूध आणायला. आजपासून हे अधिकचं काम मी अंगावर घेतलंय रोजच्यासाठी.

मोठमोठ्या संस्थांना दान देतो आपण. पैसे दिले- मोकळं झालं. आजपासून मी हे 'श्रमदान' मनावर घेतलंय. सोसायटीच्या व्हॉटसॲप ग्रूपवरही टाकलंय... 'आपण आपापला मजला झाडला तर? शिक्षासाठी ही श्रमदानाची शिक्षा.' कोणी मला वेड्यात काढेल. कोणी माझं म्हणणं खोडून काढेल. कोणी प्रतिकार करेल. कोणी प्रश्नचिन्ह उभं करेल. पण लिफ्ट काय बंद पडली, माझे डोळेच उघडले.

...हल्ली आमचा पूर्ण जिना स्वच्छ असतो. श्रमदान करायला लागल्यापासून मुळात जिन्यात कचरा टाकणंच बंद झालंय. आपल्याला नको झालेलं शिळं अन्न गरिबाला देण्यापेक्षा त्याच्या पाठीवरचं श्रमांचं ओझं थोडं हलकं करणं, हीच गरिबांची सेवा नाही का?

मो.८७७९१९४०४२

*

लेख

❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀

# SHAMMI KAPOOR - UNKNOWN

**✶ RAJAN JAYKAR ✶**


❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀

I am an ardent fan of Shammi Kapoor since 1960 when I had bunked school and saw his most famous film "Junglee" at Roxy Cinema. Incidentally that was the first Hindi film which I saw, since coming from an orthodox family, me and my siblings used to be taken to see some of the Hollywood landmark films such as Ten Commandments, Ben Hur etc. I was so impressed by Junglee when I was in IX standard and immediately became his fan and repeated the school escapade again in 1961 to see his next hit film "Professor", which was released at Alankar Cinema, very close to Wilson High School. These two films made me a confirmed fan of Shammi Kapoor and thereafter while in college I not only saw his next films but also most of the old films at matinee show.

From film magazines, I realized that he had given 18 consecutive flops between 1953 till 1957 before "Tumsa Nahi Dekha" was released. That made me do a little research on Shammi Kapoor's film life. Prior to "Tumsa Nahi Dekha" in 1959 he underwent a dark period of four years when his every film flopped. I decided to check out what Shammi Kapoor's personality was before joining film industry in 1953 and why his initial films flopped. Shammi Kapoor was



born on 21st October 1931 to his famous father Prithviraj Kapoor and his mother Ramsarni. Between his elder brother Raj Kapoor and himself there were two other brothers who died in infancy. Shammi Kapoor in fact was born in Calcutta, since his father had been extensively travelling in different parts of India with the troupe of Prithvi Theatre, which produced famous plays. After coming to Bombay he switched many schools and finally did his S.S.C. from New Era High School. He wanted to become an Aeronautical Engineer and therefore he took admission in Science faculty at Ruia College. When his father realized that




instead of joining Prithvi Theatre, his son wanted to take formal College education, he advised him not to waste his time and instead join Prithvi Theatre in place of Raj Kapoor, who had quit Prithvi Theatre and started acting in Hindi films, with his debut film "Neelkamal" in 1946. Subsequently Raj Kapoor started his own R.K. Films in 1948.

Within the first six months, Shammi Kapoor realized that his lofty goal of pursuing college education was only a dream and he was more seen in the college canteen than in the class room. Finally he took the advice of his father and joined Prithvi Theatre on a salary of Rs.50/- per month and acted in 5 plays viz. Deewar, Pathan, Gaddar, Ahooti and Kalakaar. Some of the plays were staged at Royal Opera House.

Shammi Kapoor used to visit the sets of R.K. Films particularly during lunch time for a free meal. Once he saw Nargis crying in a corner on the set of R.K.'s famous film Barsat. It appears that her family had forbidden her from further acting in any of R.K. films, because of her close association with Raj Kapoor, a married man. Shammi Kapoor asked Nargis as to what was wrong and she said that she wanted to act in the next film "Awara", which was recently announced and there was a rumour that Raj Kapoor may not take her in that film. Shammi Kapoor said that he will pray that she gets the lead role in that film. Nargis promised that if that happens she would give him a kiss. As the fate would have it, Nargis was chosen for Awara. It was a great hit. When Shammi Kapoor met Nargis after sometime, he reminded her about her promise. However Nargis said that now he was a big boy and could not give him a kiss, but he should ask for something else. Shammi Kapoor asked for a gramophone. Nargis immediately took him in her Sunbeam Convertible to Flora Fountain and bought a gramophone from H.M.V. shop. She then further took him to Rhythm House and asked him to choose any 20 records. To her surprise Shammi Kapoor chose Western Classical and Western Pop, Rock and Jazz music. Shammi Kapoor was a great fan of Elvis Presley and he started practicing dance steps on the recently acquired 78 r.p.m records. Incidentally Shammi Kapoor had taken lessons in Indian classical music from Pandit Jagannath Prasad, who was a music teacher to K.L. Saigal and Mukesh. The teacher was actually employed for teaching Shammi Kapoor's

mother Ramsarni and Raj Kapoor. But after Raj Kapoor started his R.K. Films, Ramsarni persuaded Shammi Kapoor to take lessons from the Pandit.

After Shammi Kapoor turned 18 years, he was allowed to purchase a Fire Arm for doing Shikar in the wild. Shammi Kapoor was a voracious reader and slowly he had assembled his personal library. Before entering the film industry Shammi Kapoor's personality had developed around certain characteristics. He was a Shikari which means he was adventurous and an outdoor person. Being a voracious reader he had knowledge of the happenings in the outside world and was matured. He was fond of diverse music such as Indian and Western Classical, Rock and Pop music. He could dance on western Pop, Rock and Jazz music. In other words he was a complete all-rounder with all attributes of becoming a good actor, since he had acted in Prithvi Theatre plays. Mahesh Kaul saw his performance in the Prithvi Theatre play "Kalakaar" and "Pathan" and offered him a lead role in his film "Jeevan Jyoti".

Let us see the films in which he acted between 1953 and 1957.

(1) His debut film "Jeevan Jyoti" did not have a single solo or duet song for the hero except that S.D. Burman made him sing two lines in his own voice in a duet with Asha Bhosle. The film had Chand Usmani, as heroine, who was also making her debut.


(2) The next film was "Rail Ka Dibba". Although it had beautiful Madhubala in the lead, it was released before Jeevan Jyoti. Four individuals staying




in a rail carriage was not a clinching theme and inspite of some beautiful songs to the tune of Ghulam Mohammad, the film flopped.

(3) Next film was Thokar, which had Shyama as heroine and although there was a famous song "Aye Game Dil Kya Karu" sung by Talat Mehamood, there was no other song for the Hero. The music was by Sardar Malik.

(4) "Laila Majnu" had Nutan as heroine and the story did not evoke any excitement among the public and as there were multiple films made with the same title since 1931 and there was no novelty or charm on the same subject. It had some melodious songs by Mohammed Rafi and Talat Mehamood, but that was not enough




for the success of the film.

(5) Next film was "Gul Sanobar". It again had Shyama as heroine.

(6) There was great expectation in the next film "Shama Parwana" with the singing actress Suraiya in the lead. Inspite of lilting music by Husnlal Bhagatram, excellent Suraiya's solos and duets with Mohammed Rafi, the film flopped.

(7) "Mehbooba" was the first film of Shammi Kapoor with Nalini Jaywant as the heroine. It initially had Roshan as Music Director and he gave music to four songs, 3 solos by Lata Mangeshkar and one duet of Lata Mangeshkar and Talat Mehmood. It appears that there was some dispute during the making of the film between the Producer and Director K. Amarnath and Roshan which resulted in Roshan being replaced by O.P. Nayar, who by then, had become extremely popular music director. He gave music to the balance five songs, consisting of 3 solos by Shamshad Begum and two duets between Shamshad Begum and Mohammed Rafi. This switch over of music directors also did not result in the fate of the film and this film also flopped.

(8) The most disastrous film was "Ehsaan". This film had Shammi Kapoor's father Prithviraj acted as his elder brother and Munawar Sultana as the heroine who was eight years older than Shammi Kapoor. Because of the break up between the heroine and hero Prithviraj Kapoor, Shammi Kapoor had to marry Munawar Sultana. The film did not have a single song for either of the male actors and inspite of best efforts of Madan Mohan, the film badly flopped.

9. "Chor Bazar" had two heroines Sumitra Devi and Chitra. There was song by Talat Mehmood "Tere Darpe Aaya Hoon" which was earlier featured word by word in film Laila Majnu. The common factor being the same actor Shammi Kapoor, same Music Director Sardar Malik and same Producer P.N. Arora. So there was no question of copyright violation. Except for the said song by Talat Mehmood, there was no other song for the Hero and the two heroines had five songs by Lata Mangeshkar and Shamshad Begum. This film also flopped.

10. "Tangewalli" was an admixture of a few leading actors of that time. Balraj Sahni and Nirupa Roy were the lead

pair and Shammi Kapoor and Anita Guha as supporting actors. It was a film with social message. However except for few duets between Lata Mangeshkar and Mohammed Rafi, Geeta Dutt and Mana Dey and Lata Mangeshkar and Hemant Kumar, there was nothing in the film of any consequence and the same also flopped. Shammi Kapoor acted as younger brother of Balraj Sahni.

11. Second film with Madhubala was "Naqab". The Producer and Director *Lekhraj Bhakri* initially had named it as Niqab with Usha Kiran as the heroine. Somewhere down the line the name of the film and heroine was changed. It was supposed to be a suspense film and with pretty ladies consisting of Madhubala, Asha Mathur and *Yashodhara Katju,* the film flopped.
12. "Miss Coca Cola" was the first film with Geeta Bali, his future wife. Hero barely had two duets. None of them became popular and inspite of music by O.P. Nayar, the film did badly.
13. Another film which disappeared without any trace was "Daku" with Shashikala as the heroine. Uninspiring music by Snehal Bhatkar and the historical subject of the film itself was responsible for its downfall. It was more of a negative role for the hero and Shashikala, who always had a subsidiary role, was seen as leading lady. The film was meant to be a flop.
14. "Sipah Salar" was a war oriented film with the famous vamp of Hindi film, Nadira, was the heroine and Kum Kum and Helen in supporting role.




Music by Iqbal was ordinary and although it was Shammi Kapoor's friend F.C. Mehra's film, the same also flopped.

15. "Rangin Raten" was the second film with Geeta Bali, but she was not in a lead role. When the Producer Director Kedar Sharma finalized his cast, he had engaged Mala Sinha as the heroine and Chand Usmani as her sister in the film. When Geeta Bali came to know that Shammi Kapoor was acting in the film, she went to Kedar Sharma, who was supposed to be her good friend and requested him for a role in the film. However, Kedar Sharma expressed his inability to accommodate her in the cast, since the leading ladies were already finalized. Except minor role of the heroine's brother, rest of the cast had


already been selected. Geeta Bali decided that she would act as heroine's brother in the film by wearing male clothes and also putting on a fake mustache. Kedar Sharma reluctantly accepted her request and Geeta Bali did the role of Heroine's brother all throughout. As the shooting was outdoor in the hills of Ranikhet, Shammi Kapoor and Geeta Bali fell in love, during the shooting.

16. It is for the first time that Shammi Kapoor acted in a negative role in the film "Mem Sahib" which had Kishore Kumar and Meena Kumari in the lead role. Shammi Kapoor's character dies in the film. Shammi Kapoor had two very popular songs in the form of duet between Talat Mehmood and Asha Bhosle. Inspite of the star cast and lovely music, the film did not do good business.

17. "Hum Sab Chor Hain" was supposed to be a comedy film directed by I.S. Johar and music by O.P. Nayyar. The film was received well but still could not be a hit at box office. Ameeta had a side role in the film.


18. Another insignificant film and the third with Shyama was "Mirza Sahibaan". It had music by Producer and Music Director Sardool Kwatra. It was supposed to a historical film but turned out to be a flop.

19. The fourth film with Shyama being "Maharani" was also a historical film and had Music by Basant Prakash, the younger brother of Khemchand Prakash. Very ordinary songs and ordinary performance resulting in another flop. Shyama informed me that it was sheer bad luck that all the



four films done with Shammi Kapoor resulted in flops.


20. Shammi Kapoor kept on proposing to Geeta Bali for an early marriage. However Geeta Bali being much more popular than Shammi Kapoor in the film industry and the sole bread earner of her fatherless family which had two mentally challenged brothers, did not want to take the plunge thinking what would happen to her family. On 23rd August 1955, while both were staying in the same Juhu Hotel, while shooting for separate films, Geeta Bali suddenly told Shammi Kapoor they should marry now. Shammi Kapoor said his parents were out of Bombay and after they return they could have a grand wedding but Geeta Bali insisted that they had to marry immediately. Shammi Kapoor in panic contacted his best friend Johnny Walker who had few days ago ran away and married Noor. Johnny Walker told him that we being Muslim, we married by going to Kazi. Similarly you should go to a Temple and get married. The Hari Walia, Producer of "Coffee House" in which both Shammi Kapoor and Getta Bali were acting and the shooting was in progress, suggested that they could go to Baan Ganga where there were many temples. Accordingly closed to midnight Shammi Kapoor and Geeta Bali went to Baan Ganga and woke the Pujari of the temple. Since the temple had closed by then, the Pujari informed him that the Gods had gone to sleep and that they should come early next morning. Promptly they came with Hari Walia as the witness next morning and the Pandit got them married in the temple with seven pheras. Geeta Bali gave her lipstick to Shammi Kapoor who instead of Kum Kum used it for filling her "maang". They returned home and only Shammi Kapoor’s Grandfather Basheswar Nath was present, who congratulated and blessed them and thereafter a grand reception was held on the return of the other members of the family. Geeta Bali decided not to act in any new films unless it had Shammi Kapoor as the Hero. Over a period of time, she finished all her pending assignments to become a housewife and shortly a mother of son Aditya and daughter Kanchan.




I did some research as to why his early

films flopped and came to the following conclusion :

1. Most of films had Historical, mythological and Royal Politics as the themes, which did not go down well with the audiences.
2. His roles in those films were directly opposite to his persona as adventurous and music oriented hero, who did not get any suitable role.
3. Many of those films either had no songs for him or very few insignificant songs as compared to the songs coming to the share of his heroines and none of the songs had any scope for dancing to the tune of the music.
4. Quite a few of the heroines were senior to him by age and also by stature and the pair looked odd on the screen.
5. Most of the roles were sad and serious and audience could not identify him as tragedian. He was considered as clone of his elder brother Raj Kapoor in looks as well as in acting but could not match his performance or popularity.
6. Talat Mehmood was considered best bet for tragedy oriented films and had been a play back singer for Dilip Kumar and Dev Anand in sad songs. However Talat Mehmood was backed by renowned music Directors such as Naushad for Dilip Kumar and S.D. Burman for Dev Anand. Shammi Kapoor did not have such fixed playback singer during his flop years. Rafi came much later as his sole voice.
7. In those days there was no such designated Music Directors for Shammi Kapoor although O.P Nayar




had given the music to quite a few of his flopped films. Shankar Jaikishan came much later with hit film "Ujala" but during flop period, most of his films had music directors, who could not rise to the level of famous music directors such as Naushad, S.D. Burman, C. Ramchandra with the only exception of O.P. Nayyar.

8. By comparing his early flop career with his first super duper successful film, one can understand what was lacking in those early films. Filmistan had decided to produce "Tumsa Nahi Dekha" The partner of filmstan, Tolaram Jalan, wanted to introduce Ameeta as full-fledged heroine and they had decided to engage Dev Anand as hero. It had music by O.P. Nayyar. Dev Anand had just given successful films like Paying Guest and Taxi Driver. However Dev Anand refused the offer saying that he would not act with a debuting heroine. Mukherjee, the other partner of Filmistan requested change of heroine but Jalan stood his ground and suggested changing the hero. The question was who would fit into the role. Mukherjee suggested Shammi Kapoor but Nasir Hussain, who was also making his debut as a director, objected to Shammi Kapoor, since he was branded as flop hero. But Mukherjee told Nasir Hussain that he was a different type of person in real life and he should talk to Shammi Kapoor. Shammi Kapoor being frustrated with repeated flops had decided to leave film industry and take up a job of Tea Estate Manager




at Assam. However his wife Geeta Bali persuaded him to give last chance to the offer of Filmistan and asked him to change his appearance by removing his moustache and taking a crew cut. The film had six songs containing three solos by Rafi and three duet between Rafi and Asha Bhosale. Lilting music by O.P. Nayyar and full scope for shaking the body and dances and new Shammi Kapoor was born and he never looked back. Good luck, patience, perseverance and good advice can turn your fortunes from misery to success.

✳


१००
१९२३ ते २०२३
विष्णू कोठारे, सुहास कोठारे, विहंग नायक, सुहासिनी कीर्तिकर

कथा

# ओनली साऊथ इंडियन

## ✶ नंदकुमार विजयकर ✶

फोर्टचा परिसर. एका इन्शुरन्स कंपनीचं ऑफिस. संध्याकाळचे पाच वाजायला आले होते. खुर्च्या सरकवल्या जात होत्या. फायली गोळा करणं, कपाटं बंद करणं अशी सगळी आवराआवर चालली होती.

'ए रेखा, आटोपलं का नाही तुझं?'' प्रियानं पलीकडनं विचारलं, ''काय गं?''....

''हां, अगं, एक पाच मिनिटं. हे स्टेटमेंट पुरं करते. तू आवर सगळं.''

प्रिया आणि रेखा गेली पाच वर्षे त्या सेक्शनला एकत्र काम करत होत्या. तशा त्या कॉलेजपासून मैत्रिणी. पण प्रिया लग्नानंतर अहमदाबादला स्थायिक झाली. ती अहमदाबादच्या ऑफिसमध्येच कामाला होती. पण जेव्हा तिच्या नवऱ्याने मुंबईला स्वत:चा कन्सल्टंसी बिझनेस सुरू करायचा निर्णय घेतला तेव्हा प्रियानेदेखील मुंबईला बदली करून घेतली. बऱ्याच काळाने दोघींची भेट झाली. रोज संध्याकाळी काम आटोपलं की दोघी समोरच्या रेस्टॉरंटमध्ये चहा-नाश्ता घेत आणि मग चर्चगेटला लोकल पकडायला जात. आजही त्या नेहमीप्रमाणे तिकडे आल्या. ते रेस्टॉरंट त्यांच्या अत्यंत आवडीचं. तिथे काय मिळत नव्हतं? महाराष्ट्रीय पदार्थ सोडून सगळं काही. म्हणजे चायनीज, इटालीयन, मेक्सिकन, नॉर्थ इंडियन, साउथ इंडियन, गोअन सगळं काही. त्यांच्या ओळखीचा एक वेटर अत्यंत अदबीने पुढे आला.

''मॅडम, काय आणू? ग्रील्ड सॅण्डविचेस चालतील?'' तो वेटर कधी कधी स्वत:हून काही शिफारस करी. या दोघी कधी हो, तर कधी नाही म्हणत. ''नको. त्याला वेळ लागेल. असं कर, पॅटीस आणि चहा आण.'' प्रियाने ऑर्डर दिली.

''अगं रेखा, उद्या आपण लंचला इथेच येऊ या.''

''का गं? काही विशेष?''

''काही नाही गं. डब्यातलं खाऊन कंटाळा आला. आणि हो, उद्या डबा आणू नकोस.''

❋ ❋

लंच टाईम. डबा घेऊन कँटीनकडे जाण्याची सर्वांची घाई. ''प्रिया, चल लवकर. नाहीतर जागा मिळणार नाही.'' असं म्हणून रेखाने ड्रॉवरमधून डबा काढला.

'अगं. काय हे?''

''काय म्हणजे?''

''अगं. बाहेर जाणार होतो ना आपण, डबा काय आणलास?''

''ओह! सॉरी. आता?''

''आता तो डबा नाचरेला दे.''

डबा देऊन दोघी हॉटेलमध्ये आल्या.

''प्रिया चायनीज मागवू या का?''

''नको. कंटाळा आला. आज मेक्सिकन ट्राय करु या.''

मग नॅचोज, सालल्सा सॉस, एन्सिलादा असं बरंचसं काही मागवलं.

''अगं प्रिया, विचारायचं विसरलेच. तुझी नम्रता हैद्राबादला जाणार होती ना?''

''अगं कालच आली.''

''जाऊन आली? कशी काय झाली ट्रिप?''

## ‘वात्रटिका’

### चित्रकार

त्याचं तसं झालंय हल्ली बऱ्यापैकी नाव.
चित्राखालचं नाव पाहून चित्रं खपतात राव.
बाळ त्याच कागदांवरती रेघोट्या ओढतं,
‘त्याची’ म्हणून खपतात आता ‘ती’ देखिल चित्रं.

**-डॉ. सुमन सुवर्णकुमार नवलकर**

‘‘भेटलीय कुठे ती मला? उद्या पुण्याला जाणार आहे. टेबलटेनिसची मॅच आहे. त्याच गडबडीत होती. मला तर काही कळतच नाही. घरात पाय ठरेल तर शपथ. एकदा लग्न करून सासरी गेली का मला हायसं वाटेल.’’

‘‘बरं झालं तू विषय काढलास ते. म्हणजे बघ हं, तुला पटत असेल तर सांगते.’’ एवढं बोलून रेखा गप्पच बसली.

‘‘काय गं? थांबलीस ती?’’

‘‘नाही, माझा करण एम.डी. करतोय. त्यानंतर तो फॉरेनला जायच्या गोष्टी करतोय. त्याआधीच त्याचं लग्न करावंसं म्हणते. माझ्या मनात असा विचार आला की नम्रताची आणि करणची जोडी छान शोभेल.’’ आता गप्प राहण्याची पाळी प्रियाची होती.

‘काय आहे रेखा, कल्पना चांगली आहे. पण मांजराच्या गळ्यात घंटा बांधणार कोण? आमचं ध्यान इतकं भयंकर आहे, ताडताड बोलते आणि निघून जाते. आता तिला एम.बी.ए. करायचं आहे. लग्नाची गोष्ट काढली तर फाडून खाईल मला.’’

‘‘तुझ्याकडे ही तऱ्हा. आमच्याकडे वेगळाच प्रकार. करण एक नंबरचा घुम्या. आपण त्याच्याशी काही बोलतोय हे त्याच्या गावीही नसतं. मित्र आले की मात्र खुलून गप्पा चाललेल्या असतात. आता ह्यांनाच सांगते त्याच्याशी बोलायला!’’

‘‘मी बोलून बघते. नम्रताचं काही सांगता येत नाही. हे असते तर बरं झालं असतं.’’

‘‘कुठे गेलेत सुभाष?’’

‘‘अगं, ते टूरवर आहेत. महिनाभर तरी लागेल त्यांना परतायला. नाही, पण मी बोलेन नम्रताशी.’’

❋ ❋

डायनिंग टेबलवर डिशेस पुसून ठेवल्या होत्या. प्रियाने फ्रीज उघडून थंड पाण्याचा जग बाहेर काढला. सगळी तयारी केली आणि मग नम्रताला हाक मारली. ‘‘नमू, चल लवकर जेवण थंड होईल. नम्रता, ए नम्रता,’’ ‘‘अगं हो, किती बोंबाबोंब करतेस? फोनवर बोलत होते ना मी? आणि हे काय, बाबा नाहीत?’’ ‘‘अगं, काय हे नम्रता? बाबा टूरवर गेलेत. माहीत आहे ना तुला?’’ ‘‘अरे हो, विसरलेच बघ, चल वाढ लवकर.’’

‘‘नमू, एक विचारू का? लग्नाबद्दल काय विचार केलायस?’’

‘‘कुणाच्या?’’

‘‘अगं, कुणाच्या काय? तुझ्या! हे बघ, माझी मैत्रीण रेखा....’’

‘‘हं, रेखा मावशी, तिचं काय?’’

‘‘तिचा मुलगा करण एम.डी. करतोय. एम्.डी. झाल्यावर तो अमेरिकेला जाण्याच्या विचारात आहे. जाण्याआधी त्याचं लग्न करायचं असं रेखा म्हणत होती.’’

❋ ❋

रविवारची संध्याकाळ. चार वाजले होते. नम्रता झकपक तयार होऊन बाहेर आली.

‘‘आई मी जाऊन येते.’’

‘‘एवढ्या लवकर? मैत्रिणीकडे?’’

‘‘छे गं. करणची अपॉईन्टमेंट आहे.’’

आणि काही बोलायच्या आत निघूनसुद्धा गेली. प्रिया आ वासून बघतच राहिली. चला, प्रश्न मार्गी तर लागला. रेखाला फोन करावा का? नको... उद्या भेटूच.

लंच टाईम. ‘‘प्रिया, डबा आणलायस?’’

‘‘अगं, आज डबा घरीच विसरले. बाहेर जाऊ या का?’’

''बरं चल.''

''अगं खूप बोलायचं आहे.''

''मला पण.''

दोघी धावतच हॉटेलमध्ये गेल्या.

''मॅडम, आज आपण खुशीत दिसता?''

''हो, आज आम्ही जरा जास्तच खुषीत आहोत.''

''मग काय आणू? इटालियन मेन्यू चांगला आहे.''

मग पास्त्याची ऑर्डर गेली. दोघीही एकदम -

''अगं, कमाल झाली.''

''थांब, आधी मला सांगू दे.'' रेखा बोलू लागली.

''करणने कधी फोन केला होता कोण जाणे. काल दहा वाजेपर्यंत बाहेर होते दोघे.''

''हो ना, अगं ही पोरगी चारला बाहेर पडली. साडेदहापर्यंत पत्ता नाही. परत आली तेव्हा हसत होती.''

''काय गं रेखा, एवढा वेळ काय बोलणं चाललं होतं?''

''प्रिया मला वाटतं हे लग्न जमणार.''

''लेटस् होप सो. पण आपण काही विचारायचं नाही. त्यांनाच सांगू दे.''

''हो ना, दोघे भेटायला तयार झाले हे काय कमी आहे.''

❋ ❋

''अगं, मग मला काय विचारतेस? करुन टाक.''

''तुलाच विचारलंय. म्हणजे तू आणि करण एकमेकांना पसंत असलात तर....''

''करु की!''

''म्हणजे तू लग्नाला तयार आहेस?''

''असं कुठे म्हटलंय मी? आधी आम्ही एकमेकांना भेटू-बोलू. मग काय तो निर्णय घेऊ.''

''बरं. मग मी तुमची भेट ठरवते.''

''ए, असं काही करु नकोस. त्याचा फोन नंबर दे. आम्ही ठरवू.''

## 'कणिका'

### आरक्षण

यांचे आरक्षण,<br>
त्यांचे आरक्षण,<br>
भगवंताने करावे<br>
माणुसकीचे रक्षण!

**- सुहासिनी कीर्तिकर**

कधी एकदा ऑफिसला जाऊन रेखाशी बोलतेय असं प्रियाला झालं होतं. पण रेखा तिच्या नेहमीच्या गाडीला नव्हती. ऑफिसमध्येही दिसली नाही आणि नंतर लंचटाईम होईपर्यंत उसंतच झाली नाही.

''काय गं प्रिया, आटोपलं की नाही?''

''रेखा? होतीस कुठं?''

''अगं आज उशीर झाला. चल लवकर.''

दोघी कँटीनमध्ये गेल्या. गेल्या गेल्याच प्रिया बोलली. ''अगं, एकदम सरप्राईज. नम्रता तयार झाली. म्हणजे अग, ती करणला भेटणार आहे. मला तर वाटलं, ही एकदम धुडकावून लावेल. मला धक्काच दिला तिनं. तुमच्याकडची काय खबरबात?'' ''त्यानं तर आमचा अंत पाहिला. मी आणि हे दोघेही त्याला रात्रभर विचारत होतो. पण एक शब्द बोलेल तर शपथ. शेवटी हे चिडून म्हणाले, 'आता यापुढे हा विषय काढणार नाही.' काही बोलला नाही. सरळ उठून झोपायला गेला.''

''मग?''

''मग काय, सकाळी मात्र मला म्हणाला, भेटायला तयार आहे.''

''वा! मग प्रिया आता दोघांना ठरवू दे. जास्त त्यांच्या मागे लागता कामा नये.''

''अरे देवा! मी केवढ्या टेन्शनमध्ये होते.'' रेखानं एक विश्वास टाकला.

''ठीक आहे गं. हल्लीची मुलं त्यांना जे

आवडेल, पटेल तेच करणार. आपला जमाना गेला.''

ह्या गोष्टीला महिना उलटून गेला. रेखा आणि प्रिया हाताची घडी तोंडावर बोट ठेवून फक्त वाट पाहत होत्या. काही बोललं तर 'बना बनाया खेल' बिघडून जायचा. शुक्रवार संध्याकाळ - ऑफिस सुटल्यावर दोघीही नेहमीच्या रेस्टॉरंटमध्ये गेल्या.

''मॅडम, भेलपुरी, पानीपुरी, आयटम् चालू केला आहे.''

''हो? वा! छान. मग दोन भेलपुरी.''

''काय गं प्रिया, करणचा फोन आला होता का?''

''काल तुमचा फोननंबर मागत होता. नम्रता काही बोलली?''

''नाही.''

''रेखा खरं सांगू का? ही पोरं आपला अंत पाहत आहेत.''

आणि एका संध्याकाळी करणसाहेब बोलते झाले.

''आई-बाबा, मी मुलगी पंसत केलीय'' रेखाला आपल्या काळजाचा ठोका चुकतो की काय असं वाटलं.'' काय म्हणतोस, म्हणजे नम्रता....''

''आधी ऐकून घे. तिचं नाव आहे जया. साउथ इंडियन आहे. माझ्याच बरोबर शिकत होती.''

चला, करणने सोक्षमोक्ष लावला. पण आता प्रियाशी काय बोलायचं याचा रेखाला प्रश्न पडला. तिच्या बोलण्यावरून नम्रताचा रिस्पॉन्स पॉझिटिव्ह होता. ऑफिसमध्ये रेखा कामात अगदी गुंग होती. म्हणजे तसं ती दाखवत होती. मनात मात्र प्रियाला कसं भेटायचं हाच विचार चालू होता. लंच टाईममध्ये प्रियाच धावत आली. ''रेखा, चल बाहेर जाऊ या.'' आणि रेखा मुकाट्यानं प्रियाच्या मागून चालू लागली. हॉटेलमध्ये बराच वेळी दोघी स्तब्ध बसल्या. वेटर दोनदा येऊन गेला.

''प्रिया, सॉरी.''

''कशाबद्दल?''

'अगं, करणने त्याच्या कॉलेजमधल्या मुलीशी लग्न ठरवलंय.''

''कोण आहे मुलगी?''

''मी पाहिली नाही. साउथ इंडियन आहे.'' हे ऐकून प्रिया जोरात हसायलाच लागली.

''अगं हसते, काय? नम्रता माझी सून झाली असती तर फार बरं झालं असतं. मीच हे प्रपोजल तुझ्यापुढे ठेवलं आणि आमच्याकडूनच तुझी निराशा झाली. शिवाय नम्रताच्या मनातदेखील होकार असेल नाही?''

''एक मिनिट रेखा, तुला करण काही बोलला नाही का?''

''काय?''

''अगं, पहिल्याच भेटीत त्या दोघांनी एकमेकांना निवड सांगून टाकली होती. नम्रता जेव्हा खुशीत घरी आली होती तेव्हा आम्हालाही वाटलं तिला करण पसंत आहे म्हणून. पण कालपर्यंत तिने आम्हाला ह्याची काही कल्पनाच दिली नव्हती. अगं, काल दुपारी दोन वाजताच आली. ''आई, बाबा उठा.'' मी तिला म्हणाले, 'अगं नमू आज रविवार आहे. थोडं पडू दे.'' ''ते काही नाही. बरोबर पाच वाजता तयार रहा. आपल्याला हॉटेलमध्ये जेवायला जायचं आहे. ते एक सरप्राईज आहे.तुम्ही तयार रहा.' आम्ही हॉटेलमध्ये गेलो. तिकडे तो होता.''

''तो?''

''विजय.''

''विजय?''

''विजय अय्यर. नम्रतानं ओळख करुन दिली. तिची निवड अगं, एकदम त्याच्यासमोर आम्हाला उभं केलं. आम्ही काय बोलणार? हे मात्र त्याच्याशी बराच वेळ बोलत होते. कंप्युटर इंजिनिअर आहे. दिसायला ठीक आहे. थोडंफार मराठी बोलतो. मघाशी तू साउथ इंडियन म्हणालीस ना, म्हणून हसू आलं.

''बरोबर आहे तुझं म्हणणं.''

''मॅडम काय आणू? आज पंजाबी घेणार का?''

''नो.'' त्या दोघी एकाच वेळी एकाच सुरात ओरडल्या.

''ओनली साउथ इंडियन.''

*

कथा

# मोतीराम

**✶ हेमंत विनायकराव तळपदे ✶**

महादू आता आणखीनच वेगाने चालू लागला. शेतावर काम करुन तो दमला होता. तसे पाहता त्याच्याजवळ जेमतेम दीड एकर शेती होती. आणि ही शेती तो व त्याची बायको मिळून करत असत. काही भागात त्याने तांदळाचे पीक घेतले होते. तर इतर भागात मुख्यत्वे उसाची लागवड केली होती. या व्यतिरिक्त डाळी, शेंगा, कांदे, बटाटे ही पिकेही तो थोड्याफार प्रमाणात घेत असे.

महादूचे नशीब चांगले होते. त्याची पत्नी रखमा एका श्रीमंत शेतकऱ्याची मुलगी होती. चार बहिणींमध्ये ती थोरली होती. करारी होती. तिला एक भाऊही होता. तिचे वडील मुंडेसाहेब पंचायत समितीचे सदस्यही होते. त्यांची जवळपास ८० एकर बागायती व जिरायती शेतीही होती. पण तरीही मुंडे साहेबांनी रखामासाठी महादूसारख्या सामान्य शेतकऱ्याची निवड केली. कारण महादूचा सालस स्वभाव त्यांना चांगलाच परिचित होता. आपली मुलगी महादूबरोबर चांगला संसार करेल हा त्यांचा विश्वास योग्यच होता. महादू-रखमाचा संसारही सुखाने चालला होता. त्यांच्या लग्नाला सहा वर्षे उलटली होती आणि या संसार वेलीवर बायजा व रघू ही दोन पुष्पे उमलली होती.


महादू जवळजवळ धापा टाकतच घरी पोहोचला. दिवसभर शेतात काम करून तो थकला होता. त्याच्या आणि रखमाच्या मेहनतीमुळे शेतात रोपे डौलाने डुलत होती. पण मूळ समस्या वेगळीच होती. रात्रीच्या वेळी शेतात गाई गुरे, बैल रवंथ करण्यास येत त्यामुळे शेतीचे नुकसान होईल म्हणून महादू व रखमा आपल्या दोन्ही बछड्यांना झोपवून शेतात दर दोन तासांनी रखवाली करण्यास येत असत. तेव्हा महादूची विधवा आई त्याच्या दोन्ही मुलांचा सांभाळ करत असे.

आज आमावास्या होती. रात्रीचा अंधार गडद होत गेला अन् आठ वाजण्याच्या सुमारास सारा गाव शांत झाला. या गावच्या लोकांचे जीवनच वेगळे होते. पहाटे पाच वाजता त्यांचा दिनक्रम सुरू होई आणि रात्री आठ वाजता सर्वजण झोपी जात. नेहमीप्रमाणे महादू व रखमा भोजन करून शांतपणे पहुडले. पण रात्री १२.०० वाजता ते दोघेही शेतात फेरटका मारण्यासाठी तयार झाले. महादूने हातात एक जाडजूड बांबू घेतला. रखमाने तिचा अंबाडा घट्ट केला व ती नाखुषीने शेतात जाण्यासाठी उठली. दोघेही १० मिनिटात शेताजवळ आले आणि पाहता पाहता दोघांचेही डोळे शेतातील दृष्य पाहून आपोआपच मोठे झाले.

कारण शेताच्या मध्यभागी लावलेली रोपे इकडेतिकडे मुळासकट उपटली गेली होती. आणि त्या साफ केलेल्या जागी एक मोठी शेगडी धगधगत होती. त्या शेगडीवर एक मोठे ताजले ठेवलेले होते. शेगडीमध्ये लाकडाबरोबर अनेक हाडेही जळत होती आणि ती शेगडी मोठ्या दिमाखात पेटलेली होती. इतकेच काय; त्या ताजल्यामध्ये रक्तासारख्या रंगाचा एक द्रवपदार्थ उकळत होता आणि त्या ताजल्याच्या बाजूला एक इसम मोठा पळ हातात घेऊन तो ताजल्यामधील लालसर द्रव ढवळत होता आणि एक दुसरा इसम एका मोठ्या सुरईमध्ये तो द्रव भरत होता. तर काही इसम तो द्रव एका मोठ्या पातेल्यात घेऊन

पीत होते आणि धुंद होऊन नाचत होते.

''ही माणसे कोण? आणि रात्री पिंपळाच्या झाडाजवळ शेतात नक्की काय करत आहेत? यांना कोणी बोलावले?'' असे अनेक प्रश्न महादू व



**रेखाचित्र: सुधीर कृष्णनाथ आगासकर**

रखमाला तत्काळ पडले. पण दोन-पाच मिनिटात ते स्थिरावले व त्या माणसांना निरखू लागले. तसे पाहता ती माणसे शुद्धीत नव्हतीच. ती अचकट विचकट हावभाव करत होती. दोन्ही हात उंचावून नाचत होती. मध्येच जमिनीवर गडाबडा लोळत होती. मोठमोठ्याने किंचाळत होती. एकमेकांना धक्के मारत होती आणि खाली पाडत होती. महादू अन् रखमाने असे दृष्य कधीही पाहिले नव्हते. ते खरोखरच भांबावले. पण नंतर सावध झाले. त्यांनी बारकाईने निरीक्षण केले असता त्यांना त्या माणसांबाबत फरक जाणवू लागला. ती माणसे नव्हतीच मुळी. ती भुते होती. त्यांचे चेहरे विचित्र होते. चेहऱ्यावरचे हावभाव विचित्र होते. ती हसत होती. कोणी रडत होते. तर कोणी विव्हळत होते. पण एक मात्र खरे; त्या स्थितीत ती भुते बेफाम होऊन नाचत होती. रक्तासारखा दिसणाारा तो द्रव एकमेकांना पाजत होती. तो द्रव एकदम उकळता होता; पण त्यांना काहीही फरक पडत नव्हता. जणू काही तो द्रव म्हणजे त्यांचे जालीम टॉनिकच होते.

महादू व रखमाला प्रथमत: काय करावे हेच सुचत नव्हते. दोघेही खरोखरच खूप घाबरले. पण महादूच्या मानाने रखमा जास्त धाडसी होती. ती पटकन सावरली. तिने इकडेतिकडे पाहिले. महादूच्या हातात जाडसा बांबू होता. पुढचा कोणताही विचार न करता रखमाने तो बांबू खेचून घेतला व शेताचे कांडे ओलांडून ती त्या भुतांच्या समुहाकडे धावली. महादू ''रखमा ऽऽ रखमा, वेडबिड लागलंय काय? अगं परत ये. ती भुते आहेत.'' असे ओरडत सुटला. पण रखमा तेवढीच धाडसी होती. तिने तो बांबू हातात धरला आणि त्या भुतांच्या पाठीवर तिने धाडधाड वार केले. अचानक झालेल्या या हल्ल्याने ती भुते बिथरली व इकडेतिकडे पळू लागली. रखमा मात्र मिळेल त्या भुताला त्या बांबूने बदडू लागली. ती भुते त्या पिंपळाच्या झाडाखाली एकत्र झाली व तेथून रखमाला विचित्र आवाज व हावभाव करून घाबरवू लागली. रखमा खूपच संतापली. तिने एकाच लाथेने ती उकळती कढई उलटवली आणि त्या शेगडीवर माती

## 'वात्रटिका'

### पाहुणा

'प्रमुख पाहुणा' म्हणून येतं त्याला आमंत्रण .
शाल-श्रीफळ-पुष्पगुच्छ, यांवर होते बोळवण.
देऊन येतो संस्थेला तो देणगी किती हजार,
आता कपाटात भरल्यात फक्त शाली भारंभार.

**-डॉ. सुमन सुवर्णकुमार नवलकर**

टाकून ती पूर्णपणे विझवली. शेगडी विझताच सगळीकडे अंधार पसरला आणि ती सर्व भुते पिंपळावर पळाली. महादू धावतच पुढे झाला. त्याने रखमाला धरले. ''रखमा आता ती सर्व भुते पळाली आहेत. आता शिवीगाळ करू नकोस. घरी चल. उद्या सकाळी बघू.'' असे म्हणून त्याने रखमाला घरी आणले. रखमा रागातच होती. घरी येताच तिने तो बांबू कोपऱ्यात उभा केला. आता दोन वाजले होते. महादू व रखमा केव्हा झोपले हे त्यांनादेखील कळले नाही.

सकाळी सहा वाजता रखमा जागी झाली. महादू देखील जागा होता. रखमाने सगळ्यांसाठी चहा केला व तो पिऊन ती एकटीच शेतावर निघाली. तिने हातात एक काठी घेतली होती. तिला पिकांची काळजी वाटत होती. कारण त्या धान्यावरच त्यांचा उदरनिर्वाह होता. ती घाईघाईने शेतावर आली. पण तिथे आल्यावर तिचे डोळे विस्फारले. कारण शेतातील पिके तिथे डौलाने मिरवत होती. पिंपळाची पाने सळसळत होती. भट्टीचा मागमूसही नव्हता. पालथे पडलेले पातेलेही नव्हते वा तेथे पालथ्या पातेल्यातून पडलेल्या लालसर द्रवाचे डागही नव्हते.

रखमा थोडी हादरली. काल पाहिले ते नक्की काय? तिने पिंपळाकडे पाहिले. एकाही भुताचा मागमूसही नव्हता. म्हणजे, ''काल पाहिले ते स्वप्न तर नाही ना?'' तिने स्वत:शीच विचार केला आणि महादू भेटल्यावर सर्व काही स्पष्ट होईल असा विचार करून ती घाईघाईने परतली.

## 'वात्रटिका'

### खोडणं जास्त

लिहिणं कमी, खोडणं जास्त, खोडून फाटायचं पान,
पेन्सिलपेक्षा रबराशीच तिचं जमायचं छान.
स्मार्टफोनवर लिहिते आता, डुलकी जाते लागून,
बॅकस्पेसवर जातं बोट, वाक्यं जातात पळून.

**-डॉ. सुमन सुवर्णकुमार नवलकर**

महादू तिच्या काळजीतच तिची वाट पहात होता. येताच रखमाने सर्व प्रकार महादूला सविस्तर सांगितला. महादू संभ्रमात पडला. पण आपल्या दोघांना एकच स्वप्न पडले असावे असे त्यांना वाटले. शेवटी तो विषय इथेच संपवू असे त्यांनी ठरवले.

त्यांचा दिनक्रम नेहमीप्रमाणे सुरू झाला. तरी रखमाच्या मनात रात्र झाल्यावर पुन्हा एकदा शेतावर जावे हा विचार घोळतच होता. सांज सरली आणि रात्रीचे जेवण उरकल्यावर रखमाने भांडी घासली. ती शेतावर जाण्यासाठी तयारी करू लागली. महादू मात्र दिवसभराच्या कामाने दमला होता. तो पटकन झोपी गेला. मुले व आईदेखील झोपली. रखमा एकटीच जागी होती. तितक्यात घरावर टकटक झाली. रखमा चपापली. रात्रीचे बारा वाजले होते. यावेळी कोण आले असेल? हा विचार तिच्या मनात आला. पण ती धाडसी होती. तिने दरवाजाचा अडसर दूर केला. अन् पहाते तर काय; बाहेर एक धूसर आकृती उभी होती. रखमाने त्याला ''कोण तुम्ही?'' असे विचारले. तो म्हणाला, ''मी मोतीराम. तसे पाहता मी महादूचा पूर्वज आहे. काल तू आमच्यावर अचानकपणे हल्ला केलास. बऱ्याच भूतांना तू बांबूने चोपलेस. त्या धांदलीत त्या बांबूमध्ये आमचे केस अडकले. तुला माहित नसेल; पण आमची खरी ताकद त्या केसांमध्येच असते. म्हणून मी ते केस परत मागायला आलो आहे. देशील ना आम्हाला ते केस?'' रखमाला हे सर्व माहीत नव्हते. ती म्हणाली, ''इथेच थांब. मी बांबू बघते.'' आणि रखमा घरात बांबूकडे वळली. आणि खरोखरच त्या बांबूला भुतांचे बरेचसे केस अडकले होते. ते केस फारच लांब आणि करड्या पिवळ्या रंगाचे होते. रखमाने ते केस बांबूतून सोडवले. ते एकूण १२ केस होते. रखमा बाहेर आली आणि मोतीरामला म्हणाली, ''मोतीराम मी तुम्हाला तीन-तीन केस देईन पण त्या बदल्यात तुम्हाला माझेही भले करावे लागेल. पण मला एक सांगा, मी जेव्हा बांबूने तुमच्यावर आघात करत होते तेव्हा तुम्ही भुते असूनही का पळालात?'' यावर मोतीराम मंदपणे हसला व म्हणाला, 'रखमा महादू आमचाच वारस आहे. आणि आम्ही त्या शेतात तुमची परवानगी न घेता जमलो होतो. त्यामुळे आम्ही तुला किंवा महादूला इजा केली नाही आणि दुसरे म्हणजे आम्ही जरी भूतयोनीमध्ये असलो तरी चांगल्या मनाचे आहोत. आता तुला त्या तीन केसांबद्दल काय हवे ते सांग मी तुझी इच्छा पूर्ण करीन. मला उशीर होत आहे. माझे भाईबंद काळजीत असतील.''

यावर रखमा विचारात पडली. पण तिने ठरवले व म्हणाली, ''मोतीराम, मला आमच्या झोपडीच्या जागी या रात्रीच्या प्रहरात एक टुमदार बंगला हवा.' हे तीन केस तुम्ही घेऊन जा, पण उद्या सकाळी मी बंगल्यात उठायला हवी. यावर मोतीराम म्हणाला, 'रखमा आम्ही तुझी इच्छा पूर्ण करु. सकाळी तू चमत्कार बघच.''

झाले; सगळ्या पंचक्रोशीत महादूच्या बंगल्याची चर्चा सुरू झाली. अनेकजण महादूचा टुमदार बंगला पहाण्यास धावत आले. पण रखमाने महादूला कोठेही काहीही बोलू नकोस असे समजावले होते. यानंतर पुढील तीन केसांच्या मोबदल्यात रखमाने शेतीसाठी नवीन अवजारे व ट्रॅक्टरही घेतला व त्यानंतर तीन केसांच्या मोबदल्यात घरात सोन्याच्या नाण्यांनी भरलेला हंडाही घेतला. रखमाला आता रखमाबाई व महादूला आता महादूशेठ म्हणून ओळखले जाऊ लागले. त्यांची मुले छान छान कपडे घालू लागली. आईला पांढरे नऊवारी लुगडे आले. घरात नोकर

चाकर आले. सर्वजण सुखावले.

पण आता शेवटचे तीन केस उरले. रखमा बेचैनच होती. कारण मोतीरामने तिला सर्वकाही दिले होते. ‘‘आता या बदल्यात आपणही या भूतयोनीबद्दल काहीतरी चांगले करावे.’’ हा विचार तिच्या मनात घोळत होता. पुढील रात्री मोतीराम आल्यावर रखमाने त्याला विचारले; ‘‘मोतीराम आता शेवटचे तीन केस उरले आहेत. मला वाटते की तुमच्या संपूर्ण भूतयोनीला मोक्ष मिळावा. मी काय करावे बरे?’’ हे ऐकून मोतीराम आनंदला. तो पटकन म्हणाला, ‘रखमा, तुझे चांगले विचार ऐकून मी खरोखरच खूष आहे. एक काम कर. त्या तीनही केसांना तुझ्या देव्हाऱ्यातील पिंजर लाव आणि आमच्या भूतयोनीला मुक्ती दे अशी देवाजवळ प्रार्थना कर आणि मग ते तीनही केस माझ्या अंगावर उडव. बघ काय होते ते.’’

रखमाने तसेच केले आणि ते तीनही केस देवाच्या गाभाऱ्यातील पिंजरात बुडवले आणि मोतीरामच्या अंगावर भिरकावले. अन् नवल ते काय मोतीरामची ती धूसर आकृती हळूहळू अनंतात विरुन गेली. त्यानंतर महादू व रखमाचा संसार आनंदाने बहरला. इति.

मो. ९८२१६०७५९३

✳

---

## अभिनंदन

मराठी चित्रपटसृष्टीतील चतुरस्त्र अभिनेते, दिग्दर्शक, निर्माते श्री महेश अंबर कोठारे यांना यंदाचा ‘गंधार गौरव’ पुरस्कार जाहीर करण्यात आला. १४-११-२३ रोजी पुरस्कार प्रदान सोहळा ठाणे येथील गडकरी रंगायतनमध्ये साजरा करण्यात येईल. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री श्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते हा पुरस्कार देण्यात येणार आहे. यावेळी मंचावर सार्वजनिक बांधकाम मंत्री श्री रवींद्र चव्हाण, ज्येष्ठ संगीतकार अशोक पत्की, अभिनेते विजय गोखले आणि आमदार श्री आशीष शेलार यांची उपस्थिती असेल.


**!! प्रभुतरुणास दीपावली शुभेच्छा !!**



**सौ. अंजली व श्री. सुधीर मोरेश्वर कोठारे**



रेखाचित्र: सुधीर कृष्णनाथ आगासकर

लेख

# पर्जन्यसूक्त

✶ सुश्री मुकुला राणे नवलकर ✶

आभाळाला आज भरून आलं आहे. क्षितिजापाशी तरं ते अधिक हळवं झालं आहे. दिशा भावार्द्रतेने झाकोळल्या आहेत. एरव्ही खोडसाळपणे शीळ घालणारा वारा, आता मात्र पानापानांत दडून बसला आहे. स्तब्ध अचल झाडांवर पाखरे बिलगून विसावली आहेत. ज्याने आपल्या येण्याचा सांगावा धाडला, म्हणून हा बहावा आंगोपांगी फुलला आहे; त्या अभ्यागताची वाट... अवघा संमोहित परिसर, मोठ्या आतूरतेने पहातो आहे!

आणि पहाता पहाता... अजस्त्र रानटी हत्तींचा विराट कळप बेधुंद होत चाल करून यावा तद्वत, काळे काळे जलभारले मेघ, सुदूर आभाळात चढू लागले. त्यांचे आकार क्षणोक्षणी बदलत आहेत; ज्यातून कुंद आकाश निमिषमात्र आरेखित होते आहे. बेभान कलंदर ढग पाहून पानांत लपलेला बिलंदर वारा सुसाट सुटला आहे. झाडेझुडपे लवून घुमू लागली आहेत. त्यावर बसलेली भयचकीत पाखरे,

पुन्हा एकदा फांद्यांवरच येऊन स्थिरावत आहेत. मेघांच्या चढाईत उठणाऱ्या विद्युतलोळाने कोंदलेल्या दिशा, क्षणभर उजळून जात आहेत... आणि घनगंभीर मेघगर्जनांनी आकाशाची नि:शब्द पोकळी दुमदुमून गेली आहे. येणार येणार म्हणत,सारा अधीर परिसर, ओठंगून ज्याच्या प्रतिक्षेत होता, तो आता येऊन ठेपला आहे.

क्षणाक्षणाने कंपित होणारी सुधीर उत्कंठा आता शिगेला पोहोचली आहे. मनामनातील अस्वस्थ.. अंतस्थ उर्मी, उचंबळून येत आहेत. कणाकणातील गळाभेटीची उत्कट इच्छा, हृदयांत उसळते आहे आणि तो आला. वाजत गाजत आला. सरसर झेपावत धारा बरसू लागल्या. सरीवर सरी कोसळू लागल्या. तृषार्त धरित्री त्याच्या सजल स्नेहात चिंब न्हाऊ लागली. अवघी सृष्टी त्याच्या स्पर्शाने रोमांचित झाली. पर्जन्यभेटीचा सुगंध आसमंतात दरवळू लागला. धरेसह सारा आसमंतही उल्हसित झाला.

तो आला..!!

आंदोलित स्वरांच्या सजल ताना लीलया फिरवीत, जणू सघन मल्हार आला. रूप... रस... स्पर्श आदी तन्मात्रांचा जागर घालीत, नादमयी शब्दांना... गंधीत करीत तो आला आणि येताना ... मूलबंधातील रेशीम नात्यांची वीण जपत पूर्व संचिताचा वसा घेऊन आला.

तो आला..!!

कवी कुलगुरुंच्या मुरब्बी दूतासोबत, त्याचा सखा सहचर होवून आला!

शब्दप्रभूंची साद स्मरत, नवथर मन्मथ आपला प्रतिभाविलास उधळीत, रिमझिम रिमझिम झरत आला.

तो आला..!!

धरित्रीची अस्मिता जपण्यास,घनश्यामाची मुद्रा घेऊन तो महाबली आला! की...

सृष्टीतील सनातन रासक्रीडेत रमण्यासाठी तो लडिवाळ,निळासावळा नाथ आला!

तो आला आणि आला तेव्हा येताना...

भूमीसाठी नभाच्या निर्व्याज प्रेमाचे, सांद्र आर्जव

## ‘कणिका’

### एकटीच अंती

भरून आले आकाश,
झाकोळला प्रकाश;
भरून आल्या खंती.
भरभरून जगताना
ती एकटीच अंती!

- **सुहासिनी कीर्तिकर**

घेऊन आला. धरेच्या सुजला सुफला सुरुपाला नवलाईचा नजराणा घेऊन आला. धरणीवर,असीम विशालतेची सृजन बीजे रुजू घालायला,..तो आला.

तो आला... विरहोत्कण्ठीत तनांमनांना सचैल न्हाऊ घालीत... अमला निर्मितीचे आंतरिक शांतवन करीत परितोषसंपन्न जीविका आंदण घेऊनच आला

तो आला म्हणून सप्तलोकांचे सप्त सोपान आपला रंगीतपट उलगडू लागले. राकट कणखर उघडे डोंगर पोपटी हिरवाईचे मार्दव लेवून खुलले. उत्फुल्ल वृक्ष आणि प्रफुल्लीत वेली हर्षभराने डोलू लागल्या. खळाळते निर्झर,नवतेचे उत्स्फूर्त गान गाऊ लागले. इवली इवली गवती फुले सभोवार उमलून आली आणि त्यांवर रंगीली फुलपाखरे स्वच्छंद बागडू लागली. कोकिळकंठी सुस्वर पंचम उमटला आणि उंच केकारवासह मोरपिसारा फुलून झुलू लागला. दिवसा पाकोळ्यांचे समूहनृत्य अन् भ्रमरांचे वृंदगान तर; चिंब ओलेत्या काजळ.. रात्रीत जीवज्योती काजव्यांचे लुकलुकते संमेलन भरू लागले. पर्जन्य अवतरणाचा महोत्सव अवघ्या निसर्गात सानंद साजरा होवू लागला.

तो आला,जसा येतो तसाच...!

कधी वेळी, कधी अवेळी, कधी वेळेआधीच तर कधी वाट पाहून शीणल्यावर! पण तो येतो तेव्हा फक्त त्याचचं अधीराज्य असतं.

तो येतो तेव्हा फक्त त्याचीच सत्ता असते. तो येतो तेव्हा,फक्त तो असतो... बाकी सारे मिटून जाते. तरीही त्याचा सहवास नेहमीच साऱ्यांना हवासा वाटतो. त्याचे बेफिकीर येणे,..आल्यावर साऱ्यांना आपल्या तालावर नाचविणे, नाचत गात बेहोषीत,अवघे भान हरपून जाणे या त्याच्या मनलुभावन शृंगाराचे,साऱ्यांनाच एक सुप्त आकर्षण आहे. त्याचा धुसमुसळता जुलूम सोसण्यात एक और मजा असते.

त्याच्या या अशा येण्याने,मोहरलेल्या लवथवत्या अनयवेळी... रतिमदनकाळी ओलेत्या सृष्टीचा विलोभनीय अभिसार बहरु लागतो.

सारं काही नयनरम्य. मनमोहक, अद्भूतरम्य!

पुन्हा पुन्हा घडावे.. पुन:पुन्हा घडवावे, पुन:पुन्हा अनुभवावे असे. म्हणून तर त्याने असेच अनवरत येत रहावे, अविरत देत रहावे... देतादेता सृजनांचे बीज रुजवून जावे! असा नवउन्मेषाचा सोहळा निरंतर रंगत रहावा... असेच साऱ्यांना वाटते. पण हाय,एक दिवस नवरसात भिजलेली ही रंगीन अस्मानी क्रीडा आवरती घेत तो परत निघतो. जसा येताना घुमत येतो, तसाच जातानाही पडघम घुमवीत जातो. पाणावलेली सृष्टी आणि तिचे गहिवरले सहचर, आपल्या क्लान्त श्रान्त तनामनाची समजूत घालून त्याला निरोप देतात... आणि अपूर्णतेची हूरहूर लावत,परंतु पुनर्भेटीची अभिलाषा जागवत,

तो माघारी जातो...

आकाश आता मोकळं आणि हलकं असतं. क्षितिजापाशी उगीच जरासं झुकून असतं. निरभ्र दिशा... उजळ अन् प्रसन्न असतात. तृप्त सुशांत वत्सल धरा,आपले संततीचे विहीत व्रत आणि नवतेचे ब्रीद जपत सुखाच्या हिंदोळ्यावर आंदूळत असते. परम आनंदाच्या या तरल क्षणी,हृदयस्थ कृतज्ञतेने,...अवघे चराचर लीन असते.

आणि तेव्हाच तो खोडसाळ वारा पुन्हा एकदा शीळ घालू लागतो!

*

लेख

❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀

# The Golden Journey

**✶ Achala Subhash Desai ✶**

❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀

There's a lovely melody playing on the radio...

नववधू प्रिया मी बावरते...

Beautiful composition by भा. रा. तांबे.

These words have taken me down memory lane of half a century! A 21 years old me entered into a relationship in marriage with him and the golden journey started. Marriage is more of a challenge for two persons to come together for a life time!! The partners come from different socio economic backgrounds, with different likes and dislikes, different passions etc. Love marriages and arranged marriages are no different interaction with different family members and maintaining cordial relations is a task for many.

By God's grace, I entered a loving family with my Sasubai as the pivot... She was my second mother and I was always a daughter to her! It is so true that strong support from family members makes life tolerable. My parents played a major role in my upbringing. My mother was ever ready to help me out with any difficulty that cropped up. God has been kind to give me two loving brothers who still stand by me like pillars of support in my life.

As life goes on, nature takes an upperhand in the procees of reproduction with its various ups and downs. Lucky to be a mother to two intelligent and loving sons. Middle age comes with the responsibility to develop a strong and loving family. and the challenge of bringing up children. We all owe this to society to give responsible citizens for the future. No one can escape this!

Family grows as the years roll on. The second generation power the path to carry on the legacy of the family with their own little ones and their own partners. Thankful to be blessed with an intelligent and loving daughter - in - law who is a piovt for the family. God is great to give me two clever, beautiful, loving grand daughters who are the sunshine of our lives.

Retirement from work enables leisure for travel and other spiritual and social activities one must give back to society, what one got in plenty. No better deed of gratitude than spreading laughter and happiness to the universe.

No regrets on missing out on any aspect of life. Always taught to be satisfied and happy. I am blessed to be surrounded by a whole lot of relatives and friends who keep me going ahead in life. Can't change the past and don't know what is in store in the Future so just be good in the present and enjoy life - That's my Moto.

Suddenly the 'D' day of the Golden Anniversary has arrived! It's already 50 years of life gone by! doesn't seem so. How time flies!

Once again the radio is playing Didi's melody...

.... जीवनात ही घडी अशीच राहू दे...

I second these words!

✳

# RAMKRISHNA ENTERPRISES

**Construction, Complete Structural Repair, Waterproofing, Plumbing & Painting Solutions**

**RAMKRISHNA ENTERPRISES** is involved in a number of CIVIL linked activities like:

- **Specialized building repairs and maintenances.**
- **Terrace waterproofing with Membrane, chemicals, fiber etc. & specialized high build chemical coating for External walls**
- **Interior and External Painting.**
- **Basement & Swimming Pool Waterproofing Rehabilitation.**
- **Structural repairing, Epooxy Polymer treatment.**
- **Restoration & Repairs of structures with approved system.**
- **Injection Grouting.**
- **Plumbing internal and external.**
- **Flooring (Epoxy, PU, Stamp Concrete, Tiling, Paver blocks)**
- **Interior Designing & Architect.**

With our extensively broad range of experience & services in the Societies, Commercial, Industrial, Hotel & Institutional sectors. We are equipped to handle all sorts of Repairs, Rehabilitation, Remodeling of structure, Waterproofing, etc. of the most difficult structures. Unique problems need unique solutions as we specialize in innovating effective & durable solutions to client.

**Proprietor's Name :** **Mr. Raju Balsanta**
**Mobile No.:** **+91 9819599113 / 8082479785**
**Email:** **ramkrishnaenterprises1@gmail.com**
**GSTIN No.:** **27AIUPB2498K1ZM**

लेख

# पक्षी विज्ञान

**✶ विश्वास अजिंक्य ✶**

आपल्या अवतीभोवती अनेक पक्षी स्वैर वावरत असतात. चिमणी, कावळा हे पक्षी तर त्यातल्या त्यात विशेष स्वैरपणे व धीटाईने आपल्या सानिध्यात वावरतात. हे पक्षी दिवसभर आपणाभोवती असतात पण सायंकाळ झाली की ते नाहीसे होतात. ते जातात तरी कोठे? ते रात्री झोपत असल्यास झोपतात तरी कुठे? राहतात कुठे? खातात काय? वगैरे गोष्टींची आपणास कितीशी माहिती असते? विमानाची कल्पना मानवाने पक्षांपासूनच उचललेली आहे . विमानाची रचनाही पक्षाच्या शरीरचनेनुसार केलेली आहे . गेल्या अनेक शतकांत घडून आली नाही इतकी विलक्षण न भूतो न भविष्यति अशी उच्च प्रकारची क्रांती विमानाच्या योगाने मानवी जीवनात घडून आलेली आपण पाहत आहोत. पक्षी हे उच्च प्रतीचे वैशिष्ट्यसंपन्न असे प्राणी आहेत. पेंग्विन, शहामृग वगैरेसारखे चार-सहा न उडणारे पक्षी सोडले तर पक्षी हे एकजात हवेत उडणारे, संचार करणारे प्राणी आहेत. पक्ष्यांच्या सुमारे पाचशे निरनिराळ्या जाती असून त्यात सत्तर हजार निरनिराळे प्रकार आहेत. शरीराच्या घडणीत सर्व पक्षी येथूनतेथून साधारणपणे सारखेच असतात. सर्व पक्ष्यांत पुढील अवयवांचे पंखात रूपांतर झालेले असते. पंख नाहीत असा पक्षीच आढळायचा नाही. सर्व पंखांची रचना बहुतेक सारखीच असते. पक्ष्यांच्या पंखाप्रमाणे त्यांच्या पायातही तशीच एकता असते. पायांच्या बोटात त्यांच्या राहणीपरत्वे थोडाफार फरक असेल एवढेच. सर्व पक्षी एकजात अंडीच घालतात. त्यात अपवाद सापडायचा नाही. सर्व पक्ष्यांच्या अंड्यांच्या वरचे कवच हे चुनखडीच्या द्रव्याचे असते. ते ठिसूळ असले तरी थोडेफार टणक असते. शरीराच्या मानाने पक्षी बरीच मोठी अंडी घालतात.

अनेक पक्ष्यांमध्ये विणीचा हंगाम जवळ येताच, मादीचे लक्ष वेधून घेण्यासाठी नराला सुंदर, चित्ताकर्षक, मनोवेधक असा पिसारा येतो. नर नाना प्रकारे प्रियाराधना करून मादीला वश करून घेण्याचा प्रयत्न करू लागतात. मादी वश होऊन जोडपं जमलं की नर आणि मादी एकत्र येऊन अंडी घालण्यासाठी घरटे बांधण्यास सुरुवात करतात. बहुतेक पक्ष्यांमध्ये निरनिराळ्या हंगामात निरनिराळे जोडपे जमते .अंडी घालून झाली, पिल्ले मोठी होऊन स्वतंत्रपणे वावरू लागली की जोडपे फुटून नर व मादी निरनिराळ्या दिशांना निघून जातात. नवीन हंगामाला पुन्हा नवीन जोडपे. असे असले तरी काही काही पक्ष्यात (साळुंकी, पारवे, सारस )जोडपे एकदा जमले की सहसा फुटत नाही. पक्ष्यांच्या जीवनातील विशेष आश्चर्य वाटण्यासारखी गोष्ट म्हणजे बहुतेक सर्व पक्षी अंडी घालण्यासाठी व पिल्लांचे संगोपन करण्यासाठी घरटी बांधतात. (कोकिळ पक्षी या घटनेला अपवाद आहे) पक्षी स्वत:साठी घरटी बांधतच नाही. ते घरट्यात राहतच नाहीत. बहुतेक सर्व पक्षी दर विणीला नवे घरटे तयार करतात. घरटी बांधण्याची जागा, घरट्याची रचना, आकार वगैरे पक्ष्यापक्ष्यात ठरलेले असतात. पक्षी वाटेल तेव्हा अंडी घालत नाहीत. त्यांचे विणीचे अथवा अंडी घालण्याचे हंगाम

ठरलेले असतात. हे हंगाम निरनिराळ्या पक्ष्यात निरनिराळे असतात आणि त्यांची संख्यादेखील निरनिराळी असते. कबूतर, पारवे वगैरे पक्षी एका वेळी दोन अंडी घालतात. सुगरण, पीलक वगैरे पक्षी एकावेळी तीन अंडी घालतात. टिटवी, साळुंकी चार तर; बगळे चार ते पाच आणि पोपट एका वेळी पाच ते सहा अंडी घालतात. अंडी उबविण्याचे काम बहुदा मादीकडेच असते. काही काही पक्ष्यांत नरही या कामी हातभार लावतात . हे काम साधारणपणे १५ ते २१ दिवसांपर्यंत चालू असते. हंसपक्षी आपली अंडी ३५ ते ४० दिवस उबवितात. मादी अन्न मिळविण्यासाठी किंवा स्वत:चे पोट भरण्यासाठी अंड्यावरून उठून घरटे सोडून बाहेर गेली असता नर घरट्याची राखण करतो. अंड्यातून पिल्ले बाहेर पडतात तेव्हा बहुतेक पक्ष्यांत ती लाल, नुसते मासाचे गोळेच असतात. अशा स्थितीत , तसेच ती पंख फुटून उडू लागेतो त्यांची काळजी घेण्याचे, जोपासना करण्याचे काम नर व मादी दोघेही मोठ्या आस्थेने, आत्मीयतेने करतात. पिलें स्वतंत्रपणे वावरण्यास समर्थ झाली की जोडपे फुटून माता-पितरे निरनिराळ्या दिशांनी उडून जातात.

पक्ष्यांची शरीररचना त्यांच्या हवेतील संचारास सोयीची अशीच असते. पक्षी हे प्राणी शरीराने लहान व वजनाने हलके असतात. त्यांना हवेत संचार करावयाचा असतो. तरंगत काळ काढावयाचा असतो. तेव्हा त्यांचे शरीर शक्यतो हलके राखण्याची योजना निसर्गानेच केलेली आहे. पक्ष्यांची हालचाल ज्या स्नायूंमार्फत होते ते स्नायूही वजनात हलके पण चिवट असतात. हवेत उडताना श्वसनक्रियेस लागणाऱ्या हवेची देवघेव करणाऱ्या फुफ्फुसाभोवती हवेच्या पिशव्या पुरविलेल्या असतात. रक्त शरीरात खेळविण्यास समर्थ अशा हृदयाचीही उच्च दर्जाची योजना पक्ष्यांच्या शरीरात असते. पक्ष्यांची दृष्टी फार तीक्ष्ण असते. आकाशात बऱ्याच उंचीवर घार तरंगत असताना तिला जमिनीवरील मेलेला उंदीर, लहान लहान भक्ष्य, वगैरेसुद्धा दिसते. ते दिसताच ती त्यावर खूप उंचीवरून झेप घेते हे आपण पाहतोच. गरुड पक्ष्याची दृष्टी तर याहून तीक्ष्ण असते. जमिनीवरील सावज त्याला आकाशात हजारो फूट उंचीवरून हेरता येते. सावज दिसताच तो इतक्या उंचीवरून तीराप्रमाणे झेप घेऊन क्षणार्धात सावज पायाने पकडून वर उंच आकाशात घेऊन जातो. पक्ष्यात डोळ्याच्या बुबुळावर अंतर पडदा असतो. तो त्यांना बुबुळावरून वाटेल तसा फिरवता येऊन बुबुळ साफ करता येते.

पक्ष्यांच्या जीवनव्यवहारातील अनेक कामे करणारी त्यांची 'चोच' एक लहानसे यंत्रच असते म्हटले तर त्यात फारसे वावगे होणार नाही. मनुष्य प्राणी जितकी हाताने कामे करू शकतो तितकी अनेक व विविध प्रकारची कामे पक्षी आपल्या चोचीमार्फत करू शकतात आणि करतात. अन्न मिळविणे, अन्न खाणे, मांस फाडून खाणे, घरटी तयार करणे अथवा बांधणे, पिल्लांची जोपासना करणे, स्वत:च्या अंगावरील पिसारा साफ करणे, झाडांच्या कठीण खोडाला चोचीने ठोके देऊन भोक पाडणे, वेळ पडल्यास शत्रूलाही टोंकारणे किंवा चावा घेणे इत्यादी अनेक प्रकारची कामे पक्षी चोचींमार्फतच करतात. चोच ही शिंगाच्या द्रव्याची बनलेली असल्यामुळे ती चांगली कठीण व चिवट असते. जीवनाच्या गरजांप्रमाणे भिन्नभिन्न पक्ष्यांच्या चोची भिन्नभिन्न प्रकारच्या असतात. पाण्यातील, चिखलातील मासे कालवं वगैरेसारखे भक्ष्य मिळवायचे, खावयाचे यासाठी बदकाची चोच चपट व थोडीशी मऊच असते. जमिनीवरील दाणे, धान्याचे कण, किडे वगैरे टिपून खायचे तर चिमणी साळुंकीसारख्या पक्ष्यांच्या चोची लहान, आखूड व टोकदार असतात. झाडांवरील फळे टवके मारून खावयाची तर पोपटाची चोच बाकदार असून तिला चांगले टोक व तीक्ष्ण कडा असतात. घरटी करण्यासाठी झाडाच्या खोडात भोक पाडावयाचे तर तांबट सुतार वगैरे पक्ष्यांची चोच लहान, कठीण व टोकदार असते. तंतुचे घरटे विणावयाचे असेल तर सुगरण पक्ष्याची चोच बारीक व टोकदार असते. फुलातील मध लुटावयाचा, शोषून

घ्यायचा, तर मधुभक्षक पक्ष्याची चोच फार बारीक व लांब असते. घार, गिधाड, गरुड वगैरे मांसाहारी पक्ष्यांना मांस फाडून खावयाचे असते. अशा पक्ष्यांची चोच चांगली टणक, कठीण असून तिच्या शेंड्याला थोडा बाक असतो.

पक्ष्यांना प्रत्येकी दोन पाय असतात . पक्षी मुख्यत: हवेत संचार करणारे असले, तरी त्यांना पायाचा पुष्कळ उपयोग करावा लागतो. ते हवेत संचार करतात ,तितकेच ते जमिनीवर व झाडांवर वावरतात. जमिनीवर चालताना काही पक्षी आपल्याप्रमाणेच एक एक पाऊल टाकीत चालतात. टिटवी आणि सारस पक्षी हे पाण्यातून चालतात तेव्हा पाण्यात चालण्यास सोयीचे पडावे म्हणून त्यांचे पाय लांब असतात. बहुतेक पक्ष्यांना पायाला पुढे तीन व मागे एक अशी चार बोटे असतात. बोटांच्या ठेवणीला अपवाद आहेतच. हवेतून येऊन फांदीवर बसताना पक्ष्यांना बोटांचा चांगला उपयोग होतो. फांदीवर बसले असता, शरीराचा तोल नीट चांगला सांभाळला जाईल इतकी त्यांच्या बोटांची पकड घट्ट असते . ही पकड झोपेतही सैल पडत नाही . बदक, हंस वगैरेसारख्या पाण्यात वावरणाऱ्या पक्ष्यांच्या पायांची बोटे त्वचा पदराने सांधलेली असतात . ज्यायोगे त्यांना पाण्यात पायांचा वल्ह्याप्रमाणे उपयोग करता येतो.

पक्ष्यांमध्ये पायांप्रमाणेच हात अथवा पुढील पाय किंवा अवयवही असतात . पुढील अवयवांचे अथवा हातांचे 'पंखात' रूपांतर झालेले असते. पक्ष्यांच्या पुढील अवयवांची रचना आपल्या हाताच्या रचनेप्रमाणेच असते. पक्ष्यांचे पंख मुख्यत: पिसांचेच बनलेले असतात व त्यांच्या आधारावरच किंवा जोरावरच पक्ष्यांना हवेत उडता येते, वावरता येते. पक्ष्यांचे जीवन पुष्कळसे पंखावरच अवलंबून असते. पक्ष्यांच्या शरीरावर पिसांचे भरपूर आवरण असते. त्यामुळे त्यांना थंडी, वारा, ऊन, पाऊस यांचा सहसा त्रास होत नाही. पिसांमुळे त्यांच्या शरीराचे उष्णतामानही चांगले राखले जाते. पाण्यात सदैव राहणाऱ्या डुंबणाऱ्या बदक, हंस वगैरेसारख्या पक्ष्यांत पिसे वरच्यावर स्निग्ध द्रव्याने माखली जातात. त्यामुळे त्यांच्या अंगावर कितीही पाऊस पडला, कितीही काळ ते पाण्यात राहिले तरी त्यांच्या अंगात पाणी शिरत नाही. ते वरच्यावर वाहून जाते. निघून जाते. हे स्निग्ध द्रव्य स्त्रवणारी ग्रंथी पक्षाच्या शेपटीच्या बुडाशी असते.

अनेक प्राणी कात टाकतात. त्याचप्रमाणे पक्ष्यातही त्यांच्या शरीरावरील पिसारा वर्षातून एकदा तरी गळून पडतो व त्या जागी नवीन पिसारा येतो. पक्ष्यांच्या शरीरावरील सर्व पिसारा एकदम व एकाच वेळी गळून पडत नाही. तो हळूहळू पडतो व त्या जागी नवीन पिसारा हळूहळू येत राहतो.

पक्ष्यांच्या तोंडात दात नसतात. तोंडात घेतलेले अन्न बारीक करण्याचे कार्य थोडेफार चोची मार्फतच होते. पक्ष्यांची अन्ननलिका लांब असते. त्यामुळे तोंडातील अन्नाचा घास अन्ननलिकेमार्फत जठरात पोहोचविला जातो. अन्ननलिकेचा मानेखालील जठरा जवळचा भाग मोठा आणि पिशवीसारखा असतो. या पिशवीसारख्या भागाला इंग्रजीमध्ये क्रॉप म्हणतात. पक्षी खातात ते अन्न या क्रॉपमध्ये येऊन पडते, जमा होते. तेथून पुढे ते जठरात जाते .जठराचे दोन भाग पडतात. दुसऱ्या भागाला इंग्रजीत गिझर्ड असे नाव आहे . या गिझर्डमध्ये नैसर्गिकरित्या अन्नाचे घुसळण होऊन त्याचे पीठ बनते. त्यात जठररसही येऊन मिळतो. त्यामुळे अन्न पचनास सोपे जाते आणि पचनक्रिया घडून येते.

## 'वात्रटिका'

### वय

तरूणपणी झाडांभोवती खेळला लपंडाव,
जरा वय वाढताच प्रेक्षक विसरलेही नाव.
आईच्या-आजीच्या भूमिका आता ती करते,
अर्धी फेरी मारताच बागेत बाक पकडून बसते.

**-डॉ. सुमन सुवर्णकुमार नवलकर**

कविता

## जखम गर्भार!

- सुहासिनी कीर्तिकर

शांत एकटेपण नीरव
तरी विचारांची रव रव.....
भावनांचे मधु मार्दव
आठवांची कटु आवजाव
खूप खूप पाऊस,
रण रण ऊन,
खूप खूप दिवस
होत भूतकाळ जून
आठवणींची मोठ्ठी संदूक
भल्याबुऱ्या घटितांची बंदूक
ठासून भरता असला बार
ठसठसत राही जखम गर्भार!

---

शाकाहारी पक्ष्यांमध्ये काही काही पक्षी झाडांचे कोवळे कोंब, फुले फळे वगैरे खातात .या पक्ष्यांचे आतडे लांब असते. काही पक्षी धान्याचे कण, दाणे टिपून खातात. या दाण्यांचे पीठ व्हावे म्हणून ते पक्षी दाण्यांबरोबरच वाळूचे आणि खड्यांचे बारीक बारीक कणही टिपून खातात. अशा पक्ष्यांचा गिझर्ड नावाचा विभाग जाड्या त्वचा पदराचा बनलेला असतो. कारण त्यामध्ये धान्य आणि वाळूच्या कणांची घुसळण व्हायची असते. याउलट काही काही पक्षी अळ्यांसारखे किडे खातात. या पक्ष्यांच्या गिझर्डचा त्वचापदर पातळ असतो.

पक्ष्यांच्या चोचीच्या बुडाशी दोन लहान लहान, बारीक बारीक भोके आढळतात. या पक्ष्यांच्या नाकपुड्या होत. पक्ष्यांच्या फुफ्फुसांना हवेच्या पिशव्या जोडलेल्या असतात. त्या प्रत्येक बाजूला चार-चार व खाली मधोमध एक अशा एकूण नऊ पिशव्या असतात. यांच्या योगाने पक्ष्यांचे हवेत उडण्याचे कार्य फार जलद व दमाने होते .पंखांच्या खाली वर होणाऱ्या हालचालींनी त्या आलटून पालटून हवेने भरून निघतात. रिकाम्या होतात. अशाने हवेत उडताना पक्षी सहसा दमत नाही. शरीरातील हवेच्या जोरावर तो स्वत:चे शरीर वर हवेत तोलून धरू शकतो.

विणीचा हंगाम जवळ आला की नर आपली सहचरी निवडण्यासाठी खटपटी, लटपटी, झटापटी करायला लागतो. याबाबतीत निसर्गनेसुद्धा थोडाफार हातभार लावलेला दिसून येतो. विणीच्या हंगामात नरांना नवीन पिसारा येऊन ते नाना प्रकारच्या रंगाने सुशोभित होऊन, नटून, थटून मोठ्या थाटाने, दिमाखाने आपली सहचारी निवडून काढण्याच्या खटपटीला लागतात. काही पक्ष्यांमध्ये याचवेळी नरांना कंठही फुटतो आणि ते मंजुळ आवाजात गाऊ लागतात. मादी हस्तगत करण्यासाठी त्यांना तिची खूप खुशामत, मनधरणी करावी लागते. इतके करून मादी वश होतेच असे नाही. मादीला जो नर पसंत पडेल, आवडेल त्याचीच ती निवड करते. काही वेळा नरा-नरांत भांडणे, मारामाऱ्या देखील होतात. अशावेळी विजयी नराच्या गळ्यात मादी माळ घालते. सहचरी निवडून झाल्यावर ते जोडपे एका हंगामापुरतेच टिकून राहते. नवीन हंगामाला पुन्हा नवीन खटाटोपी. पुन्हा नवीन जोडपे. पारवे, साळुंक्या, मधुभक्षक वगैरे पक्ष्यांत जोडपे एकदा जमले की ते जन्मभर टिकून रहाते. स्वयंवर पार पडले की लगेच पक्ष्यांच्या वैवाहिक व कौटुंबिक जीवनाला सुरुवात होते. नर व मादी दोघेही घरटे बांधण्याच्या तयारीला लागतात. घरटे हे त्यांच्या स्वत:साठी नसून, त्यांना होणाऱ्या पिल्लांसाठी असते. पक्षी घरट्यात राहतच नाहीत. घरटे बांधण्याचे काम नर व मादी दोघे मिळून करतात. पक्ष्यांची घरटी त्यांच्या विविक्षित राहणीनुसार व घरटे तयार करण्यास लागणारे सामान जसे उपलब्ध असेल त्यानुसार बांधलेली असतात. पक्ष्यांची घरटी कायमची नसून ती एका हंगामापुरतीच, एका विणिपुरतीच असतात. घरट्यासाठी जागा निवडताना पक्षी सुरक्षिततेकडे जास्त लक्ष पुरवितात. बहुतेक घरटी सहजासहजी शत्रूच्या नजरेला पडू नयेत, त्यांच्या हाती लागू नयेत अशा जागी बांधलेली असतात. विणीच्या

हंगामात अंडी घालण्यास किंवा उबविण्यास, अंड्यातून पिल्ले बाहेर पडल्यावर ती स्वतंत्रपणे वावरू लागेपर्यंत त्यांची जोपासना करण्यास, एवढ्या पुरताच पक्षी घरट्याचा उपयोग करतात. बाकी आपले सर्व आयुष्य पक्षी घरट्याशिवायच काढतात. मादीकडून अंडी घालून झाली, म्हणजे त्यातून लगेच पिल्ले बाहेर पडत नाहीत. मादीच्या उदरातून अंडे बाहेर पडले म्हणजे अंड्यातील जीव वाढीला लागून काही काळानंतर त्यातून पिल्लू तयार होते. असे असले तरी या काळात अंडे नुसते तसेच ठेवून चालत नाही. त्याला उष्णता द्यावी लागते. ते उबवावे लागते. अशावेळी मादी स्वत:च्या पोटाखाली अंडे घेऊन ती सुमारे २१ दिवसांपर्यंत उबविते व एकविसाव्या दिवशी अंड्यातून पिल्लू बाहेर पडते . कमीत कमी १५ दिवस व जास्तीत जास्त २७ दिवस अंडी उबवावी लागतात.

पक्ष्यांचे उडणे निरनिराळ्या पक्ष्यांमध्ये निरनिराळ्या प्रकारांचे व निरनिराळ्या दर्जाचे असते. पक्षी हवेत नुसते उडत जातात असे नाही; तर हवेत बऱ्याच उंचीला गेल्यावर तेथे ते तरंगतही राहतात. तसेच ते संथपणे विनायास खालीपण येतात. साधारणत: स्थलांतर करणारे पक्षी उंचावरून उडण्यात पटाईत असतात. हे पक्षी आल्प्स पर्वतासारखे उंचच उंच डोंगर सहज ओलांडून जातात. हे पक्षी दोन हजार फूट उंचीवरदेखील सहज वावरतात. पक्षी एका मुलखातून दुसऱ्या मुलखात जातात किंवा स्थलांतर करतात याची मुख्य कारणे म्हणजे हवामानाची परिस्थिती, अन्नधान्याची किंवा खाद्याची परिस्थिती व विणीसाठी लागणाऱ्या, जरूर असणाऱ्या सुखसोयी इत्यादी गोष्टी होत. पक्ष्यांना मानवेल असे हवामान एखाद्या ठिकाणी एखाद्या हंगामाला नसल्यास, त्यांना आवडेल असे अन्न उपलब्ध नसल्यास किंवा पुरवठा भरपूर नसल्यास तसेच विणीसाठी सोयीस्कर, जागा घरटे बांधण्यास लागणारा माल त्यांच्या राहणीच्या परिसरात पुरेसा उपलब्ध नसेल तर पक्षी अशा जागा सोडून दुसरीकडे जातात. स्थलांतर करतात. युरोप अमेरिका या खंडाच्या अनेक विभागात थंडीचा कडाका वर्षातून काही काळ फार असतो . तो टाळण्यासाठीदेखील पक्षी खूप लांब लांबच्या पल्ल्यावर स्थलांतराला निघून जातात . पक्षी दरसाल ठराविक हंगामाला, ठराविक वेळी ठराविकपणे स्थलांतराला जातात. स्थलांतर करताना पक्षी जवळच्या शंभर दोनशे मैलाच्या अंतरावरील ठिकाणी जात नाहीत; तर हजारो मैल अंतर तोडून ते स्थलांतर करतात. अशात ते होता होईतो खुष्कीचा मार्ग अवलंबितात. हंगाम संपला, हवेचा मोसम बदलला की त्याच मार्गे ते आपल्या पूर्व ठिकाणाला परत येतात. असे हे चक्र सालोसाल चालू असते . स्थलांतराला जाणारे पक्षी रोज तीन-तीनशे मैलांचे अंतर सहज ओलांडून जातात.

अनेक पक्षी जमिनीवरील, झाडांवरील किडा, मुंगी खाऊन राहातात. त्यामुळे किडा मुंगींपासून मनुष्यास व झाडास होणारा उपद्रव थोडाफार टाळला जातो. काही काही पक्षी कुजकेनासके पदार्थही खातात . त्यामुळे रोगजंतूही त्यांच्या पोटात जाऊन त्यांचा नाश होतो व मनुष्यावर ओढवली जाणारी आपत्ती टळली जाते. ससाणा, घुबड हे पक्षी उंदीर घुशी इत्यादी खाऊन पिकांची नासाडी होण्याचे टाळतात. गिधाडे; कावळे उकिरड्यावरील घाण खाऊन, घाण जागा स्वच्छ ठेवण्यात हातभार लावतात. मधुभक्षक पक्षी मध लुटण्यासाठी फुलांवर येऊन बसतात. अशात त्यांच्या पंखांना, पायांना फुलातील पराग कण चिकटतात. फुलातील मध लुटून

## ‘कणिका’


### वर्दी

गणपतीची येता वर्दी
जनतेची घाईगर्दी
त्यांची सोय करता करता
सरकार धाडी खाकी वर्दी!

**- सुहासिनी कीर्तिकर**

झाल्यावर ते तिथून उडून दुसऱ्या फुलांवर जाऊन बसतात. त्यामुळे परागीभवन होते व चांगली फळे निर्माण होतात. मानवी जीवनाच्या बाबतीत पक्षी नाना प्रकारे महत्त्वाची कामगिरी बजावून मनुष्याचे जीवन सुखी करतात .

विमानविद्येची कल्पना मानवाने पक्ष्यांपासूनच घेतलेली आहे . पक्ष्यांना हवेत उडता येते , वावरता येते तर आपणांस ही तसे का करता येऊ नये? या इर्षेने मनुष्य आकाशात उडण्याचा, संचार करण्याच्या खटाटोपामागे, उद्योगांमध्ये लागला. पहिले प्रयत्न त्याने आपल्या शरीराला पक्ष्याच्या पंखांप्रमाणे रचना लावून किंवा जोडून केले. अशा खटाटोपात, उद्योगात विमानविद्येचा उगम होऊन, तिचा विकास होत जाऊन, ती आज चांगल्या परिणत स्थितीला, उच्च कोटीला येऊन पोहोचली आहे. हे पक्ष्यांचे मानव जातीवर उपकारच आहेत.



**रेखाचित्र: सुधीर कृष्णनाथ आगासकर**

लेख

# मनातल्या मनात

**✶ सौ. श्रेया तळपदे ✶**

आज सकाळी - सकाळी जाग आली. म्हणजे ७ वाजता. अर्ली मॉर्निंग; काय आहे ना जगाचं आणि माझं घड्याळ यात जरा तफावत आहे. पण आता जे आहे ते आहे. ते जाऊ दे. ते फार महत्त्वाचं नाही. तर जाग आली आणि तेव्हापासूनच वाटतंय काही तरी भन्नाट असं लिहून काढावं. पण नेमकं काय हेच कळत नाहीये. उगाच आपलं मनात येतंय म्हणून पेन घेऊन लिहित बसलेय हो... तुम्ही म्हणाल मग कशाला उगाच सुचत नाही तरी हे लिहिण्याचे सोपस्कार? तुम्ही काही म्हणा हो? माझ्या मनात आलंय ना; म्हणून बसलेय लेखणी घेऊन. आई म्हणायची, कोणाचं मन मोडू नये. मग आपलं स्वत:चं तरी का मोडायचं मन? इतरांना मन असतं तसं आपल्याला नसतं का? नेहमी-नेहमी काय हो इतरांच्या मनाचा विचार करायचा? कधीतरी आपल्या मनाचा नको का विचार करायला?

नाही, पण हे इतरांच्या मनाचे विचार वगैरे डिपार्टमेंट जणू बायकांनीच चालवायला घेतले. पूर्वापार चालत आलेलं हे डिपार्टमेंट ते आता आमच्या ४०शीतल्या बायकांच्या जनरेशनपर्यंतच हा.

आमच्यानंतरच्या पिढीतल्या मुली कशा स्मार्ट, डॅशिंग. असल्या अंधश्रद्धा पाळत नाहीत म्हणे, आमचे संस्कार यांना अंधश्रद्धा वाटतात. काही का वाटेना.. कधी-कधी कौतुकही वाटतं मला या पिढीचं. कारण ह्यांचं निदान स्वत:पुरतं तरी सगळं सॉर्टेड असतं आणि इथे ह्याचा विचार, त्याचा विचार, घराचा विचार, नातेवाईकांचा, मुलांचा, नवऱ्याचा, सासू-सासऱ्यांचा, कमीच पडत असेल तर शेजारच्यांचा विचार करून वागण्या-बोलण्यात सगळं आयुष्यच मेस होऊन जातं. जगात काहीही होऊ दे; यांचे प्लान्स ठरलेले असतात. ते तसेच करायचे आणि आम्ही बसतोय जगाप्रमाणे आमचे प्लान्स ठरवत.

अर्ध आयुष्य गेलं असंच. कोणास ठाऊक अर्ध गेलं, पाव गेलं की कणभर हाती उरलंय... आम्हाला ना आजमध्ये कधी जगताच आलं नाही, कायम उद्याच्या विचारात नाहीतर भूतकाळाच्या आठवणीत कुढत बसलोय आम्ही. वर्तमान गृहित धरून भविष्याला सुरक्षित ठेवण्याच्या ह्या स्पर्धेत जिंकणार कोण? ते भविष्यकाळ ठरवेल म्हणून वर्तमान बसलाय घरात बायकोसारखा आपल्या धन्याची वाट बघत. पण हा मुद्दाच नाहीये.

माझंमाझं आपलं वाटलं मला म्हणजे माझ्या मनाला हो; लिहावं काहीतरी भन्नाट; पण नेमकं कशाला भन्नाट म्हणावं म्हणजे बघा हा व्यक्तिस्वातंत्र्य, स्त्रीस्वातंत्र्य वगैरे-वगैरे विषय आता हद्दपार वाटतात. समाजावर, राजकारणावर वगैरे लिहावसं वाटत नाहीये. आणि मला वाटणारा विषय हा भन्नाट या संकल्पनेत बसतो का? हे कसं कळणार? शी! बाई. हे असं कन्फ्युजन खूप आहे हो. बघितलत नं?

इथे ही सब-कॉन्शिअस माईंड इतरांना काय वाटेल? इतरांसाठी भन्नाट काय? या विवंचनेतच अडकलाय. आमचं हे असंच अडकणं जीवन कठीण करत चाललंय. पण हे आवेग ही मनातल्या मनाशी!

✳

**लेख**

# आमचे घरांतर...!

**✶ जयमती तळपदे ✶**

आमचे घरांतर...!

बरोबर वाचलंत हो तुम्ही.

म्हणजे स्थलांतर कसे एका ठिकाणाहून दुसरीकडे जाणे तसे घरांतर म्हणजे एका घरातून दुसऱ्या घरात जाणे. (हा माझा शब्दकोश) . आमचे जुने घर सोडून नवीन मोठ्या घरात जायचे ठरले आणि आमची धावपळ सुरू झाली. घर एक महिन्यात खाली करायचे होते. नवऱ्याने ऑर्डर सोडली; आता सामान कमी करा. नाहीतर न्याल सगळा इकडचा रगडा तिकडे. मग मी सुरुवात माळयापासून करायची असे ठरवले. एकामागोमाग एक बोचकी खाली यायला सुरुवात झाली. माझ्या फुलं भरण्याचा थाळा, ती स्टीलची केळ्याची वायनातली दहा पानं, निरनिराळ्या मापाची स्टीलची ताटं, डबे ,अशी असंख्य वर्षानुवर्षे सूर्यप्रकाश न पाहिलेली मंडळी खाली हजर होऊ लागली आणि प्रत्येकाबरोबर त्याचा इतिहास आठवू लागला. असा ऐतिहासिक ठेवा कुणी काढतं का? पण ''कठीण कठीण किती पुरुष हृदय बाई'' याचा मला साक्षात्कार घडवत नवरोजींनी ऑर्डर सोडली, ''आता हा मोह सोडा, अजून सूनबाईंची पण वायनांची भांडी आहेत.'' हे बरंय. तिची भांडी तेव्हढी ठेवायची आणि माझी मात्र जड झाली. म्हणतात ना 'अतिपरिचयात् अवज्ञा' दुसरं काय? मग सूनबाईंना हाक मारून म्हटले, ''बघ गं कुठली भांडी ठेऊ या''. तर बायनी जवळजवळ सगळीच भांडी मोडीत काढली. कुठे अक्कल गहाण ठेवून हिला विचारले असे झाले. भरवशाच्या म्हशीला टोणगा. दुसरं काय? आणि बघताबघता तीन गोण्या भरून माझी दौलत मातीमोलाने भंगाराच्या घशात गेली.

पुढचा नंबर होता कपाटांचा. अर्थातच दुनियेतील तमाम पुरुषांप्रमाणे माझ्याही नवऱ्याकडे मोजकेच भरपूर कपडे असल्याने त्यांचे कपाट अर्धे रिकामेच होते. त्यामुळे प्रश्न होता तो माझ्या कपड्यांचा. विश्वास ठेवा किंवा नका ठेवू, वाटलं नव्हतं, पण एकूण साड्या दोनशेच्या वर भरल्या. पन्नासच्या आसपास रोज नेसण्यासारख्या, तेव्हढ्याच पार्टीसाठी किंवा कुणी लग्नकार्यात दिलेल्या आणि उरलेल्या घरच्या लग्नात नेसण्यासारख्या. प्रत्येकीची काही नं काही खासियत होती. मनावर दगड ठेवून काढून टाकायच्या साड्या बाजूला काढल्या. त्या २५ भरल्या. सगळ्या एकदोनदाच नेसलेल्या. काहींना तर फॉल बीडींगपण केलेलं नव्हतं आणि काहींच्या अस्तित्वाची मला जाणीवही नव्हती. ह्याशिवाय सलवार कमीज वेगळे होतेच. मग सूनबाईंनी ज्ञान पाजळलं, ''आई, जुने कपडे काढल्याशिवाय नवीन कसे येणार?'' मुद्दा योग्य होता. पैठणकर जुन्या साड्या घेतात म्हणून त्यांना फोन केला तर ते गावी गेलेले आणि माझा विचार बदलण्याआधी काम साधायचं म्हणून ह्यांनी एका सोम्यागोम्याला बोलवून सगळे बाजूला ठेवलेले कपडे गडबडीत देवून टाकले.

आता रोज कशावर न कशावर संक्रांत येत होती. मोठ्ठं स्टूल, खुर्च्या, गळकी बादली इत्यादी इत्यादी. कितीतरी गोष्टी तर कामवाली बाई,

कचरेवाला, धोबी अशा कोणा कोणाला सप्रेम दिल्या. एका सकाळीच माझा लेक काहीतरी शोधत होता. जरा वेळ शोधाशोध केल्यावर त्याने विचारले, ''आई, मी इथे लॉंड्रीत द्यायला वॉर्मर्स ठेवले होते ते पाहिलेस का?'' सर्व जागच्या जागी ठेवण्याचा माझा छंद सगळ्यांना माहीत असल्यामुळे काही मिळाले नाही की शेवटचा पर्याय मीच होते. पण मला काही आठवेच ना. सर्व संभाव्य ठिकाणी, शोधल्यावर माझ्या मनात एक शंका आली व माझ्या पायाखालची जमीनच सरकली. कारण त्याला आता ते परदेशी जाताना लागणार होते असे महागडे कपडे होते ते. आणि जर ते जुन्या कपड्यांबरोबर दिले गेले असतील तर त्या सोम्यागोम्याला कुठे शोधणार आणि तो कशाला कबूल करणार? दुर्दैवाने ती शंका खरी ठरली आणि माझ्या व्यवस्थितपणावर मला एक तास लेक्चर ऐकायला लागले. ह्याने कशाला कपडे कुणाला न सांगता हॉलमध्ये कोचावर टाकावेत? ती काय जागा आहे लॉंड्रीचे कपडे ठेवायची? पण आपल्या गुणांची कुणाला किंमत नसते हेच खरे आणि गंमत म्हणजे साड्यांची बोचकी ह्यांनी बांधली होती बरं . पण आणखी वादविवाद स्पर्धा नको म्हणून मी आपली गप्प बसले. असो, अशा रितीने तो नशीबवान जीव माझ्या चांगल्या जुन्या कपड्यांचे चारशे रुपये देऊन चार हजारांचे वॉर्मर्स घेऊन गेला.

नवीन घरात गेल्यावर शोधाशोध नको म्हणून सामानाची वर्गवारी करून आम्ही वेगवेगळी गाठोडी बांधून ठेवली. मॅक्सवाला म्हणाला, ''अजिबात काळजी करू नका. आम्ही सर्व व्यवस्थित पॅक करून नेऊ.'' त्याच्या प्रत्येक बॉक्सवर आम्ही आतल्या सामानाची यादी लावली आणि बघताबघता सामान नव्या घरी रवाना झाले. आता फक्त चांदीच्या भांड्यांच्या व दागिन्यांच्या २ बॅगा, गॅसची चूल, एक छोटं टोप कॉफी करण्यासाठी, रेडीमिक्स कॉफी, डिस्पोजेबल कपं, लायटर एव्हढंच शिल्लक होतं. मी, नातू, सूनबाई आणि वहिनी आमची गाडी परत येण्याची वाट पहात होतो. रेडीमिक्सची कॉफी बनवावी म्हणून मी टोपात पाणी घेऊन उकळायला ठेवलं आणि कपात कॉफी पावडर काढावी म्हणून पाहिलं तर कपंच गुल. नातवाला म्हटलं, ''जरा खाली जाऊन कप आण रे''. तर कोपऱ्यावरचा चहावाला म्हणाला, ''कॉफीच घेऊन जा.'' त्यावर आमचा आज्ञाधारक मुलगा म्हणाला, ''नाही, कपंच हवीत.'' आणि त्याच्याकडून पन्नास कटींग चहाची कपं घेऊन आला. मग आम्ही प्रत्येकजण चार चार कपातून कॉफी प्यालो. उरलेली कपं अजूनही आमच्याकडे शिल्लक आहेत. जवळपास टपरीवाला शोधतेय ती कपं दान करायला.

आधी स्वयंपाकघर लावायचं म्हणून सूनबाई आणि वहिनीने उत्साहात सर्व लावालाव केली. त्यामुळे दोनच दिवसात घरचे जेवण बनू लागले. परवा बरणीतली कोकमं संपली. मला आठवत होतं एक अख्खी नवीन पिशवीभर कोकमं असल्याचं, पण कुठेच मिळेनात. शोधून थकल्यावर नवीन आणली आणि आता भलत्याच ठिकाणी जुनी कोकमं मिळाली. कारण योग्य ठिकाणी ठेवायला जागाच नव्हती. आता जवळजवळ वर्ष होईल आम्हाला इथे येऊन, पण अजूनही असे नवनवे शोध आम्हाला लागतच असतात. सांगायचं काय; तर अशा घरांतरामुळे आपल्याला आपल्याकडे काय काय खजिना आहे ह्याचा शोध लागतो. आपण कितीतरी न वापरलेल्या, न लागणाऱ्या वस्तू जमवून ठेवतो, कधी कुणी प्रेमाने दिल्यात म्हणून तर कधी गरज नसतांना आवडल्या म्हणून घेतलेल्या. काय करायचं त्यांचं? ह्या कपाटातून किंवा माळ्यावरून दुसऱ्या कपाटात/माळ्यावर ठेवायच्या? आपली मुले बरी 'स्क्रॅप इट' म्हणून नि:संग होतात. संत सज्जन सांगून गेलेत, लोभ मोह वाईट. पण त्यांचं बरं होतं, त्यांच्याकडे असल्या वस्तू नसणार. आपले माळे भरलेले असतात. त्यामुळे हे सगळे साक्षात्कार घर बदलतांनाच होतात . म्हणून म्हणते; ज्ञानात भर पडावी म्हणून 'घर पहावं बांधून' बरोबरच 'आता घर पहावं बदलून' पण म्हणायला हवं. होय की नाही?

लेख

# पाठारे प्रभू ज्ञातीच्या इतिहासाविषयीचं कुतूहल

✶ मृदुला प्रभुराम जोशी ✶

पाठारे प्रभू हे मुंबई बेटांचे मूळ रहिवासी. सातशे-आठशे वर्षांपूर्वी ते गुजरातच्या पाटणमधून राजा बिंबाबरोबर त्याचे सेनापती (पाताणे प्रभू) म्हणून मुंबईत आले आणि इथे स्थायिक झाले. आपल्या बुद्धिमत्तेच्या बळावर त्यांनी अमाप संपत्ती कमावली. मुंबई बेटांतल्या विस्तीर्ण जमिनी त्यांच्या मालकीच्या झाल्या. त्यांच्या संस्कृतीवर,चालीरीतींवर त्यांच्या सधनतेचा कायमस्वरूपी ठसा उमटला. लग्नसमारंभ,भरजरी वस्त्रप्रावरणे,दागदागिने या सर्वांत ही सुबत्ता झळकू लागली. लग्नात मुलीच्या अंगावर किती शेरांचे दागिने घातले यावर वधुपित्याची संपत्ती आणि प्रतिष्ठा मोजली जाऊ लागली. प्रत्येक सणासाठी किंवा महत्त्वाच्या प्रसंगी अप्रतिम सुंदर,देखण्या पाठारे प्रभू स्त्रिया दागदागिन्यांनी नखशिखान्त नटलेल्या असत. पांढऱ्या साडीवर मोत्यांचा, लाल साडीवर माणकांचा, हिरव्या साडीवर पाचूचा, भरजरी पैठणीवर हिऱ्यांचा किंवा सोन्याचा असे 'सेट' परिधान केले जात. अशा तऱ्हेने सजलेल्या स्त्रिया लग्नाच्या वरातीत मिरवत जात तेव्हा ते नयनमनोहर दृश्य पाहायला अख्खी मुंबई लोटत असे. पाठारे प्रभू ललनांची नऊवारी साडी नेसण्याची पद्धत आणि त्यांचे दागिने बालगंधर्वांनी अंगीकारले आणि प्रसिद्ध केले.

हा इतिहास आठवण्याचं कारण म्हणजे माझ्याकडे नुकतीच एका तरुण इतिहास अभ्यासकाने केलेली विचारणा. पुण्यातील विख्यात सराफ पु. ना. गाडगीळ यांच्या वंशजांनी बावधन परिसरात 'झपूर्झा' नावाचं एक अप्रतिम सुंदर वस्तुसंग्रहालय (म्युझियम)



उभारलं आहे. पुणे शहराला भेट देणाऱ्या प्रवाशांना या स्थळाकडे आवर्जून जावंसं वाटतं इतकी त्याची कीर्ती झालेली आहे. या म्युझियमचे क्युरेटर श्री. विक्रम मराठे यांनी सहज बोलता बोलता माझ्याकडे पाठारे प्रभू ज्ञातीच्या इतिहासाचा विषय काढला आणि मग त्याला अनुसरून त्यांनी माझ्याकडे एका विशिष्ट चित्राविषयी माहिती विचारली.

हे चित्र प्रख्यात चित्रकार रावबहादूर एम. व्ही. धुरंधर यांनी चित्रित केलेलं असून सध्या ते सांगली म्युझियममध्ये आहे. मराठे यांना या चित्राविषयी खूप कुतूहल वाटत होतं. या चित्रात दर्शविलेला प्रसंग म्हणजे एक लग्नसोहळा आहे. यातल्या स्त्रिया कुठल्या विशिष्ट जातीच्या आहेत?त्यांची वस्त्रप्रावरणे आणि दागदागिने तशीच नऊवारी साडी नेसण्याची ढब कशी आहे?जिथे हा लग्नसोहळा संपन्न होत आहे तिथे मागच्या भिंतीवर एक पट लावलेला दिसत आहे, त्या पटावरच्या चित्रांचा अर्थ काय?असे अनेक प्रश्न त्यांना पडले होते. अर्थातच या सगळ्या प्रश्नांची उत्तरं द्यायला मी सक्षम नव्हते त्यामुळे मी माझ्या दोन



जाणकार मैत्रिणींकडे धाव घेतली. एक होत्या वृंदा जयकर आणि दुसऱ्या सुहासिनी कीर्तिकर. या दोघींनीही मला तत्काळ बरीच अमोल माहिती पुरवली.

हे चित्र पाठारे प्रभू ज्ञातीतील लग्नसमारंभाचं आहे हे निश्चित. या चित्रातील अनेक तपशिलांविषयी मला वेगवेगळी माहिती मिळाली.

वृंदा जयकर यांनी सांगितलं की -

मागच्या भिंतीवर दिसत आहे त्या पटावर पोखरण म्हणजे पायऱ्यांची विहीर आहे. पूर्वी नळ

## ‘वात्रटिका’

### घड्याळ

अर्धा तास पुढची वेळ लावतो घड्याळात.
तेच पक्कं डोक्यात असतं, कामं रेंगाळतात.
शेवटी सगळं खापर फुटतं घड्याळाच्या माथी.
उशीर होताच कारण सांगतो, ‘घड्याळ पडलं पाठी’

**-डॉ. सुमन सुवर्णकुमार नवलकर**

नसल्यामुळे पुष्करणीमधून पाच सवाष्ण बायका पाणी आणायच्या व नवरी किंवा नवऱ्याला आंघोळ घालायच्या.दिवाळीच्या आदल्या रात्री आपण रांगोळीत आंघोळीसाठी पोखरण काढतो.

थोडंसं स्पष्टीकरण :-

पोखरण म्हणजे ‘पुष्करिणी’ या मूळ संस्कृत शब्दाचा अपभ्रंश होऊन मराठीत आलेला शब्द. या ठिकाणी मात्र ’पोखरण’ हा शब्द रांगोळीचा एक विशिष्ट प्रकार म्हणून वापरला आहे. पाठारे प्रभू ज्ञातीत दिवाळी सुरू होण्यापूर्वी आठ दिवसांपासून रोज एक एक विशिष्ट रांगोळी काढण्याची खूप जुनी, दीर्घ परंपरा आहे. तिला ‘आठविंदा’ असं म्हणतात. दिवाळीच्या आदल्या रात्री ‘पोखरण’ काढतात कारण पोखरणीतून पाणी काढून भल्या पहाटे ‘पहिली आंघोळ’ करायची असते.

चित्रकार धुरंधरांच्या चित्रात भिंतीवर लावलेला जो पट दिसत आहे तो पूर्वी घरोघरी जपून ठेवलेला असे. लग्न, मुंज इत्यादी शुभकार्यात तो भिंतीवर लावला जाई.

सुहासिनी कीर्तिकर यांनी अतिशय सविस्तर माहिती दिली ती अशी -

पाठारे प्रभू ज्ञातीतील गौरी पूजनावेळी मागील भिंतीवर हा पट चितारला जाई. हा पट म्हणजे गौरीचे घर आहे. या घराच्या वर मध्यभागी प्रशस्त असे झुंबर असते. मग डाव्या बाजूला चंद्र आणि उजव्या बाजूला सूर्य रेखाटलेला असतो. त्याखाली डाव्या बाजूला गौरीच्या वेणीचा साज आणि उजव्या बाजूला तिच्या बांगड्या (पिछोड्या, बांगड्या, जाळीच्या बांगड्या, तोडे, गोठ, पाटल्या यांची एकात एक गुंफलेली सुबक वर्तुळे), बांगड्यांच्या वर्तुळात मध्यभागी नथ असे, हिऱ्यांच्या चांदणीसह टपोरे मोती असणारी. नंतर मध्यभागी खाली दोन समया, त्यामध्ये सोंगट्यांचा पट, त्याखाली डाव्या बाजूला तिची बेडरूम (शयनघर- ज्यात बाळाचा पाळणा हवाच), मध्यभागी तिचे स्वयंपाकघर- त्यात दोन बाजूंना मडक्यांची उतरंड, जाते, पाटा वरवंटा, चूल, मोरळी (विळी) हवीच. वरील चित्रात हा सर्व तपशील दिसत आहे. न दिसणारा आणखी तपशील म्हणजे स्वयंपाकघराच्या उजव्या बाजूला तिचे माजघर म्हणजे सिटींग रूम ज्यात पंखा, सोफा, खुर्ची, भिंतीवर एखादे तैलचित्र आणि पडदे असलेली खिडकी दाखवली जाई. त्याखाली सर्वात शेवटी डाव्या बाजूला विहीर, घंगाळ, बालदी, तांब्या, बाजूला तुळशीचे वृंदावन दाखवले जाई आणि उजव्या बाजूला शंकराचे देऊळ चितारले जाई. विशेष म्हणजे हा गौरीचा पट दरवर्षी नव्याने चितारला जाई आणि या पटासमोर बाजवटावर (चौरंगावर) गौरीस्थापना होत असे. वरील चित्रात वेणीचा साज उजव्या बाजूला आहे.

आता या चित्राविषयी- या सर्व स्त्रिया परभिणी आहेत. हे तैलचित्र परभांच्या लग्नसोहळ्याचे असून मंचावर पायापर्यंत मुंडावळ्या असलेली नववधू आहे. तो जो दिवाणखाना (हॉल) दिसत आहे तो धुरंधरांच्या स्वतःच्या घराचा आहे. या तैलचित्रासाठी त्यांना सुवर्णपदक मिळाले होते. हे सुवर्णपदक मिळविणारे ते पहिले भारतीय चित्रकार होते.

ही सर्व माहिती मिळाल्यामुळे श्री. विक्रम मराठे यांना खूप समाधान वाटले.

*

कथा

# निर्णय

**✶ निकेता प्रशांत राणे ✶**

सुलक्षणामामींच्या घरात आज सनई चौघड्यांचे मंगल सूर ऐकू येत होते. उद्या दिलीपमामांच्या भाच्याचे सुमीतचे लग्न होणार होते व आज गणपती पूजनाचा सोहळा होता. घरातील सर्व स्त्रीपुरुषांची वस्त्रालंकार लेवून आतबाहेर वर्दळ चालू होती. मामासुद्धा गणपतीपूजनाला बसण्यासाठी शिकारी किनारीचा जरीकाठी पितांबर व सिल्कचा शर्ट, त्याला सोन्याची बटणे, गळ्यात सोन्याचा गोफ घालून सज्ज झाले होते. पण ते सारखे कपाटात उलथापालथ करुन काहीतरी शोधत होते. शेवटी न राहवून सुलक्षणाने विचारले, ''अहो, मघापासून बघते, तुम्ही काय शोधता आहात?''

''अगं, माझी हिऱ्याची अंगठी, रोझ् कुठे सापडत नाही. तू कुठे ठेवला आहे का?'' दिलीपमामाने विचारले.

''अगंबाई, मी कशाला तुमच्या वस्तूंना हात लावू? असेल कुठेतरी, मग शोधू. कृष्णंभटजी केव्हाचे हाका मारीत आहेत. त्यांची सर्व तयारी झाली आहे, चला लवकर.'' सुलक्षणामामी म्हणाल्या.

सुमीत दिलीपमामांच्या बहिणीचा एकुलता एक मुलगा. पण ती बाळंतपणात दगावल्यामुळे मामांच्या आईने नातवाला आपल्या घरी नेले. कालांतराने दिलीप व सुलक्षणाचे लग्न झाले. सुमीत मामाच्या घरी लहानाचा मोठा झाला. मध्यंतरी सुमीच्या वडिलांनी पुनर्विवाह केला. चार वर्षात मामामामींच्या संसारवेलीवर 'प्रिया' व 'महेश' ही दोन पुष्पे आनंदाने डोलू लागली. आजीचेही निधन झाले.

सुमीत लहानपणापासून बुद्धीमान असल्यामुळे दिलीपमामाने त्याच्या शिक्षणात कोणतीही हयगय केली नाही. सुमीत व प्रिया आणि महेश एकत्र खेळता खेळता मोठी झाली. सुमीतने उच्च शिक्षण घेऊन तो आता प्रसिद्ध कंपनीचा डिरेक्टर झाला होता. तो प्रिया व महेशला अभ्यासात खूपच मदत करीत असे. त्याच्याकडे शिकता शिकता तारुण्यसुलभ प्रिया त्याच्यावर कधी प्रेम करु लागली ते तिलाच कळले नाही. दिलीप व सुलक्षणाने प्रिया लहान असतानाच सुमीतला जावई करून घेण्याचे ठरविले होते. पण सुमीतच्या मनाचा थांगपत्ता काही लागत नव्हता. मामा मामी त्याला आईवडिलांच्या ठिकाणी होते.

पण नियतीच्या मनात काही वेगळेच होते. प्रिया तर सुमीतला आपला भावी सहचर म्हणूनच पहात होती. प्रिया एम्.ए.च्या शेवटच्या वर्षाला होती. सुमीतचे तिच्या अभ्यासावर बारीक लक्ष होते. महेश तर जात्याच हुशार होता व तो अव्वल क्रमांकाने उत्तीर्ण होत इंजिनियरिंगच्या शेवटच्या वर्षाला होता. त्याचवेळेस प्रियाच्या नमूमावशीचा फोन आला की तिची मुलगी 'विद्या' पुढील शिक्षणासाठी अमरावतीहून मुंबईला तुमच्याकडे रहाण्यास येत आहे. सुलक्षणाने आनंदाने आपल्या भाचीला 'विद्याला' आनंदाने घरी रहाण्यास बोलाविले. प्रियालापण खूप आनंद झाला.

सुलक्षणामामीने विद्याचीही शिकवणी सुमीतला घेण्यास सांगितली. सुमीतला कंपनीच्या व्यापातून वेळ

काढावा लागत होता. पण विद्या अभ्यासात हुशार होती. शिकवलेली गोष्ट तिला लगेच आत्मसात होत असे. सुमीतच्या शिकवणीच्या सुलभ शैलीमुळे हळू हळू सुमीत तिला आवडू लागला. त्याचे आकर्षण तिला वाटू लागले. त्याच्यासोबत भावी संसाराची स्वप्ने ती रंगवू लागली. तिला जरी ठाऊक होते की प्रियाचे त्याच्याशी लग्न ठरले आहे तरीसुद्धा ती काहीतरी निमित्त काढून प्रियाला सुमीतपासून दूर ठेवीत असे. 'भावना' ही जगातील सर्वात खतरनाक नदी आहे, ह्यात सगळे वाहून जातात. त्याप्रमाणेच प्रेमाने विद्या आंधळी झाल्यामुळे स्वार्थासाठी ती वाहवत गेली.

विद्याला साहित्यात रूची असल्यामुळे ती मराठी कथा, लेख व कविता उत्तम लिहीत असे. तिच्या विलक्षण प्रतिभेचा प्रभाव हळूहळू सुमीतवर पडू लागला. नकळत तो तिच्यात गुंतत गेला. त्यांचे प्रेमप्रकरण घरी कळू नये म्हणून ते बाहेर भेटू लागले. आता विद्या लग्नासाठी सुमीतच्या मागेच लागली.

सुमीत एकदा विद्याला म्हणाला, 'मामा मामीने लहानपणापासून प्रियाशी माझा विवाह ठरवून ठेवला आहे. 'त्यांचे माझ्यावर अनंत उपकार आहेत. 'त्यांचा हिरमोड मी कसा करु?, खरं म्हणजे मी प्रियाकडे त्या दृष्टीने कधी पाहिलेच नाही; 'मला ती माझ्या धाकट्या बहिणीसारखी वाटते, काही सुचतच नाही.' लगेच विद्या म्हणाली, 'मग झालं तर! हेच तू तुझ्या मामीला म्हणजे माझ्या मावशीला सांग. सुरवातीला तुझा निर्णय मामीला आवडणार नाही.' 'पण माझ्यावरसुद्धा तिच्या मुलीसारखीच माया आहे.'

अखेरीला दोघांनीही मोठा धीर धरून मामा मामीकडे आपल्या प्रेमाची वाच्यता केली. दोघेही क्षणभर गंभीर झाले. आपल्या मुलीचा प्रियाचा विचार मनात येऊन त्यांच्या डोळ्यांतून अश्रू पाझरू लागले. तिची समजून कशी घालावी हा विचार त्यांना सतावू लागला.

सुमीत म्हणाला, 'मामा, तुम्ही काळजी करू नका. प्रियाला मी सर्व समजावून सांगतो.'

सुमीतने जेव्हा आपला निर्णय प्रियाला सांगितला तेव्हा तिला प्रचंड मानसिक धक्का बसला. आपल्या भावनांचा विचार न करता आपली फसवणूक केल्याबद्दल ती सुमीत व विद्याला अद्वातद्वा बोलली. समुद्रातील तुफानापेक्षा मनातील वादळे अधिक भयानक असतात. त्यामुळे राग व असूया ह्या भावनेने ती विद्याला म्हणाली, 'बहीण असून तू माझ्या भावनांशी अशी खेळलीस, तुझा संसार कधीच सुखाचा होणार नाही.'

प्रिया अतिशय दु:खी झाली. खरंतर माणूस दु:खालाही सामोरा जाण्यास तयार होतो. पण दु:ख किती आणि कुठपर्यंत सहन करायचं हे माहित नसणं हेच दु:खातलं दु:खाहून मोठं दुखणं! दु:खातही माणसाला स्थैर्य लागते तेच प्रिया दुरावून बसली. विद्याशी तिचं बहिणीचं नातं असलं तरी नाती ही झाडाच्या पानासारखी असतात. एकदा तुटली की त्याची हिरवळ कायमची निघून जाते.

नाईलाजाने सुलक्षणामामी सुमीत व विद्याचे लग्न लावून देण्यास तयार झाल्या. त्यांची 'इकडे आड तिकडे विहीर' अशी स्थिती झाली होती. त्या दिवसापासून प्रियाच्या तोंडावरचे हसू मावळले. ती एकलकोंडी झाली. तिला व्यवस्थित जेवणखाणही सुचेना. ती पूर्णपणे मानसिक तणावाखाली गेली.

उद्यावर लग्न आले. आज गणपतीपूजन. सर्वजण तोंडावर उसने हसू आणून वावरत होती. कोणास ठाऊक, पण आज प्रिया नटूनथटून पूजनाच्या सर्व विधीमध्ये उत्साहाने भाग घेत होती. सुमीत व विद्याची थट्टा मस्करी करत होती. सर्वांना तिच्यात झालेला बदल पाहून खूप बरे वाटले. दुपारची जेवणं झाल्यानंतर सर्वजण आपआपल्या खोलीत विश्रांती घेण्यास गेली.

संध्याकाळी उद्याच्या लग्नाची तयारी करण्यात सुलक्षणामामी मग्न झाल्या. त्यांना नमू मावशीही मदत करीत होत्या. उद्या वायनात देण्याच्या वस्तू कुठे ठेवल्या त्या मिळेनात म्हणून त्या प्रियाला हाका मारू लागल्या. पण प्रिया काही साद देईना. मग त्यांच्या

लक्षात आले की बराच वेळ झाला तरी प्रिया बाहेर आली नाही म्हणून त्या तिच्या खोलीचे दार उघडून आत गेल्या तर; प्रिया पलंगावर अस्ताव्यस्त पसरली होती. तिच्या तोंडातून फेस व रक्त वहात होते. मामीचे मन चरकले. त्यांनी तिला गदागदा हलवून पाहिले तरी काही प्रियाची हालचाल दिसेना. सकाळचा हिरवा शालू, हिरव्या बांगड्या व दागिने तसेच अंगावर होते. काहीतरी विचित्र घडले आहे याची त्यांना जाणीव झाली. त्यांनी मोठ्यांनी टाहो फोडला, सर्वांना हाका मारल्या. सर्वजण धावतच प्रियाच्या खोलीत गेले. डॉक्टरना फोन केला. सुमीतने प्रियाच्या हाताच्या घट्ट मुठी सोडवण्याचा प्रयत्न केला. एका मुठीत मामांची हरवलेली सात हिऱ्यांची अंगठी होती. तो मामांना म्हणाला, ‘मामा, ही पहा तुमची अंगठी. पण यातील एक हिरा दिसत नाही.’


तेवढ्यात डॉक्टर आले. त्यांनी प्रियाला तपासले आणि सांगितले, ‘शी इज नो मोर. तिने हिरा खाऊन आत्महत्या केली आहे.’ त्यांनी दुसऱ्या हाताची मूठ सोडवून बघितली तर त्यात एक चिठोरे सापडले, त्यावर लिहिले होते, ‘आत्महत्या करण्याचा निर्णय माझा स्वत:चा होता. त्याबद्दल कोणालाही जबाबदार धरु नये. क्षमा असावी.’

निर्णय! ह्या तीन अक्षरी शब्दात होत्याचे नव्हते झाले. कोणाचा ‘निर्णय’ बरोबर आणि कोणाचा चूक?

प्रियाचा, सुमीतचा, मामा मामींचा की विद्याचा?

मोबा: ९८९२२५३४४३

*



लेख

# कुठे कुणाच्या घडल्या भेटी

**✶ संजय शरद दळवी ✶**

कुठे कुणाच्या घडल्या भेटी
गीत एक मोहरले ओठी
त्या जुळल्या हृदयांची गाथा
सूर अजूनही गाती!

आयुष्याच्या ह्या सारीपाटावर असंख्यानेक पात्रांनी येजा चालूच ठेवली आहे. काही पात्रे आपला ठसा कायमचा मागे सोडून जातात, कित्येक पात्रांची पत्रासही ठेवली गेली नाही, खूप असेही भेटले की त्यांच्याशिवाय आपले पानही हलणार नाही ह्याची खात्री पटता पटतानाच ते सोडून दूरही निघून गेले. काही सुहृद कायमचे टिकून राहिलेत. क्वचित् थोडे असेही होते की ते सदैव बरोबर राहिले पाहिजे होते, पण आपल्याच मूर्खपणामुळे त्यांना गमावून बसतो आपण. सारीपाट खेळण्यासाठी फासे फेकावेच लागतात. दान हरघडी हवे तेच पडेल ह्याची शाश्वती कधीच नसते आणि पडलेल्या दानावरून खेळ सुरू ठेवण्याची धमक नसेल तर डाव संपवावाच लागतो.

गेलेल्यांचे दु:ख करू नये आणि नव्याने आलेल्यांचे स्वागतच करावे असे म्हणतात, पण काहीजण असेच टके देऊन जातात की त्यांची आठवण पुसू म्हणता पुसली जात नाही. त्याचबरोबर, आपणही जाणता, अजाणता, कुणालातरी नको तितक्या जखमा करून त्यांच्या आयुष्यांतून एक्झिट घेतलेली असते. बाण सुटतो तेथे कुठलीही निशाणी राहत नाही, पण जिथे तो रुपतो, भले जीवघेणी नसेल, पण जखम करतो; तिथून उच्चटन झाल्यावरही आपली निशाणी व्रणाच्या रूपाने कायमची ठेवून जातो. ह्या झालेल्या जखमांचा हिशोब जनमनाच्या खोल कोपऱ्यात दडून बसलेला असतो, तसा आपण दुसऱ्यांना दिलेल्या जखमांचा हिशोब ठेवत नाही. किंबहुना, आपण काहीतरी बोलून अथवा वागून कुणाला तरी अपरिमित दु:ख दिलेय, हेआपल्याला लक्षातच येत नाही. कारण आपण वार करण्याकरिता काही बोललेलो नसतो. बहुतांश वेळा स्वत:शी आणि स्वत:च्या मनाशी प्रामाणिक राहून आपण केलेल्या कृती अथवा बोलून गेलेले शब्द कुणाला तरी विव्हळ आणि घायाळ होण्याइतपत दुखावून जातील हे आपल्या गावीसुद्धा नसते. मग असे असता आपल्याला झालेल्या जखमासुद्धा कुणीतरी जाणूनबुजून वा विचारपूर्वक दिल्या नसतील असा हिशोब न मांडता का आपण त्यांना उराशी कवटाळून बसतो? अर्थात, ज्याचे जळते, त्यालाच कळते आणि परदु:ख शीतल हेच खरे. प्रत्येकाच्या दु:खाची तीव्रता आपापल्यापरीने कमीजास्त असते.

आपल्या आयुष्यात येऊन गेलेल्या व्यक्तींची, आणि निसटून गेलेल्या क्षणांची यादी नाही करता येणार. पण आपल्या हातून घडलेल्या चुकांचे हिशेब मात्र मनात सतत रुंजी घालत राहतात. 'ती आता काय करते?' किंवा 'तो आता कुठे असेल?' अशा सिनेमांची सूचक नावे एखाद्या क्षणापुरती रेंगाळतात मनात; पण त्यामुळे हलायला आता आयुष्य इतके लवचिक नाही राहिले आहे. निबरपणाचा कळस नाही म्हणत मी, पण एखाद्या व्यक्तीविना आयुष्य घालवल्याची बोच सतत नाही जाणवत. 'ह्यावेळी',

ती अथवा तो, कसा व्यक्त झाला असता, हे विचार न डोकावून जाण्याइतके निबर नसतो आपण, पण व्यवहारात सरळ नाकासमोरच जायचे हेच जीवनाचे सार मानल्याशिवाय जगणे मुश्किल होऊन जाईल एव्हढे मात्र नक्की कळलेले असते.

अनुभव, अनुभव, म्हणजे हाच असतो का? का धुमसण्याऱ्या निखाऱ्यांवरची राख आपल्याला आपल्याच दु:खाची बोच विसरायला किंवा आभासी वातावरणनिर्मितीत विरून जायला लावते? कारण काहीही असो, पण अपवाद वगळता प्रत्येकाच्या मनाच्या तळाशी एक विराट चिरंतन विचार सदैव जागाच असतो. आपण जगाला फसवू शकू, पण स्वत:लाच कसे फसवता येईल? ज्याला इंग्रजीत Conscious म्हणतात त्याचे शब्दश: भाषांतर मराठीत केले तर त्याचा अर्थ जाणीव हा आहे, आणि आपण कुठे आणि किती चुकलो ह्याची संपूर्ण जाणीव आपल्या अंतर्मनाला सतत असते. शब्दांचे बुडबुडे काढत आपण त्यांचे फक्त समर्थन करतो.

'जाणीव' हा शब्द एक गहन आणि बहुआयामी शब्द आहे ज्यामध्ये मानवी अस्तित्वाचे सार समाविष्ट आहे. ही जागरुकतेची स्थिती, जाणण्याची, विचार करण्याची आणि अनुभवण्याची क्षमता दर्शवते. जाणीव असणे म्हणजे शब्दाच्या खऱ्या अर्थाने जिवंत असणे होय.

शेवटी, चेतना हा मानवी अस्तित्वाचा एक गहन आणि रहस्यमय पैलू आहे. आपल्याकडे सर्व उत्तरे नसली तरी, चेतनाचा शोध घेत आपल्या आकलनाच्या सीमांना पुढे ढकलत असते. आपल्याला आपल्या स्वत:च्या जागरूकतेचे स्वरूप आणि अस्तित्वाच्या मूलभूत प्रश्नांवर विचार करण्यास आमंत्रित करते.

ह्याच्या मुळाशी चेतना ही आपल्या स्वत:च्या अस्तित्वाची आणि आपल्या सभोवतालच्या जगाची जाणीव आहे. हा प्रकाश आहे जो आपल्या मनाचे रंगमंच प्रकाशित करतो, ज्यामुळे आपल्याला भावना, विचार आणि संवेदनांचा कॅलिडोस्कोप अनुभवता येतो जे आपले जीवन परिभाषित करतात. चेतना हा बाह्य वास्तव आणि आपल्या अंतर्गत जगामधील पूल आहे, जो आपल्याला आपल्या सभोवतालची जाणीव करून घेण्यास आणि आपल्या नशिबाला आकार देणारी निवड करण्यास सक्षम करतो.

तरीही, चेतना ही एक अखंड संकल्पना नाही. ही एक गतिमान आणि विकसित अवस्था आहे जी झोप, ध्यान, बदललेल्या चेतनेच्या अवस्था आणि अगदी न्यूरोलॉजिकल विकारांसह विविध घटकांद्वारे बदलू शकते.

चेतनेचा अभ्यास हा एक सखोल आणि सततचा शोध आहे. शिवाय चेतना व्यक्तीच्या पलीकडे विस्तारते. ती आपल्याला समाजाच्या सामूहिक चेतनेशी जोडते; सांस्कृतिक नियम, मूल्ये आणि विश्वासांना आकार देते. हे आपल्या नैतिक होकायंत्रावर, सहानुभूतीची आपली क्षमता आणि एकमेकांबद्दलची जबाबदारीची भावना आणि आपण ज्या ग्रहाला घर म्हणतो त्यावर प्रभाव पाडते.

थोडक्यात, 'जाणीव' ही शब्दापेक्षा अधिक आहे; हे स्वत:ला आणि जगाला सखोल समजून घेण्याचे द्वार आहे. हे आपल्याला आपल्या स्वत:च्या जागरूकतेच्या सीमा शोधण्यासाठी, वास्तविकतेच्या स्वरूपावर प्रश्नचिन्ह निर्माण करण्यासाठी आणि सर्व सजीवांच्या सखोल परस्परसंबंधांना स्वीकारण्यासाठी आमंत्रित करते. हे आपल्याला आठवण करून देते की अस्तित्वाच्या भव्य टेपेस्ट्रीमध्ये, चेतना हा एक धागा आहे जो आपल्याला जीवनाच्या फॅब्रिकमध्ये विणतो ज्यामुळे आपल्याला विश्वाचे सौंदर्य, जटिलता आणि आश्चर्य अनुभवता येते

इंग्रजीमध्ये एक सुंदर म्हण आहे: A broken bone, or love, if links well, the link is stronger than ever. If not, it cripples you.

तुटलेली हाडे आणि तुटलेले प्रेम या रूपकात्मक संकल्पना आहेत ज्यामानवी अनुभवाच्या दोन अतिशय भिन्न पैलूंचे वर्णन करतात. जरी त्यांची थेट

कविता

# पंढरीचा राया

**- सौ. निकेता प्रशांत राणे**

युगे अठ्ठावीस उभा विटेवरी,
कर दोन्ही ठेवून कटेवरी।।
सावळे रूप तुझे असे मनोहर,
तव दर्शनाने होतात श्रमपरिहार।।
आषाढी-कार्तिकी वारी करतात वारकरी
पावन होतात स्नान करुन चंद्रभागे तीरी।।
ज्ञानोबा-तुकोबाच्या नामे दुमदुमते पंढरी,
साजरे-गोजिरे तव रुप भक्तांचे चित्त हरी।।
अश्वाचे रिंगण वारीचे असे भूषण,
नम्र होऊन भक्त घालती लोटांगण।।
पंढरीच्या राया तू असशी सर्वांची माऊली
विश्वावर धर रे तव मायेची साऊली।।

*

---

तुलना करता येत नसली, तरी लोक ज्याप्रकारे त्यांना भावनिक दृष्ट्या समजतात आणि अनुभवू शकतात त्यामध्ये तुम्ही काही अमूर्त समानता काढू शकता.

तुटलेली हाडे आणि तुटलेले प्रेम दोन्ही आश्चर्यकारकपणे वेदनादायक अनुभव असू शकतात. शारीरिक वेदना तुटलेल्या हाडांशी संबंधित आहेत, तर भावनिक वेदना आणि हृदय दुखी तुटलेल्या हृदयाशी संबंधितआहेत. शारीरिक आणि भावनिक जखमा दोन्ही बरे होण्यास वेळ लागतो. हाडांना वैद्यकीय उपचार, विश्रांती आणि पुनर्वसन आवश्यक असते, तर हृदय बरे करण्यासाठी अनेकदा स्वत:ची काळजी, वेळ आणि भावनिक आधार यांचा समावेश होतो. जेव्हा तुमचा हृदयभंग झालेला असतो तेव्हा तुम्हाला असुरक्षित आणि उघडे वाटू शकते. दोन्ही प्रकरणांमध्ये, तुम्हाला समर्थन आणि सहाय्यासाठी इतरांवर अवलंबून राहावे लागेल. तुटलेली हाडे शारीरिक चट्टे सोडू शकतात आणि तुटलेल्या हृदयातील भावनिक चट्टे एखाद्या व्यक्तीच्या भावी नातेसंबंधांवर आणि भावनिक आरोग्यावर परिणाम करू शकतात. बरे होण्याच्या आणि पुनर्प्राप्तीच्या प्रक्रियेतून जाण्याने लवचिकता निर्माण होऊ शकते. या अनुभवांमधून लोक पूर्वीपिक्षा अधिक मजबूत आणि अधिक लवचिक बनतात. दोन्ही प्रकारचे 'तुटलेले' जीवनातील दृष्टीकोन आणि प्राधान्यक्रम बदलू शकतात. हे व्यक्तींना त्यांच्यासाठी खरोखर काय महत्त्वाचे आहे आणि त्यांना भविष्यात काय हवे आहे याचे पुनर्मूल्यांकन करू शकते.

लोक शारीरिक आणि भावनिक वेदनांमधून मौल्यवान धडे शिकू शकतात. हे लक्षात घेणे महत्त्वाचे आहे की या समानता अस्तित्वात असताना, भावनिक अनुभवांशी शारीरिक जखमांची तुलना सावधगिरीने केली पाहिजे. भावनिक वेदना आणि शारीरिक वेदना मूलभूतपणे भिन्नआहेत.

लेख संपवताना मात्र इंग्रजीचाच आधार घेतो आहे-

In youth's embrace, my heart took a flight,
First love's sweet bloom, a radiant sight.
But fragile as a tender dove's wing,
It shattered, leaving echoes of every spring.
Memories linger of a love now past,
A lesson learned, though it didn't last.
From the fragments of that bittersweet dove,
I am yet to find strength to seek a truer love.

*

❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀

# Mermaid Adventures

✶ **Ananya Saxena** (8 years old) ✶

❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀

Once upon a time, in the depths of the scary and gorgeous blue ocean lived a beautiful mermaid who loved to flick her long blond hair over her shoulders and blind the little fish with the twinkling stars in her bluish-purple sparkly tail. Her name was Ember and she was the princess of the grand mermaid shell castle. She always wore the royal silver crown.

One cold winter day, when cold winds blew through the beach and the ocean was roaring with icy waves, Ember was swimming home after playing with her friends. It was getting dark quickly and Ember shivered slightly as she hastened to reach home quickly. Just then she heard a friendly voice bellow from near her "Ember, how are you?"Soon huffing and puffing Mr.Jolly fish came near her. Just as Ember began to smile seeing the wide grinning Mr.Jolly fish, there was a sudden deep rumble and a loud sound – whoosh whooshhooo whoosh splash. Ember was temporarily disbalanced by the sudden rumble and tumble. When she opened her eyes, she saw the naughty Mr. Turtle dragging Mr. Jolly fish into the dark and grim shark's den.

Ember panicked and she swam as fast as she could to her castle. When she entered the castle gates, she saw another bluish-purple sparkly tail dancing in merry. It was her identical twin Lily. She told Lily what had happened. "We have to save Mr. Jolly fish, will you help me?" Lily was always ready for an adventure and she quickly agreed to help, and free Mr.Jolly fish.

The two mermaids quickly collected some weed. They covered their bodies with some seaweed and duckweed. They used some dried leaves of the aquatic plants to cover their tails to make them look like the plants which grew in the shark's den. The moon shone bright as the mermaids waited for their parents to sleep.

At midnight, when their parents were fast asleep, Ember and Lily went to the shark's den. The sharks were

sleeping too. There were many plants just like them in there. They started looking for Mr.Jolly fish. They moved quietly and searched everywhere around the sleeping sharks. The den was dark and the mermaids had a difficult time finding Mr.Jolly fish. After a while Lily heard some sound. As she swam in the direction of the sound, she came across a cage and in it was Mr.Jolly fish! She swam around to inform and bring Ember to the cage. The cage was locked and the sisters could not break it open. They started searching for the keys.

"Heeheehee, haahaahaa" they turned to find a baby shark giggling looking at them. They froze, they knew the baby shark was going to be bawling soon to call his parents. But the baby shark continued smiling as he saw these funny plants searching for the key which he was playing with. He offered the key to the mermaids, Ember gratefully took the keys, quickly freed Mr.Jolly fish, thanked the baby shark and started to get out from there. Just as all three of them were swimming fast the sleeping sharks, Ember's tail hit a giant Shark's face – Thapaaak! The shark woke up. He recognized the mermaids disguised as plants and saw Mr.Jolly fish escaping with them. He got angry seeing them in his den and started chasing them. The girls were scared and they swam in different directions to escape from the shark. Ember was also holding Mr.Jolly fish as he could not swim fast. Both the girls found little dark corners and hid there and prayed hard they would not be discovered. The shark swam around in circles but he could not find the mermaids. He soon got tired and sleepy, and went back to sleep. Carefully, Ember, Lily and Mr.Jolly fish came out from their hiding spots and swam back to their homes. It had been a long and adventurous night for them.

The next morning, Ember, Lily and Mr.Jolly fish went to the ocean police officer and narrated their nightmare. They complained against the naughty Mr. Turtle. The police officer locked the naughty Mr. Turtle in jail and assured the trio that Mr. Turtle would not harm them in future.

Thus, the mermaids and Mr.Jolly fish lived in peace and harmony after that.

**'कणिका'**

**ऊन - पाऊस**

थोडासा पाऊस,
थोडेसे ऊन;
पिवळ्या इमारती
झळाळल्या न्हाऊन!

**- सुहासिनी कीर्तिकर**

❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀

# SENIOR-ITA

✶ **Aparna Sameer Vijayakar** ✶

❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀

Fresh and alert, I am wide awake. The mobile, yup, clocks are now passe…..mobile shows, 5.30 am. my usual time to crush my letssleepsomemore demon…

And a memory , nagging and niggling ,crept in my mind . What was it …milk bag already hanging by its poor neck outside, all my promises to various cribbers done and dusted , no one to be wished ( on wassup , ofcourse) remembered its my cheat on food &beverage & exercise Day ..ta daa…so what the heck …

Yup …its Yesterday …!!!!

The day I had been waiting for …to become someone what all my friends are….

Officially to become A Seniorita…

All my friends and near dear ones had joyfully reminded me (. Dear wassup, what wud we do without you …!) that now I was holding a flag with the inscription …60 …! That's it ..!

Anyone with an Indian heart , mentality and Familial love , knows what an important Landmark this number is in anyones life .but I am still wondering about it and still am clueless…hello , I am not going to any Vaanaprashthasram nor am I going to retire …so . :whhhyyy…!!!!?

Many wished me as a budday Gal ..but me too with my IndianVanity Itch , mentioned coyly …this is my landmark budday .!

Ohh my unmerciful day ….response expected ..whhhhaaattt ?you don't look that !!Joking , right ?!!

Response I get …hey , wow , welcome to our club …that's 70+ sweetie …and , hey double Congrats .!

Congrats ? congrats for what ?

Have I passed some test ? Maybe yes .. like some , having survived the hazards of crossing Indian roads , avoided pollution inducedasthama , kids induced nervous breakdown , or smarty pants grandkids induced inferiority complex , or maid servant induced Parkinson ….disclaimer here is , total amnesia on Relatives induced anxiety …..wicked me!

Really , that set me thinking , typical Indian seniorita that I am ….what are my gains now as

# Seniorita# , now that I have climbed the gentle and sometimes not so gentle steps to reach this $60^{th}$ step .

Hey , why think …? Just Google it !

Yes , its indeed been a very fruitful life for our generation … we have Wren &Martined , we have Dictionaried and now we Google everything .. Super .But not all smart things give us the proper answer like Corepatis phone o friend …sad ….so here is google telling me the various schemes for saving and feeling good …no nono ..not acceptable to a housewife who has never ever earned a penny in her life …what fun and good are

all these saving schemes good for me ..all that my hubby has taken care of for me and more !!!!

So why is Google not telling us all those fun things we can indulge in ..?

Go to bed super late after a whole night of OTT binge watching , then promptly forget which App it was seen on , a roadtrip with no Time constraints( remember Seniors are retired species ..!) , ask the grandkids to vamoose as we are watching late night serials ….

Hmmmm , we too had a bucket list , but somewhere down the years got used to pile up the washed or unwashed clothes ….many a times , as and how we got the chance , we did pull out certain chits we had stashed in….now that the kids have flown the nest , SenioritaMadam is going to dig that Bucket stored from beneath the Pochhaa bucket . Finally ..!

Now I want it chamkaoed …afterall want to read all those chits with seniority affected eyes. A simple thing , no doubt , but the clock says , hurry darling , start retrieving all those chits . The kids are happy with our decision to dust things .

Ohhh , the doorbell .. milkman has come ..ummm…better get up .


Hmmm ,ohh..the clothes on the stand are dry …fold them

Straighten the bed . fold the razaaii, switch on the boiler , stuff the washing machine ,put on the coffee ….sorry guys….

Smell the coffee !!

Even Senioritas have to do things out of the box …oops ..out of the bucket !!

Mob: 9819006515



लेख

❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀

# Sanatana Dharma - सनातन धर्म

**✶ Pravin Mankar ✶**

❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀

Currently the topic of Sanatana Dharma is being aggressively discussed in many parts of the country and I thought it appropriate to express my views on the subject. सनातना धर्मा is how the anglicized Indians would pronounce the words, and I don't blame them because they have not been educated in the richness of the Sanskrit language and its various Indian language branches. If we write the word सनातन in English, ideally it would be SANATAN. The letter 'A' is added at the end because in Sanskrit or Marathi, we pronounce न् as half न or हलन्त (halant) as in अन् (pronounced un) which is different from अननस (ananasa), where न is pronounced fully.

That is one reason why Marathi accent is laughed at by non-Maharashtrian people. Anyway, the subject is not about pronunciation but the ignorance about our culture and heritage. I am choosing to write in English because, unfortunately, our own people have distanced themselves from their roots – language being one such dissociation.

So, what is Sanatan? Literally it means ETERNAL, which in turn means without a beginning or an end of existence, which means TIMELESS. Is Sanatan Dharma the same as Hinduism? While there is no shortage of historical scholars, sages, and teachers in Hinduism, there is no historical founder of the religion as a whole, no figure comparable to Jesus, the Buddha, Abraham, or Muhammad. As a consequence, there is no firm date of origin for Hinduism, either. If we go by the definition of Hinduism as a way of life practised by the people of the Hind region, then Hinduism is the practice of a geographic region. That brings us to the question "Is Hinduism a religion?" We have a typical answer that Hinduism is a way of life and not a religion. So what IS a religion? By consensus, a religion is a **belief** of usually 5 elements, namely

1. There is a supreme entity called deity or God or any other name)
2. The deity should be worshipped
3. Religious "practices" will cultivate virtue
4. Repent or penance for doing something "wrong"
5. Get rewarded or punished for doing things in this life-form or next.

And what are these "practices"? They are a system of activities that unite a group of people.

What is "wrong"? Anything that goes against the beliefs, systems and practices of that particular group is "wrong".

So, by the above definition of religion, it is not sustainable because it is localized to groups of people and can therefore vary from geographic location to location and from era to era. In other words, it varies from time to time and from region to region. Therefore, whatever varies cannot be ETERNAL and is therefore not Sanatan.

That brings us to the word DHARMA! Is the dharma and religion the same? Some people equate it and believe it to be so. However, dharma simply means being true to your nature. It is the dharma of a lion to kill a prey to eat and survive. Even in extreme starvation, a lion will not eat grass. It is against his "dharma" or nature to eat grass. In the evolutionary chain or sequence of creation, each species "knows" its dharma by instinct or intuition. When it comes to man, that instinct or intuition is dull. WHY? Simply because man has been given a superior intellect as compared with any other species and it is this gift of intellect which challenges man to "discover" his "dharma".

Now let us combine these two words – Sanatan and Dharma! The meaning becomes crystal clear – "discovery of the eternal (truth)" which many call "God" is the "purpose" of human existence. What has caused confusion in mankind is the description of different Gods in different lands at different times in the history of man. It is this process of discovery that leads man to enlightenment and the final destination which people call "Moksha" or "Nirvana" or a state of "sat-chit-anand".

Now, the next piece of the puzzle! Who or what is God? The key lies in two words viz. "discovery" and "enlightenment". Discovery is the journey and enlightenment is the destination. The term "enlightenment" means dispelling darkness. Darkness of the intellect means ignorance. Mankind is blessed with superior intellect but it is enveloped in ignorance. When we tear down the envelope of ignorance we come into the light of knowledge. Which knowledge? The knowledge of the eternal truth which is ageless and thus imperishable. Opposite of darkness is light and light is a manifestation of energy. Energy is pure vibrations having amplitude and frequency. When the human being is able to match the frequency and amplitude of his existence with the frequency and amplitude of the universal energy, he discovers the truth and becomes one with the truth himself. At-one-ment with the supreme which we refer to as atonement!

When we undertake the journey in our quest for this eternal truth we are on our way to enlightenment. And that is the SOLE PURPOSE of the life-form called human being. It is beyond land, time, religion or any other belief and therefore it is imperishable.

When people call for a ban or eradication of Sanatana Dharma, little do they realize that they are talking of the impossible. They may succeed (if ever) in eradicating the words, but not the truth.

Now let us address the issue of the atheist! When you say there is no God, what you are actually denying is the "word" or "words" that represent God. But if you understand that God is pure energy and that the whole universe is filled with energy in the visible form (sagun/सगुण)

and the invisible form (nirgun/निर्गुण), you cannot deny its presence or eradicate it. It is omnipresent (present everywhere at the same time/सर्वव्यापी; it is omniscient (knows everything/सर्वज्ञ); and it is omnipotent (it is all powerful/सर्वशक्तीमान). Scientifically speaking you are in the realm of quantum physics. Therefore, science is spirituality and spirituality is science.Those who deny God, deny quantum physics or science.

So, where or how does Hinduism connect with Sanatan Dharma? How is Ramyan or Mahabharat part of Hinduism? Now here is how things must have panned out. Since spirituality is abstract and it cannot be understood through the sense organs, for the average intellect (the common man), an easier via media was created in the form of stories and tales weaving the principles or laws of life with characters and events in a storyline. Here is one example! The story of Sage Vishwamitra and Apsara Menaka is famous. Menaka is a beautiful maiden sent to break the meditation of Vishwamitra. Ostensibly, she succeeds because Vishwamitra succumbed to his lust and passion when he saw her beauty! This story is easily understood by any common man. The spiritual teaching from this story is now lost from the masseswith the passage of time. The underlying message in this story is that when man, in his quest for enlightenment, starts practising contemplation (मनन-चिंतन) on the seven chakras, to attain the highest state of meditation, the first to vibrate is the mooladhara (मूलाधार) chakra at the tailbone in the spine. If he succeeds in reaching the seventh chakra or sahasrara (सहसार) he will get enlightened. This journey of activating the chakras is not free from difficulties. When the mooladhara chakra starts vibrating it stimulates the organs near the tailbone. One such organ is the sex organ which gets stimulated. If a man (represented by Vishwamitra) succumbs to this stimulation, his practice/penance (तपस्या) is destroyed (भंग). The message to the aspiring man is to become aware of this danger should he start meditating. Different storylines with plots and sub-plots were created to explain to man the tiniest nuances of simple living and high thinking. These plots and sub-plots became epics or mahakavya (महाकाव्य) like Ramayan and Mahabharat. As the literature flourished, the whole body of spiritual text became known as Hindu religious text and the principles they depicted became known as Hindu religion.

The generation of today must realize the greatness of Sanatana Dharma and not be fooled or bull-dozed into believing that their religious roots are inferior to the more modern religions. We have been lucky to be born in a culture that has such a rich and scientific heritage. Let us go back to our roots and rise up tall, strong and powerful as our great ancestors.

*

❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀

# Autobiography by Diwali Lights

**– By Ayaana Alaap Jayakar**

(Grade IV)

❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀

Hi! I'm a Diwali light. I was manufactured in Funhouse. I have a problem; I can't stop blinking!

My master is a young girl named Zia. She is kind and humble. She always takes me out of my box on this festival which humans like to call-Diwali. I am very colourful. Like I mentioned, I blink a lot but seems like not every light can do this. A few of my cousins don't blink, it's very complicated. I am always either hung on walls or windows. My master and I love to spend time together, although I do find it weird when she smiles and stares at me. I love to meet new people. I love when they compliment me. I feel very jolly and holly. Both me and my master hate when the festivals come to an end. I hate it because I have to go back in the dark box! But my master hates it because guests stop visiting her. Atleast she wraps me up nicely and keeps me back, I've seen people slam other lights into the box and I feel pity on them but the worst part is that they are my family!

I always look forward to meeting her, her family and the guests. See you soon!

Happy Diwali to all!

✳

# Kenning Poem: Earth Protector

**– By Ayaana Alaap Jayakar**

(Grade IV)




WaterConserver;

EarthLover;

Cloth bag User;

CleanPartner;

AnimalHelper;

EnvironmentWarrior;

NatureSaver;

Waste Manager;

TreeHugger;

Who am I?

I am an Earth Protector!

✳

❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀

# Touch Me Not

✶ CS Ishani Shreyas Senjit ✶

❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀

They grew everywhere in the backyard, when I was a kid, the Mimosa Pudica or the beauteous Touch- Me- Not plant. In fact, clumps of them grew everywhere alongside the road to my school and I never stopped till I closed down every single of their delicate leaves.I could not resist touching the little leaves and delighting in their split- second reaction. Whenever I would see the plant, I touched it with the sheer pleasure of seeing those leaves shrink.I was always intrigued by the plant's instant response to the stimuli and the way it would droop at the slightest touch.

That little perennial plant can rekindle the eternal child in anyone. They rise up early morning, flex their leaves and are extremely shy. They blush when somebody touches them and when the sun sets, they wilt, droop and retire. They probably shrink as a defense mechanism from the predators.

And what when a woman screams? Doesn't she say,"Touch me not"?

From the primeval times the woman has striven to cushion her sanity.She is a source of compassion, a protector, a provider and acomrade in the human species. And yet the man does not take cognizance of her as a living human being.She tries to overcome all the hurdles alone. A woman is a beautiful creation of God. An angel on earth whomakes life a wonderful experience all- together! Imagining life without a woman is impossible. She rocks the cradle with one hand and can rock the world with the other.

But still she is the one who is rendered helpless, destitute, to be at the mercy of the man and at his beck and call.The plight of women has onlygone downhill over the years whichhas jolted their confidence.

We all have heard our mothers, fathers, or guardians say, "No means no". But it looks like a myth when the predator does not realize the meaning of the word 'NO'. Without a hitch, the word escapes their ears and vanishes into thin air! One bad touch and the innocence of a little girl is eroded into a nightmare.

One of the biggest ironies is that the 'Touch- Me- Not' plants are touched the most.Why is it so difficult for people to understand that respecting someone's personal space is the most dignified thing one can do?

Somewhere amongst this chaos, I grew up to realize the importance of offering the due respect to Mimosa Pudica.

It says **TOUCH ME NOT and I won't**……..

✳

लेख

# सगुणनिर्गुण - रूप मनोहर

**✶ प्रकाश तळपदे ✶**

सगुण - निर्गुण, साकार - निराकार हे शब्दच मुळी किती गोड मोहक. अगदी त्या परमेश्वराशी - निसर्गाशी निगडीत जाणवतात. परंतु सत्य - असत्य, शाश्वत - अशाश्वत हे शब्द संभ्रमात नेणारे वाटतात. एकंदरीत पाहता सत्य - असत्य, शाश्वत - अशाश्वत हे समजून घेताना, ह्यावर विश्वास ठेवताना हजारदा विचार करावा लागतो. कारण प्रथमदर्शनी सत्य किंवा शाश्वत वाटणारी परिस्थिती क्षणार्धात असत्य किंवा अशाश्वत वाटून जाते. शेवटी अडल्या - नडल्याची अवस्था मृगजळासारखी होते. खरं पाहता मृगजळ हेच मुळात भूल-भूलैय्या असते. एखादा पामर म्हणा किंवा वाटसरू म्हणा, काही साध्य करण्याच्या उद्देशाने पुढे जात राहतो. परंतु त्यात त्यांची निराशाच होत जाते, म्हणजे लकाकणारे सगळेच सोने असतंच असं नाही.

आजकाल गुरूचे पीक सगळीकडे फोफावले आहे. त्यात साधू तर काही विचारूच नका. ते साधू नसून संधिसाधूच म्हणायचे. आता गुरू नावाचं नामकरण होऊन बापू झाले आहेत.

हा बापू, तो बापू हे सगळं बापूंचे भांडार म्हणजे खिसेकापूचे भांडार झाले आहे. आजकालचे गुरू सगळ्यांना दीक्षा देत फिरतात. दीक्षा म्हणजे खिरापत वाटली की काय? मिळेल तशी वाटत सुटायला. हे साधू - गुरू (बापू) हे खरे जातीवंत गुंड असतात.

त्या सगळ्यांनी पोलिसांच्या ससेमिऱ्यातून बाहेर पडण्यासाठी दाढी-केस वाढवून, भगवे कपडे, माळा घालून, भस्माचे पट्टे ओढून, खडावा-माळा-कमंडलू जे आता बाजारात सर्रास मिळते.; ते घ्यायचे आणि बुवा तिथे बाया तसं अगदी भोंदू बनून गल्लोगल्ली सावज बघत फिरायचे. एकंदरीत 'तो मी नव्हेच' असे हे गल्लाभरू प्रसिध्दीच्या झोतात रात्रंदिवस वावरणारे, असे लफंगे कुंभमेळ्यात, तीर्थक्षेत्री अफू-गांजाच्या व्यसनात गुंतलेले शेकडोंनी बघायला मिळतात. अशा तांत्रिक-मांत्रिकाच्या सहवासात जाऊन आपलं जे थोडे बहुत पुण्य आहे ते सर्व सामान्य माणूस गमावून बसतो, मग कपाळाला हात लावायची वेळ येते.

जेव्हा अशी काही गोष्ट किंवा यशप्राप्ती करायची असते, तेव्हा सारासार विवेकबुद्धीचा वापर करूनच पुढे जाणे योग्य. नाहीतर हातचे सोडून पळत्याच्या पाठी धावणं धोकादायक ठरू शकते.

शेवटी ह्या शाश्वत-अशाश्वत जगाचा न्यायच असा आहे- वळले तर सूत, नाहीतर भूत! म्हणजेच अशाश्वताकडे जाण्यापेक्षा शाश्वताच्या दिशेने जाणे योग्य. तेही... निर्गुण - निराकार शक्तीला शरण जाऊन, त्याशी एकरुप होऊन.

स्वबुद्धीला प्रामाणिक राहून, वेळप्रसंगी माझ्यातला मोठेपणा सोडून पुढे गेल्यास यश हे हमखास प्राप्त होते.

शेवटी 'मी' काहीच करत नसतो. सर्वकाही हेतू - बुद्धीपुरःसर तो परमेश्वरच करत असतो. रामायणातसुद्धा रावणानी मारिचाला सुवर्ण-मृगाचं रूप धारण करून सीतेला मोहात पाडले. केवळ हव्यासापोटी रामाला ते सर्व अशाश्वत आहे हे माहीत असूनही शेवटी पत्नी हट्टापायी रामाला दुरावा तर

सहन करावा लागलाच. परंतु सीतेला पण रावणाने पळवून नेले व पुढे युद्धाला सामोरे जावे लागले. म्हणजेच शाश्वत-अशाश्वत, सत्य-असत्य हे माणसाला केवळ मोहापायी खोल गर्तेत घेऊन जाते. मी स्वतः अनुभवल्याप्रमाणे परमेश्वराला म्हणजेच सगुण निर्गुण प्रवृत्तीला शरण जाऊन जर काही प्राप्त करायचे ठरवले, किंवा प्रयत्न केला तरी शाश्वताकडे जाणे योग्य ठरते. शेवटी परमेश्वर मानवाला शाश्वत तसेच सत्याकडे घेऊन जात असतो, परंतु आततायीपणा केल्यास तीन-तेरा कधी वाजतील तेच कळत नाही. हे झाले शाश्वत-अशाश्वत, सत्य-असत्य.

आता आपण सगुण-निर्गुण,

साकार-निराकार ह्याकडे वळूया.

अर्थात ह्या सगुण-निर्गुण, साकार-निराकार ह्याचा अभ्यास करताना सर्वप्रथम ऋषीचे कूळ आणि नदीचे मूळ शोधण्याचा भानगडीत न पडणं हे इष्ट.

कारण परमेश्वर काय?

चंद्र-सूर्य-तारे काय? ज्यांना अंतच नाही, तसेच निसर्गनिर्मित जे काही आहे ते सर्व सगुण, निर्गुण, निरागस, निरंतर असेच आहे. त्याला ना कोणाचा हेवा ना दुःस्वास, निसर्ग हा सारखा देतच असतो.

आता दिवसाची सुरुवातच पाहा. अगदी उजाडायच्या आधीच म्हणजे साधारण ५च्या सुमारास कावळे कावकाव करतात. त्यानंतर सुमारे साडेपाच ते सहाच्या सुमारास कोंबडा बांग देतो, गायी हंबरायला लागतात. जणू हे सर्व 'लोकांना चला उठा पहाट झाली,' हा संदेश देत असतात. ते नाही होत, तेवढ्यात क्षितीजावर पूर्वेला तांबडं फुटायला लागते. त्यातसुद्धा नानाविध रंगांची उधळण करत क्षणा क्षणांच्या अंतराने क्षितिजावर सूर्यनारायणाचे नव्याने आगमन होते. तो क्षणच किती विलोभनीय असतो. अगदी रोज नवीन नवीन आवेशात सूर्यनारायण उगवतीला येतात, नुसते डोळे भरून पाहावे असे दृश्य असते.

नद्या-सागर नित्यनेमाने प्रवाही होतात. त्यात नद्यांचा झुळूझुळू वाहणारा आवाज, समुद्राची अवखळ गाज, पक्ष्यांची किलबिल. किती कर्णमधुर वाटतो तो मंजूळ नाद. मानवाची मरगळ झटकून एक प्रकारचा तजेला आणतात. त्यात गायी चरायला नेतात ते दृश्य. निसर्गातील हिरवेपणा तोच जरी असला तरी त्यात पडणारा थोडाफार फरक दुसऱ्या दिवशी मन मोहून टाकतो.

आदल्या दिवशी असणाऱ्या कळ्या, त्यांची दुसऱ्या दिवशी दिसणारी फुले - त्यांत गुलाब, झेंडू , चाफा, शेवंती, जास्वंद, कण्हेर, गुलबाक्षी, गुलमोहर - इत्यादी नानाविध रंगी - बेरंगी फुले. त्यात धरतीवर पडलेला पारिजातकाचा सडा - त्यांचा सुवास मन मोहून टाकतो.

अहो पक्ष्यांना देखील तो मोह आवरेनासा होतो. तीसुद्धा झाडा - झुडपात लपून सुरेख अशी शीळ घालतात. झाडावरील कच्च्या फळांचे बदलणारे रंग - त्यांचा सुवास मनमोहक असतो, त्यामधून एक प्रकारचं चैतन्य निर्माण होते. थोडक्यात म्हणजे त्या निसर्गप्रेमी किमयागाराचे कौतुक करावे तेवढे थोडेच.

अशातूनही तो निरामय - निसर्ग अगदी निगर्वीच म्हणायचा. नाहीतर अर्ध्या हळकुंडाने गोरी होणारी, संपत्तीच्या - सौंदर्याच्या बाळावर जे अशाश्वत आहे हे माहीत नसते, अशी माणसे दुसऱ्यांना तुच्छ तर मानतातच; वर त्या निरपराध निसर्गावर घाला घालायला मागे पुढे पाहत नाहीत.

तरी ते वृक्ष थकल्या-गांजलेल्यांना आपल्या सावलीत सामावून घेतात, त्यांना विसावा देतात.

तीच माणसं जे वृक्ष आपण ज्यांची फळं खातो, तेच वृक्ष जेव्हा कोलमडून पडतात. तेव्हा हीच माणसे झाडावरची उरलीसुरली फळे लुटून ते झाड निपचित तसेच टाकून निघून जातात.

अरे; जी माणसं निसर्गावर प्रेम करत नाहीत, ती माणसांवर काय प्रेम करणार? त्यातलेच काही नराधम मोर - काळवीट (हरणे), जे कोणी आपल्याला त्रास ही देत नाहीत, जे आपल्याच मस्तीत विहरत असतात, त्यांची हत्यासुद्धा करायला मागेपुढे पाहत नाहीत, हे

कविता

# रात्र जाई

**-सुहासिनी कीर्तिकर**

भरभरून आलेले आभाळ
सरसरून उमले सकाळ;
दूर कुठे... कुठे कुठे
घरकुलातून दिवा पेटे
मंद्र प्रकाश,
सांद्र आकाश,
नीरव पक्षी
शांतवी नक्षी
दूर कुठे... कुणी वाजवी बासरी
सूर उठे.... जशी रात्र जाई सासरी.

---

झाले निसर्गाविषयी.

परमेश्वराकडे पाहिले तर कवी काय म्हणतो माहीत आहे?

तो म्हणतो, रुप सुंदर सावळा गे माये, असा हा माझा परमेश्वर-म्हटला तर सगुण, म्हटला तर निर्गुण. आता आपण दत्तात्रेयांपासून बघू, किती सुंदर रूप अगदी - ३ शिरे, ६ हात, २ पाय, मागे गाय पुढे ४ श्वान - नव्हे तर चार वेद च म्हणायचे.

असे ब्रह्मा-विष्णू-महेश.

निर्माणकर्ता-रक्षणकर्ता आणि संहारकर्ता सगळा तोच. असा हा माझा देवपण आणि गुरू म्हणजेच गुरुदेव दत्त सर्वांना बरोबर घेऊन जातो.

त्या माझ्या गुरुचे एकच तत्त्व, सर्वांनी एकत्र चालून आपला उद्धार करा. परंतु मार्गाने जाताना तो सर्वांची परीक्षा घेत, अगदी अग्नीतून तावून सुलाखून घेत असतो. वेळप्रसंगी प्रेमाचे चार फटकेसुद्धा देतो. त्यातून कोणाला त्यांच्या सहवासातून जायचे असते ते जातात, नाहीतर कोणी मधूनच पळ काढतात. मग पुढे पस्तावतात. असे हे....

त्रिगुणात्मक त्रिमूर्ती दत्त हा जाणा !
त्रिगुणी अवतार त्रैलोक्य राणा !

ज्यांचे तिन्ही लोकांवर सारखेच आधिपत्य आहे.

आता श्री गणेशाकडे बघू या.

तेही अविस्मरणीय रुप- त्याजागी विठ्ठलाची मूर्ती अथवा रामाची मूर्ती उभी केली आणि सांगितले की, हा गणपती आहे. हे कोणी मानेल का? नाही. कारण श्री गणेशाचे वास्तव्य त्रिलोकात आहे. तेव्हा रांगा-फिरायला लागलेल्या नवजात बालकापासून अगदी आबालवृद्धसुद्धा श्री गणेशाची गोजिरवाणी मूर्ती बघून भारावून जातात. लहान मुलांच्यांसाठी तर तो त्यांचा लाडका बाप्पाच असतो. त्यांच्या चेहऱ्यावरचा भाव अतुलनीय असतो.

तसाच माझा पांडुरंग. अगदी निगर्वीच. तो नाही जात-पात मानत, सगळ्यांच्यामध्ये सामावून जातो. मग त्याला कोणी विठ्ठल विठ्ठल म्हणा किंवा पांडुरंग पांडुरंग म्हणा किंवा सावळ्या विठ्ठला जरी म्हटलं तरी माझा विठूराया सगळ्या भक्तांमध्ये एकरुप होऊन जातो.

अहो समस्त संतांचे ते माहेरघर आहे. म्हणूनच म्हटले आहे ना.

माझे माहेर पंढरी! आहे भिवरेच्या तिरी!! एकंदरीत पाहता पंढरपुरात गेल्यावर माहेरी गेल्याचा आनंद मिळतो. तिथून पाय निघता निघत नाही. अहो पंढरीची ओढ कोणाला लागत नाही? परंतु त्यांनी बोलावल्याशिवाय कोणाचं जाणं होतं नाही.

आता आपण आदी-शक्तीकडे वळू, मग ती लक्ष्मी असो वा पार्वती. त्या आदिशक्तींनी राक्षसांचा (वाईट शक्तींचा) संहार करण्यासाठी नवदुर्गा, नवचण्डी, अष्टभुजा, महाकाली, महिषासुरमर्दिनी, किती रुपं धारण केली. पृथ्वीतलावरील प्रत्येक कुळासाठी ज्यांच्या-त्यांच्या कुळाप्रमाणे कुलदेवतेचे रूप धारण केले. त्यांच्या कुळाची माता म्हणायची. मग ती कोणाला माहीत असो वा नसो, तिने प्रत्येकाचे मातृत्व स्वीकारून सगळ्यांना सारखं प्रेम, माया दिली. किती मोठं दातृत्व म्हणायचे. किती तो मायेचा ओलावा. त्या माऊलीला नाही कोणाचा दुस्वास, ना

दुजाभाव.

काय त्या आदिमायेचे निरामय रुप.

आता योग्यांच्या बाबतीत जर पाहिलं तर श्रीपाद श्रीवल्लभ, श्री. नृसिंह सरस्वती. ह्यांच्यानंतर अवतार धारण केला तो स्वामी समर्थांनी. त्यांनी भक्तांना योग्य मार्गाने जाण्यासाठी. शेगावचे गजानन महाराज, धनकवडीचे शंकर महाराज, नारायणगावचे- नारायण महाराज, माणिक प्रभू, उपासनी महाराज, सिद्धारुढ स्वामी, साईबाबा, ह्यांच्यासारख्या अनेक विभूतींनी जगाच्या कल्याणासाठी अवतार धारण केले. हे सगळे निर्गुण- निरामय-निर्मोही हेच खरे ज्ञानियांचे राजे. ह्यांच्या सहवासात जेवढे न्हाऊन निघाल तेवढे थोडेच. हेच भक्तियांचे भांडार. ह्या भांडारात एकदा शिरले की पाय निघता निघत नाहीत.

संत म्हणाल तर त्यांचे किती ईश्वरी प्रेम. ईश्वराचे नाम म्हणजे त्यांचा श्वासोच्छ्वास जणू. आपेगावचे संत ज्ञानेश्वर महाराज किती श्रेष्ठ म्हणायचे, केवळ वयाच्या १६ वर्षी थोरले बंधू- संत निवृत्तीनाथ ह्यांच्या आज्ञेनुसार ज्ञानेश्वरी लिहिली. केवढे हे महान कार्य. मुक्ताईने म्हणाल तर ज्ञानदेवांच्या पाठीवर मांडे भाजून थोरल्या भावाची इच्छा पूर्ण केली. संत ज्ञानेश्वर, मुक्ताई, संत सोपानदेव हे तर युगांतरच म्हणायचे.

त्यात त्यांची पुढची मांदियाळी म्हणजे- संत तुकाराम महाराज, संत एकनाथ महाराज, संत गोरोबा, संत चोखामेळा, संत नरहरी सोनार, संत सावता माळी, जनाई हे तर देव कोळूनच प्यायलेले. किती त्या देवावर श्रद्धा. त्यांच्यासाठी देव म्हणजे सर्वांचा माय-बापच.

ह्यांच्यासारखे सगुण-निर्गुण साकार-निराकार दुसरे असूच शकत नाही.

पुन्हा आपण जाता जाता सूर्य नारायणाकडे येऊ. सकाळी आपण जसे सूर्योदयाच्या वेळेस मनमोहक आनंद घेत असतो, परंतु संध्याकाळी सूर्यनारायणाकडे आपण उघड्या डोळ्यांनी पाहू शकत नाही. हे सगळ्यांना न पटण्यासारखे आहे. कारण सूर्यापासून मिळणारी सौर ऊर्जा ही इतकी तीव्र असते, त्यामुळे जोपर्यंत सूर्य क्षितिजाला स्पर्श करत नाही, तोवर संध्याकाळची रंगाची उधळण आपण अनुभवू शकत नाही.

नंतर काही निमिषार्धात शांत; पण तितकाच मिश्कील चंद्र, नक्षत्र आणि तारे ह्यांच्यातील जलसा अनुभवायला मिळतो.

हेच सगळं सगुण-निर्गुण साकार-निराकाराचे मनोमिलन.

मोबाईल :९८२०६६९२२८

कविता

# सरोगेट मदर

-जयमती तळपदे

दिवस भरत आलेत आणि गलबलून येतेय मन,
नाही किती म्हटले तरी मन येतंय भरून .
सारे नीट ठरवले होते संबंध नाही जोडायचा,
भाड्याने दिले उदर समजून परकेपणा बाळगायचा.

पैशाचा आहे खेळ सारा, गुंतून नाही जायचं,
कसं असेल काय असेल, मनात पण नाही आणायचं.
पण दिवस जात चालले आणि कधी कसं घडलं,
वाढणाऱ्या त्या निष्पाप जीवाशी नातं माझं जडलं.

असेल दुसऱ्या कुणाचा जीव पण वाढतोय ना माझ्या उदरात,
भले उद्या घालायला लागेल दुसऱ्या कुणाच्या पदरात.
आज तरी माझंच आहे काळजी घ्यायला हवी,
दुसऱ्याची ठेव ती आहे नीट वाढवायला हवी.

अस्वस्थ फार वाटतं तेव्हा माझी पोरं आठवतात,
ह्याच्यामुळेच तर ती , दोन वेळ बरं जेवतात.
नसलेल्या ह्या नात्यामुळे चांगले आयुष्य जगतात,
त्यांचं नातं जपायला तर अशी कर्म करायला लागतात.

गतजन्मीचं देणं असेल त्या उदरातल्या गर्भाचं,
जेव्हढा असेल सहवास नशिबी, तेव्हढंच एकत्र रहायचं.
देणं फेडले त्याच्या आईचं असं समजून द्यायचं,
जिथे असेल तिथे राहो आनंदात असं म्हणून नातं तोडायचं.

# What is Pranic Healing?

✶ **Savita Sumeet Navalkar** ✶

Nowadays our lives have become so hectic that few of us have enough time to sleep and eat properly, let alone meditate. As a consequence, our physical, mental, and emotional wellbeing are taking a toll. Your body needs life energy to function properly and live a happier, healthier life. If you wish to preserve your physical health and inner peace then all you need to do is learn Pranic healing. The technique of pranic healing can help you restore that life energy.

`Prana' is the Sanskrit word for life force. It is called 'chi' in China and 'ki' in Japan. It refers to a universal life force, the energy that exists in all living things, animals, plants, rocks, etc. Prana is the energy that moves the universe and keeps all of its creatures alive and healthy. All living things absorb prana through three major sources: Solar Prana, Air Prana, and Ground Prana.

`Solar Prana' exists in the sunlight. We can absorb it through sunbathing, sungazing and drinking water charged or exposed to sunlight.

`Air Prana' exists in the air. We absorb it through breathing and through the energy centres (chakras). We can absorb it through the pores on our skin, but the easier way to do it is through deep, slow, rhythmic breathing.

`Ground Prana' exists in the ground. It can be absorbed by walking barefoot on the ground.

`Pranic Healing' is a revolutionary and comprehensive system of natural healing techniques that uses prana to treat illness. It is a synthesis of ancient, esoteric healing methods that have been rediscovered, researched and tested over decades with proven success by the founder of Modern Pranic Healing, Grand Master Choa Kok Sui.

`It doesn't involve drugs or even touch.' Our body has the natural ability to self-repair or self-heal. Pranic healing uses this principle. Also, healing process can be accelerated by increasing the pranic life force of the individual. This is the second principle used by Pranic healing.

There is an energy field that surrounds every being. Some call it the energy body, the etheric body, the bioplasmic body, or the aura. This field can be described as a field of light that penetrates the physical body and extends beyond it and acts as some sort of shield. Its size depends on the person's health.

Unfortunately, there are many things in life that can disturb our aura. Things like sadness, loneliness, fear, stress and anxiety all affect our luminous energy field in negative ways. As our physical and energy bodies are interconnected, what affects one, affects the other, too. Consequently, we develop long-lasting physical and psychological issues.

Pranic therapy heals the etheric (energy) body which serves as a protective layer covering the physical body. Any dark thought or negative emotion gets in contact with this aura first, before manifesting itself in the physical body.

It often happens that certain physical symptoms can't show up in a medical report because the illness or disease has come in contact with the person's aura but hasn't yet touched the physical body. This ancient art of healing helps us identify problems and eliminate them while cleansing our aura and restoring its balance. It helps cleanse, stabilize, and energize all the major chakras and various minor ones when needed.

One can heal any type of illness using Pranic healing.

=Ø8Ý Minor physical illnesses like fever, cough and cold, migraine, tooth ache, stomachache and ears-nose-throat related illnesses

=Ø8Ý Major physical illnesses like asthma, burns, jaundice, kidney stones, bladder stones, rheumatism, cancer, and heart problems etc. can be partially or substantially relieved.

=Ø8Ý Psychological disorders like stress, irritability, anxiety, depression, grief, hysteria, trauma, phobia, obsession etc.

Some Benefits of Pranic Healing:

=Ø8Ý Improved health and increased stamina

=Ø8Ý Inner peace and happiness

=Ø8Ý Better memory and concentration

=Ø8Ý Reduced stress

=Ø8Ý Greater self-esteem

=Ø8Ý Higher degrees of sensitivity and awareness

=Ø8Ý Improving your intuition

=Ø8Ý Rapid spiritual growth

Pranic healing can be applied on self in the form of self-healing, to heal a person in front of the healer and also heal anyone who is not near the healer and present in some distant place, anywhere in the world in the form of distant healing. Pranic healing is designed to complement and integrate with any other medical practice and is non-invasive in nature.

Anyone with an open mind above the age of 16 can become a pranic healer provided that they are willing to learn. Anyone with average ability to concentrate and average intelligence can master the basic techniques and principles of pranic healing in a few sessions.

Mobile: 8779191985

**Note:** This is a curated article. All the credit goes to the World Pranic Healing Foundation and Yoga Vidya Pranic Healing Foundation of Maharashtra

प्रवासलेख

# लंडन वारीची ऐशी की तैशी!

✶ सौ. प्रणिता प्रभाकर ✶

आपण शालेय अभ्यासात भूगोल विषय शिकतो.त्यात जगातील वेगवेगळ्या देशांची सखोल माहिती मिळते.त्या माहितीवर आधारित आपण चित्र रंगवीत असतो. तेव्हा जर आपल्याला अशा देशांमध्ये जाण्याचा योग आला तर मग काय विचारता? अहो भाग्यम्!!! असे विचार तर नक्कीच येणार.

यूरोपीय देशांमध्ये ऑगस्ट सप्टेंबर महिन्यात उन्हाळा असतो आणि तेथील तापमान २० ते २३ अंश सेंटीग्रेड इतके असते. म्हणजेच आपल्या भारतीय वातावरणाला आल्हाददायक वाटेल म्हणून मग



आम्ही लंडन व स्कॉटलंडला जाण्याचा विचार केला. त्यासाठी आधी UK चा व्हिसा काढण्याचे सोपस्कार करावे लागले. आम्हाला सांगण्यात आले होते की UKचा व्हिसा ३ आठवड्यात मिळतो आणि आम्ही व्हिसासाठी लागणारी सर्व कागदपत्रांची जमवाजमव करून ते सुपूर्द करण्यात जुलै महिन्याचा शेवटचा आठवडा उजाडला. परंतु योगायोग असा की सर्व कागदपत्र सुपूर्द केल्यावर ८ दिवसांच्या आत व्हिसा आमच्या हातात मिळाला.आता १ महिन्याच्या आत सारी तयारी करून UKला जाणे शक्य नव्हते. म्हणून मग आम्ही सप्टेंबरच्या १ल्या आठवड्यात जाण्याचे ठरवले.

आमचा मुलगा व त्याचे कुटुंब अमेरिकेहून लंडनला येणार होते व आम्ही दोघे येथून लंडनला जाणार होतो.लंडनचे हवामान सुखकर असल्यामुळे तसेच अधूनमधून पाऊस येत असल्याने आम्ही छत्र्या तर घेतल्याच; तसेच थोडेफार गरम कपडेही घेतले. लंडनला ५ दिवस वास्तव्य करून पुढील ४ दिवस स्कॉटलंडला वास्तव्य करण्याचे ठरले होते. आमचा मुलगा प्रणय व त्याचे कुटुंब १ सप्टेंबर रोजी लंडनला रवाना झाले व तेथे त्यांच्या मित्राकडे २-३ दिवस राहाणार होते. आम्ही ४ सप्टेंबर रोजी ब्रिटिश एअरवेजने सकाळी ९वाजता लंडनला रवाना झालो. लंडनच्या वेळेनुसार दुपारी २वाजता हीथ्रो विमानतळावर आमचे विमान उतरले. सर्व सोपस्कार पूर्ण होऊन आम्हाला बाहेर येण्यास दुपारचे ३.३० वाजले. तोपर्यंत प्रणय आम्हाला घेऊन जाण्यास

आला होता.लंडनचे हवामान आल्हाददायक असते अशी समज असल्याकारणाने उतरल्या उतरल्या खूपच छान वाटले. त्यातच दुपारची वेळ असल्याने उन्हे जाणवत होती.असो! काही हरकत नाही. मुलगा गाडी घेऊन आला होता तेव्हा आम्ही लंडनचे निसर्ग सौंदर्य डोळ्यात सामावत आमच्या इच्छित स्थळी पोहोचलो. हीथ्रो विमानतळ ते सेंट्रल लंडन जेथे आम्ही राहणार होतो ते साधारण ४० ते ४५ मिनिटांच्या अंतरावर होते. पोरचेस्टर स्क्वेअर, सिटी ऑफ वेस्टमिन्स्टर येथे आमचे ५ दिवस वास्तव्य होते. ह्या ५ दिवसात आम्ही हॉटेलमध्ये न राहाता AirBnB तर्फे एक अपार्टमेंट भाड्याने घेतले होते. ह्या अपार्टमेंटमध्ये एखाद्या घरासारख्याच सुखसोयी होत्या. अर्थात सुसज्ज घर होते. सकाळी चहा नाश्ता घरी करून निघत असू लंडन फिरायला. पहिल्या दिवशी आम्ही थेम्स नदीवरील लंडन ब्रिज बघायला गेलो. तेथून बिग बेन पाहायला गेलो. बिग बेन म्हणजे एका उंच मनोऱ्यावर घड्याळ असून दर १५ मिनिटांनी त्याचे टोले पडतात. तेथून आम्ही V n A व्हिक्टोरिया & अल्बर्ट म्युझिअम पाहायला गेलो. ह्या म्युझिअममध्ये वेगवेगळ्या दगडाच्या मूर्ती तसेच कोरीव काम, पूर्वीच्या लोकांचा पेहराव, वेगवेगळे अलंकार, तसेच वापरात येणारी भांडी पाहिली. त्यानंतर तेथील कॅफेमध्ये भोजन केले. कॅफेजवळच एक छोटा जलतरण तलाव होता लहान मुलांसाठी व त्या तलावात लहान मुले तरंगण्याचा आनंद घेत होती. लंडनचे हवामान बरिकच उष्ण होते व त्यामुळे त्यांना खूपच मजा येत होती पाण्यात पोहोताना. माझ्या नातीलाही पाण्यात खूपच मजा आली. भोजन झाल्यावर आम्ही साऊथ केन्सिंग्टन ह्या भुयारी रेल्वे स्टेशनवर गेलो. तेथे सर्वात आधी रेल्वे पास काढले. ते पंच करूनच आत जात येते. तसे करून मग आम्ही



**कविता**

# मी तुला न्याय दिला का?

**- मिलींद कोठारे**

(साठीतल्या नवऱ्याचे मनोगत-
मी तुला न्याय दिला का?)
अलिकडे स्कॉचचे दोन पेग रिचवतांना
तुझ्याबरोबर रम्य संध्याकाळ घालवताना
अचानक,
तुझा तोच चेहरा मला निरागस
लागतो भासू
तुझ्या चेहऱ्यावरचे ते
निरागस हासू.....
आणि माझ्या तरल झालेल्या मनात
आयुष्याचा लेखाजोखा डोकावू लागतो...
तू माझ्यासाठी केलेल्या त्यागाचा,
माझ्यासाठी केलेल्या सुग्रास भोगाचा,
माझ्या मुलांसाठी असलेल्या सहभागाचा,
अर्थार्जनात केलेल्या माझ्या बरोबरीचा.
अतूट मेहनत घेऊन घराला
दिलेल्या हसऱ्या घरपणाचा...
अन् मी?
मला नाहीच आठवत
मी केलेल्या परतफेडीचा आढावा!
रिचवलेली स्कॉच ते नाही आठवू देत
मी सततच राहिलो तुझ्याकडून घेत घेत
त्यामुळे आता एकच विचार
रुंजी घालतोय वारंवार...
मी तुला न्याय दिला का?
दिला का? खरंच; दिला का?

सर्व टॉवर हिल येथे उतरलो. ह्या भुयारी ट्रेन्सना लंडन येथे 'ट्यूब' म्हणतात.असो!!.

तर टॉवर हिलची आख्यायिका अशी आहे की पूर्वीच्या काळी कैद्यांना येथे फाशी देत असत. परंतु आता येथे म्युझिअम बनवलेले आहे. राणीचे वेगवेगळे रत्नजडीत दागिने तसेच तिचा मुकुट ( त्यात भारतातून गायब केलेला कोहिनूर हिराही आम्ही पाहिला) इतकेच नव्हे; तर पूर्वी वापरात येणारी शस्त्रास्त्रे आम्ही पाहिली. उदाः लढाईच्या वेळी वापरण्यात येणारी शस्त्रे व अस्त्रे. तसेच त्यांचे पेहराव, घोड्यांसाठी वापरण्यात येणारी चिलखते वगैरे. इतकेच नव्हे तर कैद्यांना फाशीची शिक्षा देण्याचा लाकडी ठोकळाही तेथे ठेवला होता. ह्या टॉवरचे जिने चक्राकार असून दगडी बांधकामाचे आहेत. त्यानंतर आम्ही थेम्स नदीवरील चक्र ज्याला 'लंडन आय' म्हणतात ते पाहायला गेलो. येथून संपूर्ण लंडन पाहू शकतो म्हणून त्याला लंडन आय म्हणतात. हे सर्व करताना आमच्या जीवाची लाही लाही झाली. त्याचे कारण म्हणजे ३०-३५ डिग्री तापमान होय. लंडनला पाऊस असतो म्हणून आम्ही छत्र्या घेतल्या खऱ्या!पण त्याचा उपयोग आम्हाला उन्हाच्या काहिलीपासून वाचवण्यासाठी झाला. आहे का नाही खरी गम्मत!!! दुसऱ्या दिवशी आम्ही ट्रेन व बस ह्या दोन्हींचा प्रवास करून केम्ब्रिजला पोहोचलो. येथे मी ट्रेन शब्द वापरला कारण ती भुयारी नसून ती वरून जाते व जाताना आपल्याला आजूबाजूचा निसर्ग व छोटी छोटी गावे पाहावयास मिळतात.केम्ब्रिज विद्यापीठात पोहोचलो तेव्हा तेथील महाविद्यालयाची इमारत पुरातन दगडी बांधकामाची आहे. (येथे २ महाविद्यालये आहेत १) किंग्स कॉलेज व २) क्वीन्स कॉलेज) ही महाविद्यालये कॅम नदीच्या काठाशी बांधलेली आहेत. नदीवर एक छोटासा ब्रिज आहे एका इमारतीतून दुसऱ्या इमारतीत जाण्यासाठी. ह्या ब्रिजला मॅथेमॅटिकल ब्रिज म्हणतात. १२व्या शतकात हा ब्रिज गणिताच्या मोजमापाने खिळे व पान्हे न वापरता बांधला.परंतु आता २१व्या शतकात त्याची

दुरुस्ती करण्यात आली. आणि हो; त्या ब्रिजखालून छोट्याशा नावेतून जाताना खूपच मजा येते.आम्ही छत्र्या उघडून नावेत बसलो कारण सूर्यदेवाची कृपा होय. चौथ्या दिवशी आम्ही बकिंगहॅम पॅलेसला गेलो. तेथे सकाळी ११ वाजता चेंज ऑफ गार्डसचा सेरीमनी ऊर्फ विधी पाहिला व नंतर राजवाड्यात प्रवेश केला. तेथे भव्य दालने व विविध चित्रे तसेच राजघराण्यात वापरण्यात येणाऱ्या वस्तू होत्या. त्यांचे बैठकीचे दालन, चहा-नाश्ता करण्याचे वेगळे दालन तसेच रोजच्या जेवणाचे दालन वेगळे व समारंभानिमित्त पाहुण्यांसाठी जेवण्याचे दालन वेगळे. संगीत व चित्रकलेसाठी वेगवेगळी दालने. तेथील झुंबर व प्रकाशयोजना डोळ्यात साठवून ठेवण्याइतकी आहे. संपूर्ण राजवाडा बघण्यासाठी साधारण दीड ते दोन तास लागतात. परिसर बघण्यासाठी तुम्हाला एक walky - talky दिला जातो व ज्या दालनात तुम्ही प्रवेश करता तेथील इतिहास walky - talky वर सांगितला जातो.राजवाडा बघून झाल्यावर बाहेर पडताना walky - talky त्यांना परत करावा लागतो.बाहेर पडल्यानंतर बाजूलाच त्यांचे कॅफेटेरिया आहे. तेसुद्धा राजेशाही थाटाचे आहे. आम्ही शेवटच्या दिवशी वेस्टमिन्स्टर येथील पॅलेसला गेलो जेथे पार्लमेंटची कामे चालतात

## ‘कणिका’

**प्रशस्तीपत्र**

अत्र तत्र
सर्वत्र,
मीच छापलेले
प्रशस्तिपत्र!

**- सुहासिनी कीर्तिकर**



कविता

# आजची पिढी

**-सौ.स्वागता प्रियेश विजयकर**

आईने सांगितले म्हणून
मी करते, तूहि तसेच कर।
हे काही आजच्या पिढीला पटत नाही
ठोस कारणाशिवाय ती काहीच करत नाही ।।१।।

वयाने आपण मोठे आहोत
हे सिनियर डिस्काउंटसाठी ठीक आहे ।
ह्या पिढीशी मात्र वागताना
त्याची तुम्हाला सवलत नाही ।।२।।

आपण त्यांना वाढवले
हे तर आपले कर्तव्यच होते ।
परतफेडीची अपेक्षा करणे
लिस्टमध्ये त्यांच्या बसत नाही ।।३।।

नाती आपल्याला फार प्रिय
नेहमी आपण त्या चौकटीत राहतो ।
ह्या पिढीला मात्र त्या भावना
काही केल्या उमजत नाही ।।४।।

कुटुंबासाठी काहीही करू
ही भावना आता पुराणिक झाली ।
स्वत:च्या space शी ही पिढी
कधीच तडजोड करत नाही ।।५।।

बाळांनो, खूप मोठे व्हा, स्वतंत्र राहा
काहीच त्यात वावगं नाही ।
पण कधीतरी हाक मारलीच तर
धावत नाही, चालत तरी याल ना तुम्ही??।।६।।

*

ते आम्हाला प्रत्यक्ष कामकाज पाहण्याचा योग आला.

आमच्या ५ दिवसांच्या लंडन येथील वास्तव्यानंतर आम्ही स्कॉटलंडला विमानाने प्रयाण केले. लंडनमधील उन्हाची काहिली सोसल्यानंतर स्कॉटलंडची थंडगार हवा खूपच भावली. मनालाही व शरीरालाही. आम्ही इन्व्हर्नेस गावात उतरलो. गाव असल्याकारणाने तेथे सार्वजनिक वाहतूक व्यवस्था नव्हती. त्यामुळे तेथे आम्हाला ४ दिवसांसाठी एक मोटार भाड्याने घ्यायला लागली. येथेसुद्धा आम्ही AirBnB द्वारे एक बंगला भाड्याने घेतला होता. इन्व्हर्नेस हे गाव डोंगर कडेकपारीत वसलेले आहे. त्यामुळे निसर्गसौंदर्याचा विलोभनीय अनुभव घेता आला. प्रवासात चौफेर हिरवेगार डोंगर, शेत-मळे व जास्त करून मेंढ्या-गाई चरताना दिसल्या.हे गाव नेस नदीच्या काठी वसलेले आहे. नेस नदीचा सर्वात खोल भाग ह्या परिसरात असल्या कारणाने येथे बोटीने प्रवास करताना ह्याला लॉच नेस असे म्हणतात. 'लॉच' म्हणजे सर्वात खोल भाग होय. अहाहा!!! सृष्टीसौंदर्य तर विचारूच नका. इन्व्हर्नेस गावात दोन दिवस राहिल्यानंतर स्कॉटलँडचे राजधानीचे शहर एडिनबर्ग येथे प्रस्थान केले. आता स्कॉटलंडला जाऊन स्कॉच व्हिस्कीच्या भट्टीला distillery भेट नाही दिली तर तो मूर्ख समजला पाहिजे. आम्ही एडिनबर्गला जाता जाता वाटेत The Glenturret Distillery Est १७६३ येथे भेट दिली. एडिनबर्गला जाताना वाटेत अनेक डोंगर, टेकड्या तसेच शेतमळे लागले. त्यातील एका टेकडीवर आम्ही सर्वजण चढलो. टेकडीच्या टोकावरून जो परिसर दिसतो तो खूपच नयनरम्य!!! डोळ्यात साठवून ठेवण्यासारखे सृष्टी सौंदर्य आहे. स्कॉटलंडला सप्टेंबर महिन्यात उन्हाळा असतो. परंतु तेथील हवामान आपल्या येथील हवामानापेक्षा खूपच वेगळे असते. लंडनला जरी ३०-३५ अंश तापमान होते तरी स्कॉटलंडला २२-२३ अंश तापमान होते व थोडे ढगाळ असल्याने खूपच आल्हाददायी वातावरण होते. 'हिरवे हिरवे गार गालिचे हरित तृणांच्या मखमालीचे' असे वर्णन करणे वावगे वाटणार नाही. असो!

आम्हाला एडिनबर्गला पोहचायला संध्याकाळचे ४ वाजले. हे राजधानीचे शहर असल्याने परिसर थोडाफार गजबजलेला होता. आम्ही राहत असलेल्या घरासमोरच एक मोठे मैदान होते. उन्हाळा असल्याने लोक शॉर्ट पॅन्ट व बिन बाहीचे टीशर्ट घालून मैदानात धावायला येत; पण आमच्या अंगावर गरम कपडे होते. कारण २२अंश तापमान म्हणजे आपल्याला थंडीचं जाणवणार.दुसऱ्या दिवशी सकाळी उठून आम्ही नेस नदीतीरी फिरावयास गेलो. थंडगार हवा... उन्हाची झळाळी नाही... बाजूला नदी वाहतेय. अहाहा... काय नजारा होता तो! तेथेच एका कॉफीशॉपमध्ये गरमागरम कॉफी घेतली व थोडा नाश्ता केला. तेथून मग आम्ही एक castle बघावयास गेलो. त्याला एडिनबर्ग कॅसल असे म्हणतात. खूपच भव्य दिव्य राजवाडा आहे. राजवाड्यात शिरण्याकरिता पूर्वीच्या पद्धतीच्या वाटा व चढण आहे. हे पार केले की तुम्ही संपूर्ण एडिनबर्ग शहर पाहू शकता. येथील दालनात जाण्यासाठी अरुंद वाटा आहेत. येथेही आम्हाला walky - talky चा वापर करावा लागला.हा आमचा शेवटचा दिवस होता. दुसऱ्या दिवशी सकाळी ११ वाजता आमची विमान उड्डाणाची वेळ होती. एडिनबर्ग विमानतळावर आम्ही सकाळी ८-३० ते ९च्या दरम्यान पोहोचलो. आमच्या मुलाचे कुटुंब अमेरिकेला रवाना होणार होते व आम्ही दोघे भारतात परतणार होतो. आमची टर्की एअरवेजची फ्लाईट होती. इस्तान्बुल येथे २-२.३० तासांचा अवकाश होता. विमानतळावरील सर्व सोपस्कार झाले व आम्ही विमानात जाऊन बसलो. विमानाचे दरवाजे बंद झाले. परंतु विमान काही चालू होईनात. अर्ध्या तासाने आम्हाला सांगण्यात आले की, विमानातील पाण्याच्या टाकीत काहीतरी समस्या निर्माण झाली होती. ती समस्या दूर होईपर्यंत २-२.३० तास गेले. पण शेवटी ते



## ‘कणिका’

### मोबाईलवर पूजा

मोठ्ठा गाजावाजा
मोबाईली देवपूजा
दुसऱ्याच चॅनियेली
गुंग गणेशराजा!

**- सुहासिनी कीर्तिकर**

वायाच गेले. कारण टाकीची दुरुस्ती होऊच शकली नाही व सरतेशेवटी बिसलेरी पाण्याच्या बाटल्या मागवाव्या लागल्या. एकदाचे विमान दुपारी २ वाजता निघाले. एडिनबर्ग ते इस्तान्बुल ६ तासांचा प्रवास होता. इस्तान्बुलहून मुंबईला जाणारी फ्लाईट रात्री ८ वाजता होती. परंतु आम्ही पोहोचलोच इस्तान्बुल येथे रात्री ८ वाजता व तोपर्यंत आमची मुंबईची फ्लाईट निघून गेली होती. मग विमानतळावर आम्ही दोघे ह्या टोकापासून त्या टोकापर्यंत धावतोय. परंतु आम्हाला कोणीही व्यवस्थित मार्गदर्शन करू शकले नाही. शेवटी आम्ही बिसनेस लाउंजला गेलो तेथे बाहेर आम्ही एअरपोर्ट असिस्टंसचा बोर्ड बघितला व तेथे आम्ही चौकशी केली. त्यांनी सांगितले की दिवसभरात मुंबईला जाणारी एकच फ्लाईट आहे व ती तुम्हाला दुसऱ्या दिवशी संध्याकाळी ८ वाजता मिळेल.त्याप्रमाणे त्यांनी आम्हाला तिकिटे बदलून दिली. आता २४तासांनी विमान असल्याने रात्र कुठे काढायची हा प्रश्न उभा राहिला. तेव्हा त्या मदतनीसांनी एक विमानतळा-जवळील हॉटेल सांगितले. विमानतळाबाहेर हॉटेल म्हणजे आम्हाला योग्य व्हिसा काढावा लागणार होता. इ-व्हिसा काढायचा म्हणजे आली का पंचाईत? मग आम्ही विमानतळावर राहण्यासाठी योग्य जागा आहे का? असे विचारले असता आमचा सर्व प्रश्न सुटला. ताबडतोब आम्ही विमानतळावरील ‘योतेल’ हॉटेलमध्ये आमची व्यवस्था केली. ते बरे झाले. परंतु आमचे सर्व सामान विमानाच्या लगेजमध्ये असल्याने आमच्याकडे काहीही सामान नव्हते. अंगावरील कपड्याशिवाय एकही कपडा आमच्याजवळ नव्हता. कारण सोपे आहे की मुंबईलाच उतरायचे आहे तेव्हा २-२.३० तासांच्या विरामासाठी काहीही महत्त्वाचे असे लागणार नाही; म्हणून आम्ही जास्तीतजास्त सामान मोठ्या बॅग्जमध्ये घातले व जुजबी सामान आमच्या सोबत ठेवले. पण असे होईल हे कुणास ठाऊक? मग काय! एकदा हॉटेलची सोय झाली. मग बाकी सामान सुमान ठेऊन थोडे फ्रेश होऊन आम्ही खाली उतरलो.जेवणासाठी जवळच्याच ढाब्यावरून न्युडल्स व पाण्याच्या बाटल्या घेतल्या. नंतर सवारी कपडेपटात गेली; रात्रीसाठी काही कपडे हवेत म्हणून. हे सर्व करताना आम्हाला आमच्या जवळचे पौंड देऊन युरोचे चलन घ्यावे लागले. नंतर आम्ही आमच्या हॉटेलवर आलो. तेथे मग आंघोळ केली. टॉवेल, नॅपकिन, लिक्विड साबण वगैरेची सोय होती पण दात कशाने घासणार? योगायोगाने न्युडल्ससोबत २ मिठाच्या व २ काळेमिरीच्या पुड्या होत्या. त्या मिठाच्या पुड्यांचा आम्ही दात घासण्यासाठी उपयोग केला. तोपर्यंत रात्रीचे ११.३० वाजले होते. मनात म्हटले; आता गादीवर अंग टेकून मस्त झोपायचे. उद्या सकाळी कुठलीही आणि कोणाचीही उठाठेव नाही. कितीही वाजता उठले तरी कोणीही विचारणार नाही. आम्ही ह्या प्रवासाच्या यातायातेतच इतके थकलो होतो की आमची सकाळ ११ वाजता उजाडली. मग सर्व प्रात:विधी आटोपून आम्ही तडक बिसनेस क्लास लाउंज गाठले. दोघांनी कडकडीत चहा घेतला व नंतर भरपूर नाश्ता केला जेणेकरून संध्याकाळपर्यंत भूक लागणार नाही. तोपर्यंत दुपारचे २ वाजले होते. मग विमानतळावर थोडा फेरफटका मारून मग परत हॉटेलवर येऊन वामकुक्षी घेतली. संध्याकाळी ७ वाजता निघालो मुंबईच्या प्रयाणाचे विमान गाठायला!!!

तर मग आहे की नाही गम्मत आमच्या लंडन वारीची???

*

कथा

❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀

# कॉलरट्यून

**✶ सुहासिनी कीर्तिकर ✶**

❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀

''अगं आज्जी; गप बस नं आता. बघ, तो टिव्ही बघ बरं. काय धम्माल चाललीय बघ नं.''

''बछडे, काय चाललंय पडद्यावर? नाही गं मला दिसत. नुस्ती आपली चित्रं हलतात. काय चाललंय? सांग नं.''

''हूं. अगं; काहीच नाही. या आज्जीचं बोलणं... म्हणजे नको असलेली कॉलरट्यून. पण बंदही नाही करता येत. वैताग साला.''

''बछडे, तू काय पुटपुटतेस? ऐकू नाही आलं मला.''

''नाही आलं तेच बरं.''- म्हणत रेवा तिथून उठून आत गेली. तिची चीडचीड झाली.

मग आजी घटकाभर बाहेर पहात राहिली. खिडकीतून धूसर धूसर असं काही हिरवंसं दिसलं तिच्या नजरेला. कळलं नाही नीट; पण ''हं, ती करंजाची फांदी असावी बहुतेक. नाहीतर मग हिरवा रंग आला कुठून बाई?-'' ती स्वत:शीच पुटपुटली.

हिरवा रंग! नव्वदी पार केलेली धुकधुक्या नजरेची आज्जी मग भूतकाळात कधी गेली; कळलंच नाही तिला. जर्दाळूसारख्या सुरकुतलेल्या चेहऱ्याच्या कातडीआड आत आत एक हिरवेपण उगवलं...

या घरात ती पहिल्यांदा आली तेव्हा तिच्या अंगावर टोपपदरी भरजरी हिरवं इरकल लुगडं होतं. सासूबाईंनी खास दिलेली मोहनमाळ, मंगळसूत्र गळ्यात. काचेच्या हिरव्या चुड्यात सोन्याचे बिलवर, तोडे. हौसेने घातलेला कंबरपट्टा. भरगच्च अंबाड्यावर गच्च वेणी. जोडीने गृहप्रवेश करताना हरीभाऊंची कुजबुजत्या स्वरात वाजलेली हृदयस्थ सनई... ''तुझं सगळंच भरगच्च. अंबाडा सोडून बघणार आहे मी किती लांब केस आहेत ते. अन् लुगडं?...'' तिनं नजर आणखी झुकवूनच मग उखाणा घेतला होता... 'हिरवं लुगडं, त्यावर कंबरपट्टा,

हरीरावांसाठी केला नट्टापट्टा।' मोठ्या पट्टीत मग इतरांचे हसणे त्यावर सांडले होते. तिनं आपल्या वागण्यानं हरिरावांचे घर अगदी अस्सेच हसतेखेळते ठेवले होते. सजावटही तिच्याच पसंतीची. हॉलला हनीड्यू रंग आणि खिडक्यांना तिनं विणलेल्या क्रोशाचे पोपटी पडदे. खिडक्यांबाहेर हौसेनं ग्रीलची पायरी करून घेतली होती तिनं. त्यात नाना कुंड्या. नाना छटांची रोपं. एक तेव्हढं तुळशीचं. बाकी बटनशेवंती, छोटी जास्वंद, झेंडू... बाळगोपाळ असावेत तशी ही संपदा. खिडकी अगदी तिच्या मनासारखी सतत हिरवी असायची. अन् एकदा तर गंमतच झाली. अनाहूत पाहुणा यावा तसे एका कुंडीत बदामाचे झाड उगवले. अरे! तो तर होणारा मोठ्ठा वृक्ष. खिडकीतली कुंडी अन् इवलुशी माती कशी काय पुरणार त्याला? ते रोप नव्हते. ती नाजुकशी वेल नव्हती. तो होणार होता मोठ्ठा वृक्ष. सासूबाई म्हणाल्या, ''उपटून टाक ते रोप.'' हरिभाऊंनीही दुजोरा दिला. पण तिला असं करणं म्हणजे गर्भपातच वाटत होता. तिच्या भरत आलेल्या दिवसांकडे पाहून मग हरिभाऊंनी माघार घेतली.

अन् मग ती बाळंतपणासाठी माहेरी गेली.

चारचारदा नवऱ्याला बजावून. ''बरं का; या शेवंतीला अर्धा गडवा पाणी घाला. जास्वंदीलाही अर्धाच पुरतो. कुंडी लहान आहे ना? जास्त पाणी घातलं तर ती एकदम फुलेल. मग तिला कुंडी कशी पुरणार? मोठ्ठ्या सासरी पाठवावी लागेल तिला!'' ती जणू तिची पोरच होती. जास्वंदीला सासरी पाठवायचं? अय्या; गंमतच. हं. गच्चीत करता येईल रवानगी. चालेल की. शेवंती अन् तुळस नांदतील खिडकीत.''... तिच्या मनाचा खेळ सुरू झाला. तेवढ्यात नवऱ्यानं एक टप्पू दिला तिच्या डोक्यात. ''अगं, वेडाबाई; मग ते बदामाचं झाड पाठवू की सासरी.'' तिला ते पटलंही. गच्ची नको. खालीच त्याला वाढवू आपण. मग तिनं घराखालीच एक जागा मुक्रर केली. कंपाऊंडच्या गेटच्या आत वाट रेखणारी चौकोनी फरशांची ओळ होती. ओळीला खेटून जाड लोखंडी सळ्यांचे कुंपण. मात्र वाट आणि कुंपणामध्ये दीड फुटांची मातीची सलग ओळ होती. त्यात काही झाडे रखवाली करीत होती. त्या झाडांच्या सोबतीला खिडकीतले हे झाड उतरले. बाळंतपणाला जाण्याआधी तिच्या हट्टामुळे नवरोबांनी माळ्याची भूमिका बजावली. ती माहेराहून बाळासह परत आली तेव्हा या झाडाला स्वत:चा आकार आला होता. तेव्हा कुठं कळलं, 'अरेच्चा! हे बदामाचं नव्हतं झाड. करंजाचं होतं.' तिचा सोहम् आणि ते झाड हलकेहलके मोठ्ठं होत गेलं. त्याच्या काही फांद्या तर तिच्या खिडकीला भिडू लागल्या. गॅलरीतली (म्हणजे खिडकीतलीच.) शेवंती दोन चार वर्षं फुलली. मग कोमेजली. तुळस मात्र अगदी मंजिऱ्या येईपर्यंत बहरली. तिचा स्वत:चा संसार अन् ही झाडं... यांचं एक अतूट नातंच होतं. हिरवंगाऽऽर!

हिरवा रंग तिला तवाना वाटायचा. पण उन्हाळा आला की त्या वृक्षाची मोठमोठी पानं हळुहळू तांबडी, करडी व्हायची. गळून पडायची. नवीन यायचीही. हे नवीन सृजन खिडकीत बसून बघताना फार आनंद व्हायचा तिला. संसारात रमून जाताना या खिडकीला कायम तिनं विणलेला पोपटी, हिरवा पडदा असायचा. वाचन असो, शिवणटिपण असो, निवडण असो; ती या खिडकीतच असायची. हिरवीगार व्हायची.

पण गळून पडणाऱ्या पानांसारखी घरातली माणसंही हलकेहलके गळून पडायला लागली. मामंजी गेले. सासूबाई अंथरूणाला खिळल्या. मग तर; तिचा नवराच झाड उन्मळून पडावं तसा एकदा उभ्या उभ्या कोसळला. हिरव्या पानानं तांबूस, करडं होत गळून पडणं नाहीच. गेलेच हरिभाऊ!

तरीही नवीन पानं येत राहिली. तिनं उभारी धरून लेकीचं लग्न करून दिलं... इथलं रोप दुसरीकडे झाड होण्याकरिता, फुलण्याकरिता पाठवलं. सोहम्ही शिकला. त्याच्या रूपानं घरात नवीन पालवी येत राहिली; बहरत राहिली. त्याची बायको-रागिणी सोनपावलांनी घरात आली. तीही सासूबाईंसारखं तुळशीला पाणी घालू लागली. खालच्या करंजाला पाणी घालण्याची गरजच नव्हती. तिचंही घरातलं स्थान असंच पाणी घातल्याविना वाढत राहिलं. ती आज्जी झाली. नातीचं नाव हौसेने रेवा ठेवलं. तोच आता या आज्जीचा विरंगुळा. पानं फुटत रहावीत, झाड वाढत रहावं तसं आज्जी रोज रेवाला नवीन गोष्ट सांगत राहिली. अगदी याच खिडकीत बसून....

हलकेच असं झाड बहरत असताना आज्जीला एकदम जाणवलं की आपण आता पिकलं पान झालोत. पण तिकडं कुणाचं लक्षच नाही. रेवा मोठी झाली तशी तिचं जगणं - तिचं बहरणं बदललं. सोहम्, रागिणी, रेवा... कुण्णाकुण्णाला आता तिचं असणं जाणवतच नव्हतं. खिडकीत बसून निवडणं बाद झालं. आता काय; मागवलं की साफसूफ धान्य, कडधान्य घरात यायचं. हिरवे पडदे जुनाट ठरले. खिडकीला एसीच्या कापबाळ्या आल्या. एसीसाठी खिडकी बंद राहू लागली. टिव्ही होता... पण आजीची नजरही अंधूकली. तिला आपलं वाटायचं की; सोहम् - रागिणी नसोत घरी. पण रेवाशी गप्पा माराव्यात. पूर्वीसारखी तिनं चिवचिव करावी. आपल्याकडून गोष्टी ऐकाव्यात. पण... पण रेवाचं जग

आता बदललं होतं. तिलाही वाटायचं की आज्जीनं आता फक्त आणि फक्त आराम करावा. ''दिसत नाही तर कशाला धडपडावं? बसावं की शांत आरामखुर्चीत.'' रेवाला आज्जीशी बोलणंच हल्ली कठीण वाटायचं. ''रेवा, तुझा फ्रॉक चांगला आहे हं.'' - असं आज्जीनं म्हटलं की रेवा चिडूनच म्हणायची, ''आज्जी, तो ड्रेस आहे. काहीतरीच काय?'' आज्जीनं जरा विचारलं, ''आज कॉलेजमधून यायला इतका उशीर का गं झाला तुला?'' तर रेवा उखडायचीच. ''तुला काय कराच्चे आज्जी? झाऽऽला उशीर. मग?'' जसं काही रेवाच्या लेखी आज्जी एक पंचायतसमितीच होती. सोहम्‌ही हे सगळं रेवाचीच बाजू घेत कानाआड करायचा. एकेकाळी गोष्टी ऐकत, गप्पा करत सतत आज्जीच्या मागे असणारी रेवा अशी घरी असून नसल्यागत. आज्जीला मग उगाचच मर्ढेकरांची ओळ आठवायची.. 'लागले एकेक पान गळावया.' आपण आता वठत चाललो आहोत. सोहम्, रागिणी, रेवा... जणू नव्या अंगणात बहरताहेत. पण त्यांचा हिरवा रंग आता आपल्या अंधुकलेल्या नजरेला दिसतच नाहीय. कुंडीतलं ते हिरवं रोप आपण खाली कुंपणाशी लावलं अन ते जुनी पानं गाळत बहरत राहिलंय. पण आपल्या संसाराची, जगण्याची माती मात्र हीच... आपलं घर. मामंजी, सासूबाई, हरिभाऊ... आपली जुनी पानं गळली. नवीन हिरवेपण मात्र नाही. कारण.... कारण आपण आता वठत चाललो आहोत. नजर अंधुकली आहे. हातात काठी आहे. सोहम्, रागिणी, रेवा आहेत बरोबर. पण काहीच खरे तर बरोबर नाही. आपण आता वठत चाललोय नं?

पण मग आज, आत्ता अंधुकलेल्या नजरेला हे पुसटसं हिरवेपण कुठून दिसलं? घरात आलो तेव्हाच्या लुगड्याचं हिरवेपण? खिडकीतून बाहेर पहात राहिलोय आपण. पण... पण एसीसाठी खिडकी तर बंदच आहे. मग हे हिरवेपण? आपला भासच की काय? आज्जीच्या नजरेसमोरचा हिरवेपणा हळुहळू तांबूस, करडा झाला.... नंतर करडा काळा झाला. अख्खं झाडच उन्मळून पडल्यासारखं झालं....

रेवा मोठ्ठ्यानं ओरडली. ''अगं आज्जी; काय झालं तुला?'' धसकून तिने आईबाबांना फोन लावला. शेजारघरी धावली. शेजाऱ्यांनी तिला धीर देत डॉक्टरला बोलावलं.

पण.... पण सगळा हिरवा रंग झाकोळून गेला होता. रेवाला काय वाटलं न जाणे, पण ती लगबगीने खिडकीशी गेली. बंद खिडकी उघडून ग्रीलमधल्या तुळशीचं पान तिनं तोडलं. आत येऊन आज्जीच्या 'आ' वासलेल्या तोंडात घातलं; अन् मग डॉक्टरांनी तिचं तोंड बंद केले. त्याक्षणी रेवाला अनावर हुंदका फुटला. ''आज्जी, बोल. तू बोल. मी नाही काही म्हणणार यापुढे.''

पण... पण नको असलेली कॉलरटच्यून कायमची बंद पडली होती!

*

कविता

# अनामिक काव्य

**- सौ. निकेता प्रशांत राणे**

काव्य अनामिक मनात भरले छंदचि जडला नवा
पुन्हा पुन्हा मी घोकत जाता अर्थ उलगडे नवा
कुण्या दैवी परिसाहाती घडले ऐसे सोने?
ठाव मनाचा घेई नकळत काव्यभाव देखणे
शोध घेतला अवतीभवती पुसले चारी कानी
ह्या अद्भुत रचैत्याला पाहिले का कोणी?
नाव न कळता हिरमुसले मी नाद दिला सोडूनी
तसा समोरी आला अवचित शब्दांचा तो धनी
कुणास ठाऊक का तेव्हा मज लाज अनावर झाली
त्याच्या नजरेनेही हेरली मम गालावर लाली
काव्य प्रेम जुळता जुळता प्रेमच मज गवसले
त्याची कविता माझी झाली अन् मी त्याची झाले.

लेख

# नाणीसंग्रहाची सुरुवात

**✶ विश्वास अजिंक्य ✶**

बऱ्याचदा नाणी जमविण्याचे शालेय जीवनातील वेड हे कॉलेजला जाण्याच्या आतच विरते. पण या छंदाला पद्धतशीर अभ्यासाची जोड दिल्यास तो आयुष्यभरासाठी आनंदाचा स्रोत बनतो. इतिहासाचा अभ्यास करताना महत्त्वाच्या मानल्या जाणाऱ्या साधनांमध्ये त्या त्या काळातील नाण्यांचा समावेश होतो. विशिष्ट आकाराच्या, वजनाच्या, धातूच्या तुकड्यांवर त्यातील वजन , शुद्धता , मूल्य यांची हमी देणारी चिन्हे, मजकूर यांनी अंकित केलेला व शासकीय सत्तेद्वारा विनिमयाचे माध्यम ठरवलेल्या धातूच्या तुकड्यांना नाणी म्हणतात. आर्थिक विनिमय व्यापारउदीम, सुबत्ता, अवनती, तंत्रज्ञानात्मक प्रगती, राजकीय यंत्रणा, धार्मिक कल्पना, कलाकुसर इत्यादी कितीतरी पैलूंविषयी ऐतिहासिक नाणी बोलू शकतात. सुटी सुटी नाणी तर बोलतातच पण त्यांची जी श्रृंखला आणि संरचना असते ती तर खूप काही बोलते. नाण्यांमुळे राजांची नावे, त्यांची क्रमवारी, त्यांचा काळ, राज्यांची स्थाने, त्यांच्या सीमा समजण्यास मदत होते. नाणी जमवताना नाण्याचे वजन, आकार, प्रकार, धातू नाण्यावरील मजकूर, चित्रे, चिन्हे, नाण्याचे दर्शनी मूल्य, त्याची टाकसाळ, त्याचा खरेखोटेपणा या साऱ्या गोष्टी महत्त्वाच्या असतात.

नाणीसंग्रहाची सुरुवात करतानाच एखादा विशिष्ट विषय घेऊन नाणी गोळा केली, तर त्या संग्रहाला नेटकेपणा व अभ्यासाची जोड देता येते. त्यासाठी जगातील विविध देशांची नाणी, प्राचीन काळातील नाणी, मध्ययुगीन नाणी, मोगल सम्राटांची नाणी, मराठा संस्थानिकांची नाणी, इंग्रजांच्या भारतातील राजवटीतील नाणी, स्वातंत्र्यपूर्व काळातील विविध संस्थानांची नाणी, स्वतंत्र भारताची नाणी, स्मारक नाणी असे अनेक पर्याय आहेत.

भारतीय नाणी पहाताना तर असंख्य सत्ता व त्यांचा काळ यांचा भला मोठा इतिहास पुढे उभा राहतो . स्वातंत्र्यापर्यंत संपूर्ण भारतात एकछत्री अंमल कधीही नव्हता. सम्राट अशोक, महंमद तुघलक, मोगल यांना दक्षिण टोक जिंकता आले नव्हते. अकबरापासून ते शेवटचा मोगल बादशहा, बहादूर शहा जफरपर्यंत, घोषित - स्वयंघोषित असे २५ मोगल बादशहा होऊन गेले. त्यातील प्रत्येकाने कमी जास्त प्रमाणात नाणी काढली होती. भारतीय इतिहासातील अतिशय महत्त्वाच्या परिवर्तनापैकी एक म्हणजे इंग्रजांचे आगमन आणि भारताचा मध्ययुगीन अवस्थेतून आधुनिक काळात प्रवेश. पण इंग्रज भारतातील केवळ एक तृतीयांश सत्ता थेट राबवत होते . तर दोन तृतीयांश सत्ता वेगवेगळ्या राजवटी इंग्रजी छत्राखाली राबवत होत्या. भारताला स्वातंत्र्य मिळालं तेव्हा भारतात सहाशेच्या वर लहान मोठी संस्थाने होती. त्यातील १२५ जणांची स्वत:ची नाणी होती. त्यामुळेच भारतीय नाण्यांत विविधता आहे. इंग्रजांनी जेव्हा मराठी राज्य जिंकले, तेव्हा भारतात ९९४ प्रकारची सोने व चांदीची नाणी चलनात होती. भारतीय नाण्यांचा जन्म इसवी सन पूर्व सहाव्या शतकात मानला गेला आहे. पंच मार्क कॉईन्स ही भारतातील सर्वात जुनी नाणी. २६०० वर्षांची अखंडित परंपरा भारतीय नाण्यांना लाभली

आहे. तर आशिया मायनर येथील लिडिया या ठिकाणी इसवी सन पूर्व सातव्या शतकात व्यापारांची चिन्हे उमटवलेली नाणी सर्वप्रथम पाडली गेली.

जगातील विविध देशांची संख्या दोनशेच्या आसपास आहे . ही संख्या सतत बदलत असते. भारताच्या फाळणीतून पाकिस्तानचा जन्म झाला. पण पाकिस्तानच्या नशिबीसुद्धा फाळणी लिहिलेली होती. त्यामुळे १९७१मध्ये पूर्व पाकिस्तान स्वतंत्र झाला आणि बांगलादेश या नावाने ओळखला जाऊ लागला. एका बाजूला जर्मनी एक संघ झाला. तर रशिया, युगोस्लाव्हिया, झेकोस्लाव्हिया यांचे तुकडे पडून नवीन राष्ट्रे उदयास आली.

नाणी जमविण्यास सुरुवात करताना स्वत:च्या घरापासूनच सुरुवात करावी. रोजच्या व्यवहारातले परंतु वेगळे दिसणारे एक जरी नाणे आपण बाजूला काढून ठेवले तरी काही दिवसातच आपल्याजवळ विविध प्रकारची नाणी जमलेली दिसतील. नंतर त्याआधीची नाणी मिळवायचा प्रयत्न करावा. आपले परिचित, नातेवाईक, मित्रमंडळी यांना सांगून त्यांच्याकडून नाणी मिळवावीत. जगातील विविध देशांची नाणी, नोटा मिळविण्यासाठी, नोकरी व्यवसायाच्या निमित्ताने हिंडणारे, हिंडलेले, तसेच परदेशातील नातेवाईक, मित्रमंडळींना सांगून त्यांच्याकडून विविध देशांची नाणी व नोटा मिळवाव्यात. आपल्याजवळ एकाच प्रकारची दोन नाणी असल्यास नाणी जमाविणाऱ्या दुसऱ्या व्यक्तीबरोबर शक्य असल्यास, त्यातील एक नाणे बदलून घ्यावे. मात्र ज्यांना आपला संग्रह वाढवायचा आहे अशांना आपल्याला हवी असलेली नाणी विकत घेण्याशिवाय पर्याय नाही. कारण आपल्याला हवी असलेली नाणी कधीकाळी आपल्याला मिळतील या आशेवर नाणीसंग्रहाची वाढ होणार नाही. त्यासाठी जुना बाजार, सराफ बाजार, झवेरी बाजारातील चांदीचा व्यवहार करणारे झवेरी, फाटक्या जुन्या नोटा बदलून देणारे मारवाडी, कॉइन शॉप तसेच नाण्यांच्या प्रदर्शनास भेट द्यावी. संग्राहक आणि विक्रेत्यांच्या गाठीभेटी घ्याव्यात. नाणी विकत घेताना एखाद्या ज्येष्ठ नाणीसंग्राहकाचा सल्ला घेऊन, नाण्यांची स्थिती, त्यांचे सध्याचे बाजार मूल्य, उपलब्धता, दुर्मिळता, त्यांचा खरे - खोटेपणा इत्यादी बाबी लक्षात घेऊन विकत घ्यावीत. नाणी विकत घेताना उत्तम स्थितीतीलच नाणी विकत घ्यावीत. झिजलेली ज्याच्यावरचा मजकूर वाचता येत नाही अशी नाणी विकत घेऊ नयेत. चोरबाजारात तसेच रस्त्यावर खोटी नाणी विकणाऱ्यांपासून सावध राहावे. ही मंडळी खऱ्या नाण्यांमध्ये खोटी नाणी बेमालूमपणे मिसळून विकत असतात. नाणी जमवण्याचा छंद हा तसा थोडाफार खर्चिक आहे. मात्र आपण खर्च केलेल्या पैशाच्या मोबदल्यात पैसाच आपल्याजवळ येत असतो. नाण्यांमध्ये विविधताही खूप असल्यामुळे या छंदाला शेवट असा नाही.

वेगवेगळ्या नाण्यांची ओळख करून घेताना धातू, चलन, लिपी ,अक्षरे छाप, नक्षी ,रूप, आकार यांचा गुंता सोडवण्यासाठी विविध पुस्तके व कॅटलॉग यांचा आधार घेणे आवश्यक ठरते. कॅटलॉगमुळे नाणी जास्त बोलकी होतात व आपल्याकडे कुठची नाणी आहेत, कुठली नाहीत हे सहज लक्षात येते. तसेच आपल्या संग्रहातील नाण्यांचे कोष्टक, त्यांचे वजन, आकार, त्यांची त्यावेळची चलनातील किंमत यांचा अभ्यास करता येतो. ‘साउथ एशियन कॉईन्स अँड पेपर मनी’ या सहाशे पानी ग्रंथवजा कॅटलॉगमध्ये सम्राट अकबराच्या १५५६ सालच्या नाण्यांपासून ते स्वतंत्र भारतातील १९८१ पर्यंतच्या सर्व नाण्यांची माहिती संग्रहित केली आहे. तर डॉ. जेम्स मॅके यांच्या ‘कॉईन्स ॲन्ड कॉईन कलेक्टिंग’ या कॅटलॉगमध्ये जगातील विविध देशांच्या ३००० नाण्यांची रंगीत फोटोसहित माहिती संकलित केली आहे.

नाणी आणि नोटा ठेवण्यासाठी पारदर्शक प्लास्टिक असणारे आल्बम उपलब्ध असतात. यामध्ये नाणी आणि नोटा व्यवस्थित राहतात आणि दोन्ही बाजूंनी दिसतात. त्याचबरोबर नाणी आणि नोटा धूळ व हवेपासून सुरक्षित राहतात. तांब्याची नाणी उघडी

## ‘कणिका’

### मुंबापुरी


जमिनीखालून, जमिनीवरून,
आकाशातून, प्रकाशातून,
पाण्यावरून, पाण्याखालून
धावतेय् मुंबापुरी, चापतेय पाणीपुरी!

**- सुहासिनी कीर्तिकर**

ठेवल्याने काही काळाने हिरवट होतात. अशी ऑक्सिडाईझ झालेली नाणी, चिंच किंवा भांडी साफ करायच्या पावडरने घासू नयेत. त्यामुळे नाण्यांचे मूळ स्वरूप बिघडते. तांब्याची नाणी साफ करण्यासाठी ऑलिव्ह ऑइलमध्ये बुडवून ठेवावीत व काही दिवसांनी बोटाने चोळून, हिरवी पुटे काढावीत. तर चांदीची नाणी आणि कॉपर निकेलची नाणी रिठ्याच्या उकळलेल्या पाण्यात बऱ्यापैकी स्वच्छ होतात. चांदीची नाणी रिठ्याच्या पाण्यात उकळवून झाल्यावर, कापडाच्या तुकड्यावर फ्लोराईड टूथपेस्ट घेऊन, नाण्यांना हलक्या हाताने चोळून स्वच्छ करावीत.

जुन्या नाण्यांचा अभ्यास करण्यासाठी, नाशिक त्र्यंबकेश्वर रस्त्यावर, अंजनेरी येथे ‘इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ न्युमिस्मॅटिक स्टडीज’ ही संस्था आहे. या संस्थेत विविध काळातील,विविध राजांच्या ३००० नाण्यांचे संग्रहालय, सुसज्ज ग्रंथालय, नाणी लिपी परिचय वर्ग, विश्रामगृह अशा सोयी आहेत. मुंबई विद्यापीठाने कालीना संकुलात असलेल्या ‘दिनेश मोदी नाणी संग्रहालय आणि नाणकशास्त्र’ संस्थेत नाण्यांचा अभ्यास करण्यासाठी ‘नाणे शास्त्र’ विषयात पदव्युत्तर अभ्यासक्रम सुरू केला आहे.

*



लेख

❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀

# धंदा आणि नफा- योग्य मेळ साधायचा...

**✶ मिलिंद कोठारे ✶**

❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀❀

(धंदा आणि नफा यांचा योग्य मेळ साधायचा तर या मूलभूत गोष्टीकडे लक्ष द्या. नफा नक्की वृद्धिंगत होईल)

**भाग १**

धंद्याची मांडणी आणि नियोजन

या भागात काय शिकाल?

* विक्रीची मांडणी,
* विक्रीचे नियोजन,
* खरेदीचे नियोजन,
* नमुना नफा तोटा पत्रक,
* नफा तोटा पत्रक कसे मांडाल? उत्पन्नाची बाजू,
* नफा तोटा पत्रक कसे मांडाल? खर्चाची बाजू ठळक वैशिष्ट्य?

**विक्रीची मांडणी**

* विक्रीची नोंद कशी कराल?
* १) पदार्थाप्रमाणे (itemised) इन इंग्लिश
* २) दिवसाप्रमाणे (सोम, मंगळ, बुध)
* ३) खंडानुसार (आपल्या गिऱ्हाईकांचे वर्गीकरण करावे)
* ४) वेळेनुसार सकाळ संध्याकाळ इत्यादी
* ५) यादी धंद्यातल्या बारकाव्याप्रमाणे बदलू शकते

**विक्रीची मांडणी २**

* विक्रीची मांडणी करण्यासाठी आपला स्वत:चा डाटाबेस तयार करणे आवश्यक आहे.
* आता हा डाटाबेस कसा तयार करतात त्याकडे पाहूया.
* जर तुम्ही रिटेल म्हणजे किरकोळ व्यापार करत असाल तर तुम्ही पॉईंट ऑफ सेल नक्की वापरात असणार.
* नसाल वापरत तरी काही हरकत नाही परंतु पॉईंट ऑफ सेलमुळे काम सोप्पे होईल इतकेच.

**विक्री नियोजन-१**

* असा डेटा बेस तयार झाला की मग विक्रीचा अंदाज बांधता येतो.
* त्याकरता अंतर्गत आणि बाह्य घटकांचा विचार करावाच लागेल.
* अंतर्गत बाबी म्हणजे विक्रीचा कल कुठच्या दिवशी कोणत्या मालाचा किती खप आहे म्हणजे सोमवारी फराळी पदार्थांची विक्री जास्त होते, बुधवारी भरली वांगी जास्त खपली जातात हे टिपिकल रेस्टॉरेन्टचे उदाहरण पाहिल्यास.
* बाह्य घटक म्हणजे गुरुवारी आषाढी एकादशी आहे म्हणजे फराळी पदार्थ जास्त विकले जातील तर शुक्रवारी गटारी असल्यामुळे कोंबडीवडे जास्त विकले जातील.

**विक्रीचे नियोजन - २**

* किंवा जर तुम्ही कपड्याच्या व्यवसायात असाल तर उन्हाळ्यात पेस्टल शेडस् जशा गुलाबी, पिवळे यांची विक्री जास्त होईल तर हिवाळ्यात गडद रंग जास्त खपतील.
* आपल्याला आता विक्रीच्या आकड्यांचा बारकाईने अभ्यास करावा लागेल. त्याप्रमाणे मागणीचे अंदाज बांधावे लागतील आणि त्याप्रमाणे कच्च्या मालाची खरेदी करावी म्हणजे उगाच कच्च्या मालाचा साठा करावा लागणार नाही. त्याप्रमाणेच मागणीपेक्षा कमी मालही तयार होणार नाही म्हणजेच पर्यायाने नफ्याचे प्रमाण वाढेल.

**विक्रीचे नियोजन-३**

विक्री आणि खरेदीचा मेळ साधण्याचे महत्त्व

* विक्रीचा अंदाज बांधताना काही बारकावे अभ्यासावे.
* दिवसाप्रमाणे सेशनप्रमाणे विक्रीचा आकडा

लक्षात घ्या.

* आपल्या गिऱ्हाईकांचा कल लक्षात घ्या.
* पुढील आठवड्यातील काही ठळक घडामोडी आणि त्याचा विक्रीवर होणारा परिणाम.
* उदाहरणार्थ वॅलेंटाईन डे किंवा होळी असेल तर खप इतर आठवड्यांपेक्षा नक्कीच जास्त असेल.
* या सर्व घटकांचा विचार करून विक्रीचा अंदाज बांधावा.
* आता त्याप्रमाणे खरेदीचे नियोजन करावे म्हणजे खरेदी ही विक्रीच्या प्रमाणात कमी अधिक करावी. नाशवंत वस्तूच्या बाबतीत चोख नियोजन केले नाही तर मोठ्या नुकसानाला तोंड द्यावयास लागेल.

**खरेदीचे नियोजन**

**कच्या मालाची खरेदी करताना खालील गोष्टी लक्षात ठेवाव्या.**

* १) प्रत्येक कच्या मालाचे एक किमान वजन असते ज्याची मागणी नोंदवावी लागते.
* २) प्रत्येक कच्या मालाची किमान वेळ असते जेवढा वेळ अगोदर मागणी नोंदवावी लागते.
* ३) नाशवंत आणि इतर असे दोन भागात कच्या मालाची विभागणी करावी.
* ४) नाशवंत माल रोज किंवा एक दिवसाआड विक्रीप्रमाणे खरेदी करावा.
* ५) अनाशवंत मालासाठी स्टोरची व्यवस्था असावी.
* ६) मालाची आवक आणि ईश्यू यांची नोंद अचूक ठेवावी.

**खरेदीचे नियोजन-२**

* ७) याची मागणी नोंदवताना फायदा होईल. समजा तुमचा खाद्य पदार्थांचा धंदा आहे तर तेल हे महत्त्वाचा घटक आहे. आता जर तुमची आठवड्याला १ डब्बा १६ लिटरचा एवढा वापर असेल; परंतु तुमचा पुरवठादार जर ४ डब्यांवर सवलत देत असेल आणि क्रेडिटही देत असेल तर महिन्याची ४ डब्याची खरेदी एकदम करणे फायदेशीर ठरते. तसेच तुम्ही जर कपडे शिवण्याचा व्यवसाय करत असाल तर लाइनिंग सुद्धा कमी किमतीत घाऊक बाजारातून स्वस्त किमतीत खरेदी करणे किफायतशीर ठरेल.
* ८) महत्त्वाचे म्हणजे नाशवंत किंवा अनाशवंत माल विक्रीच्या प्रमाणातच म्हणजे जर पुढील आठवड्यात काही उत्सव वगैरे असेल तर त्याप्रमाणे वाढीव विक्रीचे नियोजन करावे. तसेच जर पुढील आठवडा बंद वगैरे घोषित झाला असेल तर त्याप्रमाणे कमी विक्री होईल; याकडे लक्ष्य असावे म्हणजे जेणेकरून माल वेस्ट होणार नाही आणि देयके (क्रेडिटर्स) नियंत्रित राहतील.

**नमुना नफा तोटा पत्रक**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | नफा आणि तोटा पत्रक | | |
| | खर्च | | उत्पन्न | |
| उत्पादन खर्च | | | विक्री | |
| | | | | |
| वेतन | | | इतर उत्पन्न | |
| वीज आणि ऊर्जा | | | | |
| मार्केटिंग आणि | | | | |
| ॲडर्व्हटाइसमेंट | | | | |
| पॅकिंग आणि डिस्ट्रिब्युशन | | | | |
| प्रिंटींग आणि स्टेशनरी | | | | |
| ऑफिस खर्च | | | | |
| नफा | | | | |
| एकूण खर्च | | एकूण उत्पन्न | | |

**नफा तोटा पत्रक कसे मांडाल? -१**

उत्पन्नाची बाजू

* विक्री
* विक्रीची मांडणी करताना त्याची विभागणी Product wise, Segment wise, Customer wise जे आपल्या धंद्यास जास्त उपयुक्त असेल त्याप्रमाणे करावी.
* विक्रीची नोंद ही नेट म्हणजे करांशिवाय (G.S.T.) सारख्या करांचा त्यात समावेश नसावा.
* (G.S.T.) कर जमा केलेली वेगळी नोंद असावी आणि तो योग्य त्या दिवशी (Due date) ला भरण्याची खबरदारी घ्यावी म्हणजे दंड भरावा लागणार नाही.

**नफा तोटा पत्रक कसे मांडाल? -२**

उत्पन्नाची बाजू

* इतर उत्पन्न.
* इतर उत्पन्न म्हणजे धंद्याच्या मुख्य स्तोत्रापासून वेगळ्या बाबीतून मिळालेले उत्पन्न.

* उदाहरणार्थ जर तुमचा ट्रान्सपोर्टचा व्यवसाय असेल. भाडे हे तुमचे मुख्य उत्पन्न परंतु बसच्यापाठी असलेल्या जाहिरातीमुळे आलेले उत्पन्न हे इतर उत्पन्न असेल.

नफा तोटा पत्रक कसे मांडाल?-१

खर्चाची बाजू

* उत्पादन खर्च
* उत्पादन खर्चाची नोंद धंद्याच्या गरजेप्रमाणे करावी.
* म्हणजे तुमचा किरकोळ विक्रीचा व्यवसाय असेल तर रोजच्या उत्पादनास लागणाऱ्या सर्व कच्च्या मालाची नोंद असावी जर तुमचा बॅच प्रोसेसिंगचा व्यवसाय असेल तर बॅच अनुसार नोंद करावी आणि जर तुम्ही मोठे प्रॉडक्ट जसे एखादे मशीन तर मग त्या प्रॉडक्टअनुसार नोंद करावी.

नफा तोटा पत्रक कसे मांडाल?-२

खर्चाची बाजू

* वीज आणि ऊर्जा.
* विजेच्या वापराची मीटरप्रमाणे आणि दिवसागणिक नोंद करावी आणि त्यावर नियंत्रण कसे ठेवावे हे आपण वेगळ्या चॅप्टरमध्ये पाहू.
* अशी नोंद महिन्यानुसार करून ठेवावी आणि season चे तापमान वगैरे नोंद केल्यास पुढे त्याचा उपयोग कसा करायचा ते पाहू.

मार्केटिंग आणि ऍडव्हर्टाईजमेंट.

* जाहिरात आणि मार्केटिंगच्या खर्चाची या खात्यात नोंद करावी. याचीसुद्धा वार्षिक आखणी केल्यास खर्च आटोक्यात ठेऊन तो जास्त उत्पादक ठरू शकतो. हल्ली सोशिअल मीडियाच्या प्रेसेन्सला महत्त्वाचे स्थान आहे तेव्हा त्या खर्चाची आखणीत योग्य ती दखल घेणे उचित ठरेल.

**नफा तोटा पत्रक कसे मांडाल?-३**

खर्चाची बाजू

* पॅकिंग आणि डिस्ट्रिब्युशन.
* मालाची विक्री वाढण्यासाठी त्याचे आकर्षक पॅकिंग करणे आवश्यक आहे.
* तसेच माल गिऱ्हाईकाकडे वेळेत पोचण्यासाठी डिस्ट्रिब्युशन सिस्टिमची गरज असते हा सर्व खर्च या खात्यात नोंदवावा.

**नफा तोटा पत्रक कसे मांडाल? ४**

## 'वात्रटिका'

### कोंडमारा

बसेस झाल्या वातानुकूलित.

थंड झाला प्रवास.

पान खाऊन थुंकणाऱ्यांचा

मात्र कोंडला श्वास.

**-डॉ. सुमन सुवर्णकुमार नवलकर**

खर्चाची बाजू

* प्रिंटिंग आणि स्टेशनरी
* धंद्याला आवश्यक अशी स्टेशनरी जसे व्हिजिटींग कार्डस्, लेटर हेडस्, ब्रोशर वगैरे गोष्टींच्या छपाई आणि निर्मितीच्या खर्चाची या खात्यात नोंद करावी.
* ऑफिस खर्च.

ऑफिसचे भाडे व चहा पाणी ऑफिस स्टाफचे भत्ते वगैरे या खात्यात नोंद करावी.

**ठळक वैशिष्ट्ये**

* यशस्वी धंद्याच्या पाय भरणीसाठी विक्रीची मांडणी आणि नियोजन दोन्ही आवश्यक आहे.
* विक्रीप्रमाणे खरेदीचे नियोजन आणि त्याची विक्रीशी सांगड घालणे आवश्यक आहे.

नफा तोटा पत्रकाची पद्धतशीर मांडणी. या सर्व मांडणीचा फायदा सुनियंत्रित व्यवस्थापनात कसा होतो ते आपण पुढील भागात पाहू.

**भाग २**

**सुनियंत्रित व्यवस्थापन**

या भागात काय शिकाल?

विक्री नियंत्रण

दैनंदिन विक्रीवर नियंत्रण कसे ठेवाल?

दैनंदिन खर्चावर (कॉस्ट) कसे नियंत्रण ठेवाल?

दैनंदिन ऊर्जा खर्चावर कसे नियंत्रण ठेवाल?

लेबर खर्चावर कसे नियंत्रण ठेवाल?

नफा आणि तोट्याचे मासिक विश्लेषण व कारणमीमांसा आणि सुधारीत मार्गक्रमण

विक्री नियंत्रण (अंदाजपत्रकाची तयारी)

दैनंदिन विक्रीवर नियंत्रण कसे ठेवाल?

**कविता**

# किती किती गंमत!

**-सुहासिनी कीर्तिकर**

भर वर्दळीत,
'खड्डेमुक्त' खड्ड्यात
गाडी चाचपडली;
अखेर धडाडत पडलीच.
मागच्यांचे काचकन्
किंचाळत लागले ब्रेक,
फॉर जगणे सेक!
मग शिव्या सरकारला,
चालवणाऱ्या समोरच्याला;
भरपूर वेळ घेऊन
होणाऱ्या उशीराला.
तरीही वेळात वेळ
काढून 'क्लिक' झाले कॅमेरे
वॉटसॅपून चित्रण गेले सामोरे
पदोपदी खड्डा
आपल्या अकलेचा गड्डा
खावा आता पाववड्डा
''शिकू नका हं गड्या
कुठलाच धड, धडा!''
खड्ड्यात पडणे गाडी
ही किती किती गंमत!
धडपडत धड जगताना
तुम्ही व्हाल याशी संमत!

---

विक्री नियंत्रणात पहिले पाऊल म्हणजे विक्रीचे अंदाजपत्रक तयार करणे.

अंदाज पत्रक तयार करताना या गोष्टींचा विचार करावा लागेल

१) गेल्या वर्षीपेक्षा किती वाढ साध्य करायची आहे?

२) वाढ टक्क्यामध्ये आणि आकड्यांमध्ये स्पष्टपणे मांडा.

३) समजा गेल्या वर्षी तुम्ही ५० लाखाची विक्री केलीत आणि यावर्षी २० टक्के वाढ साध्य करायचे ठरवले आहे.

४) म्हणजे या वर्षी ६० लाखाची विक्री करण्याचे धोरण आहे

५) ५० लाख विक्री म्हणजे किती माल विकला गेला होता आणि आता ६० लाख विक्रीसाठी किती माल विकावा लागेल याचे दर महिन्याचे अंदाज पत्रक तयार करावे लागेल. (एक्सल स्प्रेड शीत नंतर शेअर करूया)

**विक्री नियंत्रण (अंदाजपत्रकाची तयारी)-२**

६) ही वाढ दोन घटकांमुळे शक्य होईल. अ) भाववाढ दर वाढवून ब) जास्त माल विकून

७) भाव वाढवताना अंदाज घ्यावा लागेल की आपल्या सध्याच्या गिऱ्हाईकांपैकी कितीजण ती मान्य करून माल घेत राहतील जेणेकरून आपला मार्केट शेअर कमी होणार नाही

८) जास्त माल विकायला एक्सिस्टिंग कस्टमरपैकी किती जास्त मागणी नोंदवतील आणि किती नवीन कस्टमर निर्माण करता येतील आणि ते साध्य करण्याचा बिझनेस प्लान तयार करावा लागेल.

९) या दोन्ही घटकांची बेरीज करून विक्रीचे महिनावार अंदाजपत्रक तयार करता येईल.

१०) हे अंदाज पत्रक अगदी स्पष्टपणे लिहून काढावे म्हणजे जेव्हा आपण विक्रीशी तुलना करतो तेव्हा आपल्याला विक्री आणि अंदाज यातील फरकाचा अभ्यास करणे सोपे जाते.

दैनंदिन खर्चावर (कॉस्ट) कसे नियंत्रण ठेवाल?

कच्च्या मालाची नाशवंत (पेरिशेबल) ॲण्ड स्टोरेबल अशी विभागणी केल्यावर

आपल्या धंद्याला उपयुक्त अशी कॉस्ट शीट तयार करावी आणि ती रोज भरावी.

खरेदीचे नियोजन विक्रीशी निगडित आधी सांगितल्याप्रमाणे केल्यास कच्च्या मालाचा अपव्यय टाळून नफा वाढवता येईल.

त्याकरता रोज खरेदी ॲण्ड इश्यूज (स्टोअर्स मधून इण्डेण्ट केलेले) याची अचूक नोंद करावी आणि त्याची सांगड विक्रीच्या आकड्यांबरोबर करावी.

सर्वसाधारणपणे उत्पादन खर्च ३० ते ३५ टक्क्यापर्यंत मर्यादित केल्यास चांगल्या नफ्याची अपेक्षा ठेवता येईल.

अर्थात प्रत्येक धंद्यात एक विशिष्ट मार्जिन असते त्याप्रमाणे आपल्या कॉस्टची तुलना करावी.

**दैनंदिन ऊर्जा खर्चावर कसे नियंत्रण ठेवाल?**

* विजेच्या मीटर प्रमाणे युनिट्स नोंद रोज याप्रमाणे करावी
* ओपनिंग बॅलन्स दिवसाचे कन्सम्पशन आणि क्लोसिंग बॅलन्स याची नोंद रोज करावी.
* शक्यतो या युनिट्सचे डिपार्टमेंटप्रमाणे अलोकेशन करावे म्हणजे त्यावर नियंत्रण ठेवणे सोपे जाईल.
* येथे आणखी काही गोष्टी लक्षात ठेवणे आवश्यक आहे.
* काही युनिट्स फिक्स्ड असतात म्हणजे युनिट सुरू असो किंवा नसो तेवढे युनिट्स कन्झ्युम होतातच. यालाच आपण अनकंट्रोलेबल युनिट्स म्हणूया. उरलेले युनिट्स कॉन्ट्रोलेबल असतात.

**दैनंदिन ऊर्जा खर्चावर कसे नियंत्रण ठेवाल? - २**

* आता या कंट्रोलेबल युनिट्स ची विक्रीशी सांगड घालून रोज मापदंड (पॅरामीटर) तयार करणे आवश्यक असेल उदाहरणार्थ जर तुम्ही हॉटेल चालवत असाल तर युनिट्स पर ऑक्युपाईड रुम हे चांगले (पॅरामीटर) ठरेल.
* असा तुम्ही मन्थ वाईस, सीजन वाईस डेटा गोळा केल्यावर युनिट कन्झमशनचे ॲनालिसीस करणे सोपे जाईल म्हणजे या महिन्याचे सरासरी कन्झमशन त्याची गेल्या महिन्याशी तुलना करून ते योग्य किंवा कसे याचा निर्णय घ्यावा.

**लेबर खर्चावर कसे नियंत्रण ठेवाल?**

* वेतनखर्चाची नोंददेखील धंद्याच्या गरजेप्रमाणे करावी म्हणजे त्याचे विश्लेषण करणे सोपे जाईल.
* तसेच प्रत्येक महिन्याचा वेतन खर्च अगोदरच्या महिन्यांबरोबर तुलना करून त्यात योग्य ती सुधारणा करता येऊ शकेल. तसेच इथे फक्त खर्च कमी करण्याचा प्रश्न नाही; परंतु पुढील महिन्यात जर जास्त मागणीचा अंदाज असेल तर त्याप्रमाणे मनुष्यबळ आहे का याचे नियोजनसुद्धा वेतन पत्रिकेवर नजर टाकून करता येईल.

## ‘वात्रटिका’

### सुरुवात

तो म्हणाला, ‘काढू आपण उंटावरून वरात.

रस्ता पुढचा खडतर किती- नीटच येईल ध्यानात.’

ती म्हणाली, ‘वरातीला सजवू गाडी नवी.

खायची तेव्हा खाऊ कार्ली, सुरुवात गोडच हवी.’

**-डॉ. सुमन सुवर्णकुमार नवलकर**

**नफा आणि तोटऱ्याचे विश्लेषण**

विक्रीचे पृथक्करण

* १. विक्रीची तुलना अ) गेल्या महिन्याची विक्री बी) अंदाजपत्रकाच्या तुलनेत विक्री क) गेल्यावर्षी याच महिन्यातील विक्रीशी तुलना.
* या सर्व आकड्यांची तुलना आणि अभ्यास करुन गेल्या महिन्यातील धंदा कसा होता याचा निर्णय घेता येईल.
* विक्री जर कुठे कमी झाली असेल तर ती का कमी झाली याची कारण मीमांसा करणे योग्य ठरेल.
* विक्रीचे ॲनालिसीस करताना खालील गोष्टींचा विचार करावा.
* कुठल्या गिऱ्हाईकांनी माल विकत घेतला जसे घाऊक, किरकोळ किंवा तुमच्या धंद्यातल्या सेगमेण्टप्रमाणे जसे की कॉर्पोरेट, होलसेलर्स, रिटेल इत्यादी आणि त्याप्रमाणे आपली ॲडव्हर्टायझींग आणि मार्केटिंगचा कस डायरेक्ट करावा म्हणजे पुढील महिन्यात चांगल्या विक्रीची अपेक्षा ठेवता येईल.

**नफा आणि तोटऱ्याचे विश्लेषण-२**

उत्पादन खर्च

* रोजच्या उत्पादन खर्चावर नियंत्रण ठेवण्यासाठी आधी सांगितल्याप्रमाणे रोज खर्च आणि विक्री याची मांडणी करावी. वानगीदाखल एक फॉरमॅट तुमच्या अभ्यासासाठी दाखवत आहे. हा फॉरमॅट रेस्टॉरंट धंद्याशी निगडित आहे. परंतु तुम्हाला तुमच्या धंद्यासाठी कस्टमाईज्ड करावी लागेल त्यासाठी हवे ते मार्गदर्शन आजच्या शेवटच्या भागात करूया.

**'कणिका'**

**सर्दी**

जिथे भाषण,

तिथे गर्दी

रसिकतेला

झाली सर्दी!

- **सुहासिनी कीर्तिकर**

* रोज विक्री आणि खर्च यांची तुलना करून ती विक्रीच्या तुलनेत नियंत्रणात ठेवणे सोपे जाईल त्याकरता उत्पादन खर्चाचे अंदाजपत्रक करून त्याच्याशी तुलना करणे अधिक फायदेशीर ठरेल.
* तसेच प्रत्येक धंद्यात एक परिमाण ठरलेले असते जसे रेस्टॉरंटची फूड कॉस्ट (उत्पादन खर्च) ३५ टक्के असे प्रमाण मानले जाते. तसेच कॅटर्सची किंवा बँक्वेटचा धंदा असेल तर ती २०-२५ टक्के प्रमाण मानली जाते.

**नफा आणि तोटचाचे विश्लेषण-३**

वेतन

* वेतन खर्च ही जरी रोज कंट्रोल करण्याची बाब नसली तरी कर्मचाऱ्यांची उत्पादकता मात्र नियंत्रित ठेवणे आवश्यक ठरते. जसे की सेल्समनने रोज किती माल विकला किंवा जर तुम्ही समजा तयार शर्ट्स करण्याचा कारखाना चालवत असाल तर दिवसा आणि मजुरामागे किती शर्ट्स तयार होतायत यावर आधीच टार्गेट असले पाहिजे आणि त्यानुसार उत्पादन होते आहे की नाही यावर लक्ष्य ठेवण्याची सिस्टिम अस्तित्वात पाहिजे आणि टार्गेटपेक्षा जास्त उत्पादन करणाऱ्यास इंसेटीव्ह (बक्षीस) देण्याची व्यवस्था त्या सिस्टिममध्ये असावी.
* वेतन खर्चाची विभागणी डिपार्टमेंटनुसार करावी म्हणजे डिपार्टमेंट प्रमाणे नफा तोटा मांडता येईल.

**नफा आणि तोटचाचे विश्लेषण-४**

वीज आणि ऊर्जा

* वीज आणि ऊर्जा हे उत्पादनातील फार महत्त्वाचे घटक आहेत आणि विजेचे दर वाढतच चालले आहेत त्यामुळे विजेच्या किती युनिट्सची गरज रोज असेल त्याचे अंदाजपत्रक तयार करून त्याची रोजच्या मीटर रिडींग बरोबर तुलना करून कमी अधिक असल्यास त्याची लगेच कारणमीमांसा करून करेक्टिव ॲक्शन घेणे उचित ठरेल. महिना अखेरीस त्याकडे पाहून काही उपयोग होणार नाही. ही रोज लक्ष देण्याची महत्त्वाची गोष्ट आहे कारण आपला नफा अवलंबून आहे.
* याखेरीज जेथे हाय टेन्शन पॉवर लागते तेथे पॉवर फॅक्टरसारख्या परिमाणांवर लक्ष ठेवणे आवश्यक ठरते. नाहीतर दंड किंवा सरचार्ज भरावा लागतो.

**नफा आणि तोटचाचे विश्लेषण-५**

मार्केटिंग आणि ॲडव्हर्टिसमेंट

* मार्केटिंगची टीम असल्यास त्यांची टार्गेट फिक्स्ड असावीत आणि त्यांनी काम करण्याची मार्केट त्यांना ॲप्रोच करण्याची पद्धत आणि पब्लिसिटी मटेरियल वगैरेविषयी क्लॅरिटी असणे आवश्यक आहे तसेच दर आठवड्याला त्यांच्या प्रयत्नाचा रिव्ह्यू घेणे आवश्यक आहे जेणेकरून आपले ओव्हरऑल सेल्स टार्गेट साध्य होईल.
* ॲडव्हर्टिसमेंटसाठी होर्डिंग्स, बॅनर आणि पत्रके यासारख्या परंपरागत साधनाबरोबरच सोशिअल मीडियाचाही वापर करणे आवश्यक आहे.
* होर्डिंग्स, बॅनर आणि पत्रके यासारख्या माध्यमांचा वापर करताना खरंच ते आपल्या गिऱ्हाईकांपर्यंत पोचते याची पडताळणी करून पाहावी आणि त्याची विक्रीशी तुलना करावी.

**नफा आणि तोटचाचे विश्लेषण-६**

सोशियल मीडिया म्हणजे फेसबुक, इंस्टाग्राम ट्विटर या माध्यमांवर प्रेझेन्स असणे आवश्यक आहे परंतु त्याचे ॲनालिसीस करणे आवश्यक आहे.

आपल्या फेसबुक अकाऊंटची लोकप्रियता त्याला मिळणारे लाईक्स ॲण्ड फॉलोअर्स आणि त्याचा प्रत्यक्ष विक्रीची वाढ होण्यात असलेले योगदान याचा अभ्यास करावा. तसेच सोशियल मीडियातील गुंतवणूक आणि त्याचा परतावा याचाही साधकबाधक विचार करणे योग्य ठरेल.

**नफा आणि तोटचाचे विश्लेषण-७**

पॅकिंग आणि डिस्ट्रिब्युशन

पॅकिंग आणि वितरणखर्चाचं नियंत्रण कसे करावं?

- ✳ पॅकिंग सामग्रीची अशी निवड करा जी स्वस्त आणि टिकाऊ असेल.
- ✳ पॅकिंग सामग्री सहज आणि जवळच उपलब्ध असावी.
- ✳ वितरण करणाऱ्या वितरकांबरोबर करार करून दर ठरवून घ्यावेत.
- ✳ शक्यतो स्टँडर्ड आकाराचे पॅकिंग निवडावे म्हणजे ते स्वस्त आणि रास्त किमतीत मिळेल आणि त्याची उपलब्धता सर्वत्र असू शकेल.
- ✳ शक्यतो एकत्रितपणे माल बाजारपेठेत पाठवण्याची व्यवस्था करावी म्हणजे वाहतूक खर्चावर नियंत्रण राहील.

**नफा आणि तोटऱ्याचे विश्लेषण-८**

प्रिंटिंग आणि स्टेशनरी

१) डिजिटल माध्यमावर भर द्यावा आणि पेपरचा वापर कमी करावा.

२) जेव्हा गरज असेल तेव्हाच छपाई करण्याचे धोरण स्वीकारावे.

३) अंतर्गत कामासाठी स्टँडर्ड डिजिटल फॉरमॅट तयार करून वापरावे.

४) रिसायकलिंग वर भर द्यावा जसे की जुने ब्रोशर, इत्यादी स्टेशनरीसारखे वापरावे.

५) आपल्या प्रिंटरचे सेटींग ॲडजस्ट करून ते जास्तीत जास्त फायदेशीर करता येईल यावर भर द्यावा.

नफा आणि तोटऱ्याचे विश्लेषण ९

**ऑफिस खर्च**

वरील सर्व खर्च आणि त्याबरोबरच ऑफिस मधील वीज खर्च आणि टेलीफोनखर्चावर नियंत्रण असावे.

ट्रॅव्हलिंग आणि कॉन्व्हेयन्स खर्च करण्याविषयी नियम स्पष्ट असावेत.

शक्यतो डिजिटल माध्यमांचा उपयोग करावा आणि प्रवास खर्च टाळावा.

शक्य असेल तिथे आऊटसोर्सिंग करून खर्चात कपात करावी.

अर्थात सर्व इतर खर्चाप्रमाणे अंदाजपत्रक असावे व त्याची तुलना दर महिन्यास करावी.**नफा आणि तोटऱ्याचे विश्लेषण-१०**

नफा

ग्रॉस प्रॉफिट मार्जिन किती आहे याची तुलना करावी त्याची अंदाज पत्रकातील प्रॉफिटशी तुलना करावी.

एकूण विक्री वजा उत्पादन खर्च भागिले एकूण विक्री म्हणजे ग्रॉस मार्जिन ते किती आहे याची पाहणी करावी.

**कविता**

# माणूसपण

**- सुहासिनी कीर्तिकर**

आभाळाने केले
जमिनीला वॉटसॅप,
तिने मग करून 'टॅप'
पावसाने भरून गेला 'मॅप'!
इथे तिथे...
वसाहतीत, स्टेशनभर,
भरभरून आले पाणी
कोरड्या तलावांचे मात्र
तोंडचेच पळाले पाणी!
तरीही माणसेच ती!
धावता, धावता,
पळता पळता,
त्यांनी केले 'व्हिडियो शूट'
रचल्या नव्या म्हणी
रचली नवी गाणी
माणूसपणाची ही कहाणी
रोज मरता मरता
जीवंत जगणे
ही त्याची करणी
म्हणूनच पाऊसगाणी!


P. V. GOREGAONKAR
Jewellers
P. V. ANGEL
Visit Our Showroom
It has been an Honor to be
Your Family Jeweller
since Last 2 Dacades
Kindly Join Us to Celebrate 25 Years
of Crafting Exquisite Jewellery
at Our Showroom
from 11:00 am. to 8:30 pm.
Kindly contact us for a Personalized Service.
MONDAY CLOSED
Vikram : +91 9819862522
RAJAN : +91 9819322346
SARIKA : +91 7506626569
Shop No. 203, Gr. Floor, Moongipa Arcade ( Ashtavinayak ),
Ganesh Chowk, D.N. Nagar, Andheri (W), Mumbai - 40053, INDIA.
: jewelvick@yahoo.co.in
Shop Tel. : 022 2625 22 96

**कारणमीमांसा आणि सुधारित मार्गक्रमण**

उत्पादन खर्चावर नियंत्रण ठेवावे व सतत तो कंट्रोलमध्ये राहील यासाठी त्याचे प्रमुख घटक असलेले कच्चा माल आणि उत्पादनप्रक्रिया यावर लक्ष्य ठेवावे लागेल.

विक्रीच्या किमतीवर लक्ष्य ठेवावे आणि बाजारातील संधीचा फायदा घेऊन त्यात कमी अधिक बदल करण्याची क्षमता निर्माण करावी लागेल.

प्रॉडक्ट मिक्समध्ये ऋतूप्रमाणे बदल करावेत.

गिऱ्हाईकांची विभागणी (सेगमेंटेशन) करून त्याप्रमाणे विक्रीदर व सेवा देण्याची सोय करावी म्हणजे विक्री आणि नफा दोन्ही वाढण्यास मदत होईल.

सर्व कर्मचाऱ्यांचे नियमित ट्रेनिंग करून त्यांना बाजारातल्या घडामोडींविषयी जागरूक राहण्यास शिकवावे.

तसेच त्याची उत्पादकता आणि मनोबल वाढेल याची नियमित देखरेख करावी.

अशाप्रकारे सर्व धंद्याचे विश्लेषण केल्यास खात्रीलायकरित्या एक शाश्वत आणि फायदेशीर धंद्याचे मालक व्हाल याची आम्हाला खात्री आहे.

*

---

**कविता**

# ‘आजी जेव्हा’

**- कै. विद्या बाळकृष्ण विजयकर**

आजी होती बाळ जेव्हा
तलम मुलायम अंगडी लेवून
फिरत होती खांद्या खांद्यावर
गोड गोजीरे रूप तिचे,
सुखवत होते सर्वा तेव्हा, आजी जेव्हा....
बाल्य संपले. शैशवात आजी उभी ठाकली,
अभ्यासात रंगून गेली, क्रिडा अंगणी चमकू लागली,
शैशव कधी संपले कळलेच नाही.
कळले, आणि, मोहोर कणाकणातून,
फुलू लागला तिच्या अंगी, आजी जेव्हा....
आजी झाली षोडशी जेव्हा
जादुगार नयन तिचे भुलवी,
अमृतापरी बोल रिझवी
तरुण मनाला सतत सुखवी, आजी...
आजी झाली नववधू जेव्हा....
अधिकार मिळाला पत्नीपदाचा,
पति, सौख्यासह लाभली.
असंख्य नाती प्रेमळ तिजला,
आजी झाली नववधू जेव्हा
आजी झाली आई जेव्हा
मुलात सापडले विश्व तिजला
रंगून गेली त्या विश्वातच,
विसरून गेली सर्व जगाला
कळलेच नाही मुले मोठी झालीच केव्हा
आजी झाली सासू जेव्हा
रेशमाचे बंध बांधूनी
मायेची शाल पांघरोनी,
सहज लीलेने दिली वावटळे उधळोनी,
परि राहिली ताठ खंबीर तेव्हा...
आजी झाली आजी जेव्हा
अति प्रेमाने अति आनंदे,
सांगे गुजगोष्टी नातवंडांना
घरात नाही आई, आहे आजी.
कळताच चिमुकलं ऊगी रहात असे...
आजी झाली वृद्धा आता
थकले पाऊल, नम्रा करते मान,
लोपले तेज नयनातले
कणाकणाने खंगत आहे,
विचारते देवाला,
विसरलास कारे मला,
अडगळीतल्या खुर्चीसारखे करू नको रे मजला।
(शतकपूर्ती अंकात स्मरण म्हणून प्रभुतरुणाची मैत्रीण असणाऱ्या विद्याताईंची कविता.)

## अभिनंदन

### ऑनलाईन गणपती स्तुती

प्रभुतरूण म्युझिक क्लबने अतिशय सुंदर अशी गणेशवंदना ऑनलाईन सादर केली. निषाद धुरंधर, रॉनिका विजयकर, समिरा नवलकर, सागर देवरूखकर, शिवानी देवरुखकर, अनिश कीर्तिकर आदी गायकांचा त्यात सहभाग होता.

✶ ६-१०-२३ रोजी मुंबई कॉइन सोसायटीतर्फे श्री. आशीष शेलार यांच्या हस्ते सॉलि. राजन जयकर यांना मुद्रा रत्न पुरस्कार बहाल करण्यात आला. नाणीसंग्रह आणि इतर संग्रहासाठी हा पुरस्कार होता.

✶ सौ. अपेक्षा तेवारी (पूर्वाश्रमीच्या अपेक्षा प्रशांत राणे) या शिकागो येथील केपीएमजी कंपनीत मॅनेजिंग डायरेक्टर झाल्या. कंपनीत त्या एकमेव भारतीय महिला आहेत.

✶ दिल्लीत विज्ञान भवनात एकोणसत्तरावा राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार वितरण सोहळा पार पडला. त्यात डॉ. राजीव विजयकर यांना लक्ष्मीकांत प्यारेलाल यांच्यावर लिहिलेल्या पुस्तकासाठी 'बेस्ट बुक ऑन सिनेमा' या वर्गीकरणात राष्ट्रीय पुरस्कार राष्ट्रपती द्रौपदी मुर्मु यांच्या हस्ते प्राप्त झाला.

✶ दिनांक ११-१०-२३रोजी वेस्टर्न इंडिया कुलीनरी असोसिएशन -'विका'तर्फे अंधेरी येथील हॉटेल ललितस् येथे झालेल्या सोहळ्यात बिंबा नायक यांना 'द लेडी ऑफ द इयर' हा किताब प्राप्त झाला.

✶ अहमदनगर येथे झालेल्या आंतरशालेय ज्यूडो स्पर्धेत विवान श्रीपाद आगासकर या आठवीत शिकणाऱ्या विद्यार्थ्याला रजतपदक प्राप्त झाले.

✶ २८-१०-२३रोजी बंगळूर येथे अज्ञात शलाकाये। हा अनुराधा गोरे लिखीत कार्यक्रम सादर झाला. त्याचे दिग्दर्शन शीतल तळपदे यांचे होते.

✶ दिनांक २७-१०-२३रोजी दाभोळच्या अंजनवेल शाळेत प्रमुख पाहुणी ह्मणून सौ अचला सुभाष देसाई यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

✳

!! प्रभुतरुणास दीपावली शुभेच्छा !!



**श्रीमती स्मिता चंद्रशेखर धैर्यवान**
**श्रीमती करिष्मा अमित धैर्यवान**
**श्रीमती कस्तुरी लोकेश धैर्यवान**

## पाठारे प्रभु सोशल समाज

पाठारे प्रभु सोशल समाजाने पार्ल्याच्या राजपुरिया हॉलमध्ये ललिता पंचमीच्या शुभदिनी कनकाई देवीच्या उत्सवात नवरात्रौत्सवाचा रंगारंग कार्यक्रम सादर केला. या उत्सवात सहभागी होण्याचे हे समाजाचे ९ वे वर्ष होते. या ९ व्या वर्षाचे औचित्य साधून यावेळी नऊ देवींची साक्षात रूपे प्रेक्षकांसमोर नृत्य आणि संगीताच्या माध्यमातून सादर झाली.

प्रारंभी कनकाई देवीची ५ सवाष्णींच्या हस्ते ओटी भरण्यात आली आणि उपस्थितांना पेढ्यांचा प्रसाद देण्यात आला. हा प्रसाद श्री. धीरेन धुरंधर यांनी प्रायोजित केला होता. उपस्थितांचे स्वागत समाजाच्या सं. चिटणीस सौ. नीता सेंजित यांनी केल्यावर कार्यक्रमाचा शुभारंभ कु. मायरा राणे हिच्या 'शिवतांडव' नृत्याने झाला. या बालिकेच्या रूपात बालशिवाचे दर्शन फारच मोहक होते. त्यानंतर सौ. सुहास विजयकर यांच्या 'उठी श्रीरामा पहाट झाली' या भूपाळीच्या आणि सौ. रॉनिका विजयकर यांच्या 'शाम तेरी बन्सी पुकारे राधा नाम' या सुमधुर गीतांनी श्रोत्यांची वाहवा मिळवली. नंतर सौ. मीना धराधर आंबवणे हिच्या संकल्पनेतून व स्वाती राणे हिच्या दिग्दर्शनसहाय्यातून साकार झाला ९ देवींचा साक्षात्कार! सरस्वतीदेवी (सौ. नूतन कीर्तिकर), एकवीर देवी (सौ. मीना धराधर आंबवणे), दुर्गामाता (सौ. प्रांजल धुरंधर), कालिका माता (कु. अवंती तळपदे), सप्तश्रृंगी देवी (सौ. पल्लवी कोठारे), रेणुका माऊली (सौ. ऋजुता जयकर) आणि लक्ष्मीदेवी (सौ. प्रीती राकेश धैर्यवान) यांच्या अदाकारीतून आणि प्रत्येक देवीसमारे नृत्याचे व अभिनयाचे सादरीकरण करणाऱ्या भगिनी व विवान आगासकर, मायरा राणे, अनिका कोठारे, किमया कोठारे ही मुले यांच्या कलाविष्कारातून हा रंगारंग कार्यक्रम संपन्न झाला आणि प्रेक्षकांनी या संकल्पनेला उत्स्फूर्त दाद दिली.

रजनी कोठारे, ऋता प्रधान हजरनीस आणि क्षमा कोठारे यांची गीतेही रंगली. वयाच्या ८४ व्या वर्षी क्षमा कोठारे यांनी ट्रॅकवर 'ज्योती कलश झलके' हे 'भाभीकी चुडिया' मधील अजरामर गीत सादर करून कलेला व हौशीला वयाचं बंधन नसतं, हे पुढील पिढीला दाखवून दिलं. सौ. रोमा राणे-मलिक हिचे देवी नृत्य 'ऐ गिरी नंदिनी' लाजवाब होते. मयुरा नायक आणि तिच्या सख्या - संजना कोठारे, निश्का कोठारे, डॉ. निवेदिता सत्तूर-धैर्यवान, आदिती तळपदे, अपर्णा कोठारे, काजल धुरंधर, निशिता धैर्यवान यांनी मयुराच्या दिग्दर्शनात प्रोफेशनली सादर केलेले ३ नृत्याविष्कार (बंगाली नृत्य - बिहू, अलबेला साजन, आणि गरबा) नेहमीप्रमाणेच बहारदार झाले. कार्यक्रमाचे निवेदन सौ. मीना धराधर-आंबवणे यांनी केले. कार्यक्रमाच्या यशात श्री. निकोलाय कीर्तिकर, श्री. अभिजित विजयकर, श्री. विजय धुरंधर, श्री. अनिरुद्ध कीर्तिकर आणि श्री. रश्मिन राणे यांच्या सहकार्याचा बहुमोल वाटा होता. सर्व कलाकारांना कनकाई ट्रस्टतर्फे व श्री व सौ. तुषार कीर्तिकरांतर्फे भेटवस्तू देण्यात आल्या. आभार प्रदर्शन सं. चिटणीस श्री. जयंत कीर्तिकरांनी केले.

कार्यक्रमाला सभागृह प्रेक्षकांनी तुडुंब भरले होते. महाप्रसाद म्हणून कीर्तिकर कुटुंबियांनी प्रायोजित केलेल्या भोजनाचा आस्वाद घेऊन प्रेक्षकांनी तृप्त मनाने परतीचा मार्ग धरला तो पुढील वर्षीच्या कनकाई उत्सवाची वाट पहातच!

## 'वात्रटिका'

### पेन

पेनामधली शाई हल्ली अशीच जाते सुकून,
सही करतेवेळी मग ते पेनच बसतं रुसून .
म्हणतं मला, 'सहीदेखिल कर तू ऑनलाईन,
नाहीतर आपलं घेऊन ये तू एक पेन नवीन.'

**-डॉ. सुमन सुवर्णकुमार नवलकर**

## सप्टेंबर प्रभुतरुणावरील वृंदा जयकर यांची प्रतिक्रिया

प्रिय सुहासिनी कीर्तिकर, सप्टेंबर २०२३चा प्रभुतरुण वाचताना मन भारावून गेले. आपल्या भावपूर्ण 'संपादकीय 'मधून आपण वाचकांचा निरोप घेतला तेव्हा मनाच्या सतारीची एक हळवी तार झंकारली. परंतु निरोपसमारंभाचा वृतान्त लिहिताना त्या दिवसाचे आनंदमय वातावरण वाचकांसमोर हुबेहूब उभे केलेत. पंचवीस वर्षांच्या कार्याचा आढावा घेताना आजतागायत ज्यांनी ज्यांनी आपणांस सहकार्य केले त्यांच्याप्रती कृतज्ञता व्यक्त करून आपण विनयशीलता दाखवलीत याचे अप्रूप वाटलं. माझाही नामोल्लेख केलात याबद्दल आभारी आहे. परंतु असं आहे की सुहासिनीताई, माणुसकी आणि मैत्री नावाचं जहाज तरंगत ठेवण्यासाठी आपलं मनसुध्दा समुद्रासारखे अथांग आहे. अथांग समुद्रासारखे आपले विचार आहेत. त्या भावना व्यक्त करताना माझ्या शब्दांची गुंफणच कमी पडते. एकंदरीत अंक वाचनीय झाला आहे. नंदकुमार विजयकर यांचा 'अनपेक्षित 'लेख त्यांनी नेहमीसारखा अपेक्षित खुसखुशीत लेखनशैलीत लिहिला आहे. सौ. तारा धराधर मेनन ह्या माझ्या नातेवाईक असलेल्या बालमैत्रिणीचा लेख वाचून पुनर्भेटीचा आनंद झाला. आता भविष्यात नवीन स्वरूपात प्रकाशित होणारा प्रभुतरूण 'चिरायू होवो' अशी सदीच्छा व्यक्त करून नवीन संपादकद्वयाला बधाईदेते.

आपली,

**श्रीमती वृंदा शाम जयकर**


---


WITH BEST COMPLEMENT FROM

SWIFT
Cooking Made Simple

# Swift Engineering Company

Manufacturers of Pressure DIE-CAST Components in Alumimium / zinc alloys



**OUR RANGE OF PRODUCTS :**
(Die-cast Aluminium Products)
◆ Appa Patra ◆ Fry Pan ◆ Double Pan ◆ Dosa Tawa
◆ Chapati Tawa ◆ Toaster ◆ Furniture Fittings
◆ L.E.D. Housing ◆ Upcomming Products

MR. NEEL J. KIRTIKAR
4 Ganga, Tungareshwar ind. Complex
Sativali, Vasai (East) Palghar - 401208.
Email : neelkirtikar21@gmail.com
Customer care : 0250-2481043

# Namrata Vijayakar - A successful business requires one simple thing:
# Passion

Since an early age, I wanted to be in the creative field. While expressing my creativity, lead me to become an entrepreneur. During the lockdown, when many people lost their jobs, I chose to work for my own passion.

It was a challenge to market my services. So I started doing it slowly and steadily which helped a lot.

Company name - The NVable Design Company

My Achievements are Visual Merchandising Designs made for a client in Singapore. They loved it so much that it is going to be a symbol of inclusion for them for a long time. The Latest logo design done for Jimmy's Dips and sauces was so appreciated that I am working on the packaging design and all the brand communications for Jimmy's and helped me bag in other branding exercises for their cloud kitchen brand.

Corporate Profile created for Elegant Success Impression was very much liked by the people who received it and it won a lot of business and in turn, continues to give business to The NVable Design Company.

We help to give your brand a personality and a tone of voice in today's competitive market. My services help to build an image for your brand. An image that not only makes you distinctive but also helps you gain more business.

People can connect with the business at the contact number +91 9987566311.

The message to other emerging Entrepreneurs is Treat your brand with the same love and respect as you would do to your loved ones. It needs that attention, grooming, and care like most of us.

---

## आदरांजली

या नवरात्रात आपल्या ज्ञातीतील देवीरूप असलेल्या श्रीमती प्रमिला मधुकर तळपदे या अनंतात विलीन झाल्या. ज्ञातीतील सर्व संस्थांत त्यांचा सक्रिय सहभाग असायचा. कधी विश्वस्त ह्मणून, कधी करमणुकीच्या कार्यक्रमात सहभागी ह्मणून, ज्ञातीसंस्थेच्या नाटकानंतर बसची व्यवस्था करण्यात पैशांची सोय करून, कधी देणगी देऊन.... नाना रूपात त्यांचे उत्साही आणि सकारात्मक रूप दिसत राहिले. प्रभुतरुणालाही त्यांनी मोठी देणगी दिली होती. त्यांना भेटणे नेहमीच उर्जा देणारे होते. प्रभुतरुणातर्फे त्यांना भावपूर्ण आदरांजली.

## हौशी कलामंदिर

'हौशी कलामंदिर'चा ७३वा वार्षिक 'क्लब डे' ११-११-२३ रोजी वांद्रे येथील रंगशारदा भवनाच्या नाट्यगृहात साजरा होणार आहे. या वर्षीचे नाटक आहे- दिलीप प्रभावळकर लिखित : 'चूकभूल द्यावी घ्यावी'.

## प्रतिक्रिया

प्रभुतरुण सप्टेंबर अंकातील तारा मेनन यांचा लेख मला खूप आवडला.

**-सुजन राणे, न्यूजर्सी**

*With Best Compliments from*

**Shruti & Dr. Pradeep G. Vijayakar**

**Dr. Rutuja & Dr. Tanmay P. Vijayakar.**

## VIJAYAKAR HOMOEOPATHIC CLINIC

7 NADIADWALA BLDG.,
S. V. ROAD,
ANDHERI WEST.

TEL. NO. **9920122566** / **8591536583**

## TRUE DENT DENTAL CLINIC

SHOP. NO. 1,
MANGALYA SOC.,
BAL GOVINDAS RD.,
MAHIM WEST.

TEL. **982052364**

**स्मरणरंजन**

# एक हसरा चेहरा गमावला

**✶ मनिला राव ✶**

आमच्या माई म्हणजे सुहासिनी कोठारे आमच्या अगदी जवळच्या. खरं म्हटलं तर त्यांच्या गप्पिष्ट आणि प्रेमळ स्वभावामुळे सर्वांच्या त्या आवडत्या होत्या. त्यांना खूप मैत्रिणी होत्या. त्यांच्या नातेवाईकांना पण त्या हव्याश्या वाटत. कारण त्या कुणाचाही दोष नजरअंदाज करीत आणि प्रेमानी बोलत. त्यांची स्मरणशक्तीही चांगली होती. सर्वांचे वाढदिवस लक्षात असत. त्यांना न विसरता पहिला फोन करत. आत्ता कुरिअर आणि swiggy मुळे त्या कुणाकुणाला गोड खाऊपण पाठवत. त्यांच्या अंगात कलाही होत्या. कोविडमुळे बाहेर जाता येत नाही तर अनिलला (त्यांचा भाऊ) स्वत: रिब्बनची राखी बनवून स्वत: एन्व्हलप बनवून त्यामध्ये ते घालून कुरिअर करायच्या. बहीण-भावामध्ये वेगळंच प्रेम होते. रोज मनात आलं की फोन करायच्या. काहीही गप्पा चालू असायच्या. आता भावाला त्यांची उणीव भासत राहणार.

त्यांच्या कितीतरी आठवणी मनात दाटून आल्यात. त्या जेव्हा मे महिन्यात भाऊजी दीपक व त्यांच्या सासूबाई पुण्यात येत तेव्हा मजा येई. आम्ही एकदम सिनेमा, नाटक, फिरणे व रात्री पत्ते खेळणं. सर्व आठवते. भाऊजीही मनमोकळेपणे खेळत असत. मजा यायची. रोज नवीन जेवणाचा बेत असायचा. त्यांना नवीन नवीन पदार्थ करायला आवडायचे. त्यांच्या हाताला चव होती. एवढं काय; आत्ता माझी मुलगी अर्चना (त्यांची भाची) US मधून आल्यावर त्यांना भेटायला फक्त येणार असं आधी



सुहासिनी कोठारे

सांगितलं होतं तर त्यांची तब्येत नाजूक असतानासुद्धा तिच्यासाठी गोड अप्पे व बेसन लाडू करून दिले. ते हे शेवटचे. त्यांचे केलेले अप्पे सर्वांना आवडायचे.

त्यांनी शरीराचे क्लेश विसरून आनंदानी जायचं ठरवलं होतं. कोविडआधी त्या नेहमी कुणाला बरोबर घेऊन नाटक, सिनेमा मैत्रिणीबरोबर बाहेरगावी फिरायला, हॉटेलमध्ये जायच्या. त्यांना वाचनाचीही आवड होती.

काहीना माहीत नसेल. सुहासभाऊजी होते तेव्हा प्रभुतरुणची पडद्यामागची काम त्या करत. जसे प्रेसमध्ये मॅटर देणे, प्रूफ रीडिंग करणे, अंक आणणे, dispatch करणे इत्यादी. प्रभुतरुणची एक आदरणीय व्यक्ती कमी झाली.

असा एक हसरा चेहरा आता लपला.

# प्रभुतरुणाची डायरी

## विवाह माणिक महोत्सव (चाळीशी)

| | | |
|---|---|---|
| १६-१०-२३ | श्री दीपक विनायकराव तळपदे | कु. ज्योती जयवंतराव प्रधान |

## मरण

| | | | |
|---|---|---|---|
| २८-९-२३ | श्री योगेश मोतीलाल रणजीत | वय ८०, | अंधेरी |
| १५-१०-२३ | श्री अशोक शरद अजिंक्य | वय ७५, | सांताक्रूझ |
| १७-१०-२३ | श्रीमती प्रमिला मधुकर तळपदे | वय ९३, | अंधेरी (प) |
| १९-१०-२३ | श्रीमती संध्या नारायण विजयकर | वय ९६, | ठाणे (प) |
| २३-१०-२३ | श्री. विष्णुराज मोतीराम कोठारे | वय ९६, | अंधेरी (प.) |
| २९-१०-२३ | सौ. उज्ज्वला नरेश कीर्तिकर | वय ७३, | बोरीवली |

## प्रभुतरुणास देणगी

✶ प्रभुतरूण शताब्दी निमित्त सौ नीलिमा आणि श्री सुजन राणे यांजकडून ११०००/-

✶ श्री सुनील राणे यांजकडून रु ५००१/-

✶ प्रभुतरुण दीपावली अंकासाठी अनामिक दात्याकडून रु २००१/-

## प्रतिक्रिया

ऑक्टोंबरचा प्रभु तरुण काल मिळाला. ‘मस्त मस्त उतार’ अतिशय कृतज्ञतापूर्वक व भावपूर्ण संपादकीय झाले आहे. स्वेच्छेने आपण निवृत्ती घेतली असली तरी कांही व्यक्तींच्याअसण्याची इतकी सवय झालेली असते की त्यांची अनुपस्थिति जाणवते. तुमच्या लिखाणातील विचार करण्यास लावणारे विचारांचे गाठोडे इतके घट्ट आहे की म्हणावेसे वाटते ‘झाले बहू, होतील बहू, आहेतही बहू परंतु या सम हा’.

**-वृंदा जयकर**

## परीक्षांचे निकाल

Chinmayee Nikhil Talpade
**Passed BMMS exam**
CGPI 9.63

## प्रतिक्रिया

सुहासिनी कीर्तिकर, संपादक, प्रभुतरुण, ऑक्टोबर २०२३ चा प्रभुतरुणाचा अंक मिळाला. आपले शेवटचे संपादकीय मन हेलावून गेले. २००८ पासून सुरू असलेली आपली प्रभु तरुणाच्या सपांदकपदाची दैदीप्यमान आणि साहित्याच्या विविध अंगांनी बहरलेल्या कारकिर्दीचा पूर्णविराम मन विषण्ण करता झाला. आपल्या ह्या निरोपाच्या संपादकीयात आपण सर्वांप्रती जी क्रुतज्ञतेची भावना व्यक्त केलेली आहे ती आपल्या अंगी असलेल्या अनेक सद्‌गुणांचं प्रतिनिधीत्वच करते. सर्वाप्रति आदर, प्रेम, सद्‌भावना बाळगण्याचा आपला स्वभाव आम्ही जाणून आहोत. सर्वांना सोबत घेऊन आपण ही संपादकीयाची वाटचाल करत आलात. ह्यापुढेही आपण प्रभुतरुणाशी भावनेने जोडल्याला राहाल ह्याबद्दल खात्री बाळगतो. आपल्या पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा!!!

**-दीपक माधव धैर्यवान**

## चुकीची दुरुस्ती

✶ पाठारे प्रभू सोशल समाजाच्या पंचवार्षिक निवडणुकीची बातमी गेल्या अंकात दिली होती. त्यात खालील तपशीलाची कृपया नोंद घ्यावी. तपशील -कोषाध्यक्ष म्हणून श्री निकोलाय कीर्तिकर यांची बिनविरोध निवड झाली.

**बोर्ड ऑफ कंट्रोल प्रभुतरुणाच्या मालकीचे हे पत्र**
स्नेहेश प्रिंटर्स, ३२०-अ शाह अँड नाहर इंड. इस्टेट, अ-१, धनराज मिल कंपाऊंड, सीताराम जाधव मार्ग, लोअर परेल, मुंबई-४०००१३ येथे छापून पारिजात बी-३, युनियन बँक एम्प्लॉईज को-ऑप. हौ. सोसायटी, पटेल इस्टेट, जोगेश्वरी (प.), मुंबई-४००१०२ येथून प्रसिद्ध केले. **कार्यालय दूरध्वनी** : २६७८००४४